# निवेदन

तमाम लोकांस या जाहीर निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मा. आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांच्या अध्यक्षतेखाली बाल धोरणाचा प्रारुप मसूदा तयार करण्यासाठी तज्ञ व्यक्ती व शासनाचे अधिकारी यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर गठीत समितीने महाराष्ट राज्य बाल धोरण व कृती आराखडा २०२२ मसुदा तयार केलेला आहे. सदर प्रस्तावित बाल धोरण व कृती आराखडा हा इंग्रजी व मराठी भाषेमध्ये महाराष्ट्र शासनाचे https://womenchild.maharashtra.gov.in व https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. तरी सदर प्रस्तावित बाल धोरण व कृती आराखडा हा मुळामध्ये इंग्रजी भाषेत तयार करण्यात आलेला असून त्याचे मराठी भाषेमध्ये भाषांतर करण्यात आलेले आहे. तरी प्रसिद्ध करण्यात प्रस्तावित महाराष्ट्र राज्य बाल धोरण व कृती आराखडा यामध्ये आवश्यक बाबी, सुचना सुधारणा तसेच मराठी भाषेमध्ये भाषांतरीत करण्यात आलेल्या मसुद्यामध्ये शब्द रचना, व्याकरण या संदर्भाने हरकती व सुचना खालील विवरणपत्रामध्ये मागविण्यात येत आहेत.

प्रस्तावित महाराष्ट राज्य बाल धोरण व कृती आराखडा २०२२ च्या संदर्भाने आपल्या हरकती व सुचना दिनांक ३० जून २०२३ रोजी सांय. ६:१५ वा. पर्यंत महिला व बाल विकास आयुक्तालय, २८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाउस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ या पत्त्यावर अथवा childpolicy@gmail.com या ईमेल वर पाठविण्यात याव्यात असे आवाहन डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य यांनी केले आहे.

## विवरण पत्र

| सूचनाकार्याचे नाव | जिल्हा | संस्थेचे नाव (लागू असल्यास) | भ्रमणध्वनी क्रमांक | बाल धोरणातील प्रकरण क्र. | बाल धोरणातील मुद्दा क्र. | कृती आराखडा मुद्दा क्र. | बाल धोरणाचे अनुषंगाने सुचना | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

# महाराष्ट्र राज्य बाल धोरण आणि कृती आराखडा २०२२

# अनुक्रमणिका


| विभाग क्र | विषयसूची | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ | |
| | विषय पृष्ठ | |
| १ | संदर्भ | |
| २ | उद्दिष्टे आणि मार्गदर्शक तत्त्वे | |
| ३ | धोरण आणि सल्लागार प्रक्रिया बाबत | |
| ४ | थीमॅटिक फोकस क्षेत्रे | |
| ४.१ | आरोग्य. कल्याण आणि पोषण | |
| ४.२ | शिक्षण आणि विकास | |
| ४.३ | बाल संरक्षण | |
| ४.४ | बालकांचा सहभाग | |
| ४.५ | आर्थिक, सामाजिक आणि इतर असुरक्षा या कारणांमुळे बहिष्काराचा सामना करणारी बालके | |
| ४.५.१ | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अधिसूचित जमाती/भटक्या विमुक्त जाती आणि अल्पसंख्याक समाजातील बालके | |
| ४.५.२ | शहरी भागातील गरीब बालके | |
| ४.५.३ | स्थलांतरणाने प्रभावित होऊन रस्त्यावर राहणारी बालके | |
| ४.५.४ | अपंग बालके | |
| ४.५.५ | समलैंगिक मुली व मुले, उभयलिंगी, त्रितीयपंथी, असामान्य, जन्मजात विकृती आणि अलैंगिक (LGBTQIA+) बालके व तरुण व्यक्ति | |
| ४.५.६ | आपत्ती व वातावरण बदलामुळे प्रभावित बालके | |
| ५ | संस्थात्मक यंत्रणा | |
| ६ | संसाधन व्यवस्थापन | |

## १.प्रारंभिक

महाराष्ट्र राज्याच्या एकुण लोकसंख्येमध्ये एक तृतीयांश मुलांचा समावेश आहे. मुलांना त्यांच्या हक्कांची जाणीव होण्याकरिता शासनाने सक्षम व सर्वसमावेशक वातावरण प्रदान करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य बाल धोरण व कृती आराखडा हे राज्यातील सर्व बालकांना आनंदी, निरोगी, सक्रीय व सुरक्षित बालपण उपभोगण्याची खात्री करण्यासाठी एक महत्वाचे पाऊल आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये नमूद केलेप्रमाणे बालकांना त्यांच्या हक्कांची हमी देण्यासाठी शासन विशेष तरतुदी करण्यासाठी वचनबद्ध आहे. बालकांमध्ये समानता सुनिश्चित करणे तसेच धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर भेदभाव यापासून त्यांचे संरक्षण करणे (अनुच्छेद १४ व १५०), विकासाकरिता निरोगी वातावरण प्रदान करणे, मुलांशी संबंधित विशिष्ट अनुच्छेद आणि तरतुदीनुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (RTE) (अनुच्छेद २१अ), बालकांचे शोषण, जबरदस्ती किंवा धोकादायक रोजगार यांचे पासून संरक्षण करणे (अनुच्छेद २३, ३९(ड), ३९ (च)) नुसार शासन वचनबद्धतेची पुष्टी करते. बालहक्कांवरील संयुक्त राष्ट्र परिषद (UNCRC) तसेच भारताने स्वाक्षरी केलेल्या किंवा मंजूर केलेल्या इतर आंतरराष्ट्रीय करार आणि करारांद्वारे मार्गदर्शन करते.

प्रस्तुत बाल धोरण हे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारीत अधिनियम, २०२१, बाल आणि किशोरवयीन कामगार (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम, १९८६ (सुधारित २०१६), लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (सुधारित) अधिनियम (POCSO) २०१९, मुलांचे दत्तक घेण्याचे नियमन करणारी मार्गदर्शक तत्त्वे २०१५, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २०००, राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७, राष्ट्रीय पोषण धोरण २०१७, महाराष्ट्र राज्य बालपण काळजी व शिक्षण (ECCE) धोरण २०१९, राष्ट्रीय कृती योजना (२०१६), राष्ट्रीय बाल धोरण (२०१३) व शासन धोरणे व कृती आराखडा या सारख्या मुलांशी संबंधित अधिनियम आणि धोरणे यामध्ये अलीकडील काळात झालेले सर्व बदल विचारात घेते.

प्रस्तुत बाल धोरण व कृती आराखडा हा शाश्वत विकास उद्दिष्टे (SDG's) २०३० याचे सोबत सुसंगत व रचनाबंध आहे. बालकांचे हक्क सर्वव्यापी आहेत आणि १७ परस्पर संबंधित शाश्वत विकास उद्दिष्टे (SDG's) मध्ये जवळपास सारखा आहे. उपेक्षित घटकातील मुलांवर या धोरणाद्वारे विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत असून "कोणालाही मागे न सोडणे" (LNOB) या तत्वाशी सुसंगत आहे.

कोविड-१९ या महामारीमुळे जीवनमान आणि उपजीविकेची हानी झाल्यामुळे जीवनाचा दर्जा लक्षणीयरीत्या खालावलेला आहे, परिणामी अनेकांना गरिबी व उपासमारीचा सामना करावा लागलेला असून राज्यातील मुलांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या विकासावर झालेले परिणाम प्रस्तुत धोरण जाणते. आरोग्य व शिक्षण सेवांमध्ये व्यत्यय निर्माण झालेला असून ज्यामुळे अन्न सुरक्षितता, अल्प पोषण स्थिती व शिक्षणाची हानी झाली आहे. पालकांच्या किंवा कुटुंबातील सदस्यांच्या मृत्यूचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर खोलवर परिणाम झालेला आहे. प्रस्तुत संकटाच्या व्यापक स्वरूपामुळे शासन स्तरावरून उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि मुलांच्या संरक्षणासाठी प्रस्तुत धोरण विशेष तरतूदी करते.

सर्वकष धोरण हे बाल हक्कांच्या विविध वचनबद्धतेसाठी शासन कृतींना एकत्रितपणे बांधते. प्रस्तुत बाल धोरण हे यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या धोरणांवर ( सन २००२ व सन २०१४) आधारित असून यामध्ये अलीकडील काळामध्ये झालेल्या घडामोडी देखील विचारात घेण्यात आलेल्या आहेत. धोरणात्मक कृती आराखडा हा प्रगतीच्या मोजण्यायोग्य निर्देशकासह तयार करण्यासाठी एक पाऊल पुढे जाते. हे धोरण संस्थात्मक यंत्रणा देखील सुचवते आणि अभिसारिता व आंतर विभागीय समन्वय वाढवून पालन पोषणासह संसाधन व्यवस्थापन प्रणाली धोरणानुसार योग्य प्रकारे कार्यान्वित करते.

मुलांची सद्यस्थिती – महाराष्ट्र

| निकष | महाराष्ट्र | भारत | माहिती स्तोत्र |
|---|---|---|---|
| एकुण बालकांची संख्या (० ते १८ वर्षे) | ३.३ कोटी | **४७.२ कोटी** | जनगणना २०११ |
| विविध प्रकारे गरीब असलेल्या लोकसंख्येची टक्केवारी | १४.८५ % | २५.०१% | निती आयोग अहवाल "राष्ट्रीय विविध प्रकारे दारिद्र्य सूची" राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-४ आधारित मुलभूत अहवाल |
| बाल लिंग प्रमाण (महिला प्रति १००० पुरुषामागे) | ९१३ | ९२९ | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२०) |
| प्रति १,००,००० जिवंत जन्मामागे बाल मृत्यू दर | १७ | ३० | नमुना नोंदणीकृत प्रणाली २०१९ |
| प्रति १,००,००० जिवंत जन्मामागे माता मृत्यू दर | ४६ | ११३ | नमुना नोंदणीकृत प्रणाली (२०१६-१८) |
| संपूर्ण लसीकरण केलेली बालके (१२ ते २३ महिने) | ७३.५% | ७६.४% | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२०) |
| शारीरिक विकास खुंटलेली ५ वर्षाखालील बालके (वयानुसार कमी वजन ) | ३५.२% | ३५.५% | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२०) |
| वाया गेलेली ५ वर्षाखालील बालके (वयानुसार कमी वजन ) | २५.६% | १९.३% | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२०) |
| कमी वजन असलेली बालके (वयानुसार वजन) | ३६.१% | ३२.१% | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२०) |
| जास्त वजन असलेली बालके (५ वर्षाच्या आतील) (वयानुसार वजन) | ४.१% | ३.४% | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२०) |
| ६-५९ वर्षाच्या वयोगटातील अशक्तपणा आलेली बालके (<11.0 gm/dl) | ६८.९% | ६७.१% | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२०) |
| निव्वळ नांव नोंदणी दर (इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत) | ९७.२ | ९०.४ | जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली (२०१९-२०) |
| निव्वळ नांव नोंदणी दर (इयत्ता ०९ वी ते १० वी पर्यंत) | ६१.८ | ५०.२ | जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली (२०१९-२०) |
| निव्वळ नांव नोंदणी दर (इयत्ता ११ वी ते १२ वी पर्यंत) | ४३.३ | ३२.३ | जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली (२०१९-२०) |
| मजुरी कामात गुंतलेली ५ ते १४ वयोगटातील बालके | ४.९ लक्ष | ४३.५ लक्ष | जनगणना २०११ |
| २० ते २४ वयोगटातील महिला ज्यांचे विवाह वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी झालेले विवाह | २१.९% | २३.३% | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२०) |

| | | | |
|---|---|---|---|
| मुलांविरुद्ध घडलेले एकुण गुन्हे (प्रती १,००,००० मुलांच्या लोकसंख्या प्रमाणात गुन्हेगारी दर) | ३९.८ | २८.९ | राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरो २०२० |

## II प्रस्तुत धोरणाबाबत:

महाराष्ट्र राज्य धोरण व कृती आराखडा २०२२ हा बालकांकारिता एक धोरणात्मक दस्तऐवज असून विविध क्षेत्रे, विभाग, भागधारक व राज्य शासनाच्या संरचनेला एकत्रित दृष्टीकोन स्वीकारण्याकरिता दिशा देतो व ज्यामुळे बालकांकारिता सामुहिक व सहयोगी कृती होण्यास मदत होते. सदर दस्तऐवज हा मानवी हक्क-आधारित दृष्टिकोनामध्ये घट्टपणे व खोलवर रुजलेला असून १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या सर्व बालकांसाठी विविध वचनबद्धता आणि अधिकार पूर्ण करण्यासाठी मार्ग प्रदान करतो. प्रस्तुत धोरण हे मानवतावादी तत्त्वे, तटस्थता, भेदभाव न करता, स्वातंत्र्य आणि निःपक्षपातीपणा तसेच मुलाच्या सर्वोत्कृष्ट हिताच्या मध्यवर्ती तत्त्वास प्राधान्य देते. सदर दस्तऐवज हा जी बालके सुरक्षिततेच्या कक्षेतून बाहेर पडण्याची शक्यता अथवा सीमेवर आहेत अश्या लहान मुलांसाठी आवश्यक उपाययोजना आणि कृती तयार करतो.

### दृष्टीकोन:

राज्यातील सर्व बालकांना त्यांची जात, धर्म, वर्ग, क्षमता, जन्मस्थान आणि त्यांची लिंग ओळख विचारात न घेता त्यांची पूर्ण क्षमता प्राप्त करण्यासाठी समान संधी देणे हा मुख्य दृष्टीकोन आहे.

### मार्गदर्शक तत्त्वे:

१. बालकांशी संबधित सर्व निर्णय प्रकिया व कृती बाबत समानता, न्याय व भेदभाव न करणे या तत्वांद्वारे मार्गदर्शन **करतील.** प्रत्येक बालकास सन्मानपूर्वक वागणूक दिली जाईल व  धर्म, प्रदेश, लैंगिक अभिमुखता किंवा लिंग ओळख, जात, भाषा, आर्थिक पार्श्वभूमी, क्षमता किंवा दिव्यांगत्व यापैकी कोणत्याही कारणास्तव मुलाशी भेदभाव केला जाणार नाही.
२. कुणालाही मागे ठेवता येणार नाही या संदर्भाने बालकांशी संबंधित सर्व धोरणे व हस्तक्षेप हे सामाजिक समावेशाच्या तत्वांचे पालन करतात.
३. प्रत्येक बालकास जगण्याचा, विकास, शिक्षण, संरक्षण व सहभागाचा अधिकार आहे.
४. सर्व बाल हक्क हे परस्पर संबंधित व परस्परावलंबी आहेत व त्यामधील प्रत्येक हक्क समान महत्वाचे आहेत.
५. बालकांचे सर्वोत्तम हित हे सर्व परिस्थितींमध्ये सर्वोपरी असेल.
६. कौटुंबिक वातावरण हे बालकांच्या सर्वांगीण विकासाकरिता सर्वात अनुकूल आहे. बालकांना गरजेनुसार व शेवटचा पर्याय म्हणून संस्थात्मक दाखल केले जाईल.

### उद्दिष्टे:

१. बालकांच्या सर्वांगीण विकासाकरिता सक्षम व अनुकूल वातावरण तयार करणे.
२. बाल केंद्रित धोरणे, प्रणाली, संस्था व प्रक्रिया मजबूत / विकसित करणे.
३. शासन व भागधारक यांचे मध्ये आंतर-विभागीय व बहु-क्षेत्रीय सर्व स्तरावर अभिसारिता सक्षम करणे व प्रोत्साहन देणे.

**मसुदा तयार करतानाचा दृष्टीकोन :**

प्रस्तुत धोरण हे महिला आणि बाल विकास विभाग (DWCD), महाराष्ट्र शासन (GOM) द्वारे विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, अग्रगण्य सामाजिक क्षेत्रातील अभ्यासक, बाल हक्क तज्ञ, शैक्षणिक, कायदेतज्ज्ञ आणि युनिसेफ यांचा समावेश असलेल्या विस्तृत भागधारकांच्या सल्लामसलतांचे उत्पादन आहे. . या प्रक्रियेचे नेतृत्व माननीय महिला आणि बाल विकास मंत्री यांनी केलेले आहे . तसेच सदर प्रक्रिया ही प्रधान सचिव – महिला व बाल विकास, आयुक्त -महिला व बाल विकास, आणि उपायुक्त – महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने व भागधारक यांच्या व्यापक सल्ल्याचा परिणाम आहे.

प्रस्तुत धोरणामध्ये विशिष्ठ कृतीयोग्य व निवेशानामध्ये योगदान देण्यासाठी राज्य स्तरीय कृती दलाची स्थापना करण्यात आली होती. यापूर्वीची धोरणे आणि उदयोन्मुख समस्या यांचे पुनरावलोकनाच्या आधारे, कृती दलाद्वारे मुख्य विषयगत क्षेत्रे ओळखण्यात आलेली असून विषय तज्ञ, संबंधित क्षेत्रातील अभ्यासक व शासकीय अधिकारी यांचा समावेश असलेले उप-गट तयार करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक विषयगत उप-गटाने ठोस कृती आराखडासह धोरणात्मक उपाययोजना बाबतचा संच सादर केलेला आहे. युनिसेफ या संस्थेने धोरणात्मक निर्देश व कृती आराखडा एकत्रित करण्यासाठी तांत्रिक व दस्तऐवज तयार करण्यास सहाय्य केलेले आहे.

प्रस्तुत धोरण हे चार विषयगत क्षेत्रे प्रतिबिंबित करते व बालकांच्या पाच असुरक्षित श्रेणी ओळखून त्याकडे शासनाचे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यामध्ये आपत्ती व हवामान बदलामुळे बाधित बालकांसाठी धोरणात्मक तरतुदी व कृती आराखडा हा देखील एक भाग आहे.

प्रस्तुत धोरणामधील कृती आराखड्यात नमूद केलेली कालमर्यादा खालीलप्रमाणे वाचण्यात यावी: -

**अल्पकालीन मुदत:** १ वर्षापर्यंत;

**मध्यमकालीन मुदत:** ४ वर्षापर्यंत,

**दीर्घकालीन मुदत:** ७ वर्षापर्यंत

प्रस्तुत धोरणामध्ये खालील नमूद विभाग आहेत.

विषयगत क्षेत्रांसाठी धोरणात्मक उपाय व कृती योजना

१. आरोग्य, पोषण व कल्याण
२. शिक्षण व विकास
३. बाल संरक्षण
४. मुलांचा सहभाग

उपेक्षित गटातील बालकांसाठी धोरणात्मक उपाय व कृती आराखडा

५. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्याक समाजातील मुले
६. शहरी गरीब समाजातील मुले
७. मोसमी बदलामुळे स्थलांतरणामुळे बाधित मुलांसह रस्त्यावरील परिस्थितीत फिरतीवर असलेली मुले
८. दिव्यांग बालके
९. त्रितीयपंथी व अलैंगिक (TGNC) मुले
१०. आपत्ती व हवामान बदलामुळे बाधित मुले

१. **आरोग्य, पोषण आणि कल्याण**

**धोरणात्मक उपाय :**

१.१ पुनरुत्पादक, माता, बालक व किशोरवयीन यांना आरोग्याच्या सर्व संदर्भाने **सार्वत्रिक, विनामुल्य व सर्वसमावेशक** प्राथमिक आरोग्य सेवा प्रदान करणे. गर्भधारणपूर्व, प्रसूतीपूर्व, जन्माच्या वेळी व प्रसूती नंतरची आरोग्य सेवा व त्यांची **सुधारीत व किफायतशीरपणे उपलब्ध** असतील याबाबतची खात्री करणे. संस्थात्मक प्रसूती, प्रसूती उपचार, मोबाईल आरोग्य कक्ष, वाहतूक व त्या संदर्भाने सेवा सुधारणे. माता, नवजात, अर्भक, व बाल मृत्यूदर कमी करण्यासाठी भक्कम उपाययोजना करणे.

१.२ **माता मृत्यूदर व समाजातील विकृती कमी करण्यासाठी दुर्गम भागात व लोकसंख्येपर्यंत पोहोचून महिला व किशोरवयीन मुलींना दर्जेदार लैगिक व** पुनरुत्पादक आरोग्य सेवा उपलब्ध असल्याचे सुनिश्चित करणे. तसेच लिंग निवडण्याची पद्धत प्रतिबंधित करून गर्भधारणपूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र लिंग निवडीस प्रतिबंध (PCPNDT) अधिनियम. १९९४ ची कठोरपणे अंमलबजावणी करणे.

१.३ नवजात बालकाच्या आयुष्यातील प्रथम १००० दिवसांमध्ये त्याचे आरोग्य व विकास करण्यास प्राधान्य द्यावे. गुणवत्ता व सुरक्षितता तपासल्यानंतर सर्व मुलांचे **संपूर्ण लसीकरण** सुनिश्चित करणे. अंगणवाडी व इतर आरोग्य संस्था यांचे माध्यमातून **आरोग्य व पोषण सेवा वाढविणे व सक्षम** करणे. मातांना प्रसुतीनंतर एका तासाच्या आत आपल्या अर्भकास स्तनपान सुरु करण्याकरिता **सल्ला** देऊन त्याकरिता आवश्यक **सहाय्य व पाठींबा** देणे. पहिल्या सहा महिन्यापर्यंत आपल्या अर्भकास केवळ स्तनपान करणे व ०२ वर्षापर्यंत अथवा त्या पुढील कालावधीमध्ये बालकास पूरक स्तनपान करणे. अर्भक जन्माच्या सहा महिन्याच्या कालावधी नंतर पुरेसा, उत्तम प्रतीचा, सुरक्षित, परवडणारे पूरक आहार देण्याकरिता बाळाचे संगोपन करणाऱ्या व्यक्तीस **सल्ला व पाठींबा** देणे.

१.४ अर्भकाचा गर्भाशय मृत्यू अथवा नवजात बालकाचा मृत्यू रोखण्याकरिता लहान व आजारी मुलांची घरगुती व सुविधा-आधारित काळजीचा स्तर सुधारणे. यामध्ये कांगारू आधारित माता काळजी (KMC), विशेष नवजात काळजी कक्ष (NSCU), प्रत्येकाची काळजी, अर्भक आणि लहान मुलांचा आहार ज्यामुळे त्यांना लवकर उत्तेजन मिळून त्यांच्या विकासाचे टप्पे गाठणे शक्य होईल.

१.५ मुलांमध्ये **संसर्गजन्य व असंसर्गजन्य** रोग टाळण्याकरिता व **योग्य प्रकारे व्यवस्थापित करण्यासाठी उपचार व सेवांची उपलब्धता सुधारणे**.

१.६ **मुलांच्या बालपणातील विकासामधील विलंब व अपंगत्व** यांची प्रारंभिक ओळख व त्याकरिता प्रतिसाद संबंधित उपाय सक्षम करणे. **जन्मतः दोष, वाढीशी संबंधित समस्या व अनुवांशिक रोग** यांची प्रारंभिक ओळख, तपासणी, उपचार आणि संवेदना सुनिश्चित करणे. यामध्ये बालकांसाठी उपशामक काळजी घेण्याच्या तरतुदींचा समावेश आहे. मानसिक विकारांची प्रारंभिक ओळख, तपासणी व उपचार उपलब्ध असल्याची खात्री करणे. **मानसिक आरोग्य सेवांच्या** व्याप्ती व संबद्धता द्वारे लज्जास्पद गोष्टीचे प्रमाण कमी करण्यासाठी व सर्वसमावेशक वातावरण तयार करण्यासाठी उपाय योजना करणे.

१.७ मुलांचा जगण्याचा अधिकार सुनिश्चित करण्याकरिता व **कुपोषणाचे तिप्पट ओझे** कमी करण्यासाठी **पोषण सुरक्षा** जाळे यांचा **विस्तार** करणे. विशेषतः सर्वात उपेक्षित घटकांना परवडणाऱ्या किमतीत पुरेश्या प्रमाणात दर्जेदार अन्न मिळण्याची खात्री करून जीवनचक्रात पुरेसे अन्न व पोषण सुरक्षा प्रदान करणे.

१.८ कुपोषणाच्या विविध समस्या दूर करण्यासाठी **सर्वसमावेशक, एकात्मिक व आंतरक्षेत्रीय** धोरणांची खात्री करणे. अंगणवाडी केंद्रे (AWCs) व शैक्षणिक शाळांद्वारे पूरक पोषण, बालकांची नियमित वाढ निरीक्षण, सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता कार्यक्रम, मुबलक पाणी, स्वच्छता व आरोग्य (WASH) या सारखे विविध हस्तक्षेपांचे बळकटीकरण करणे.

१.९ योग्य वैद्यकीय सेवा, संदर्भ, पोषण पुनर्वसन आणि पाठपुरावा सुविधा प्रदान करून **गंभीर तीव्र कुपोषण (SAM) व मध्यम तीव्र कुपोषण (MAM)** यास प्रतिबंध व योग्य प्रकारे व्यवस्थापित करणे. यामध्ये समुदाय-आधारित व्यवस्थापन, ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) व पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) या सेवा सक्षम करणे या बाबी देखील समाविष्ट आहेत.

१.१० बालकांमधील **वर्तन बदल व संवाद आंतर निरसन** या करिता एकत्रित प्रयत्न करणे. कुटुंब, काळजी घेणारे व मुलांना पोषण या विषयाबाबत शिक्षण व समुपदेशन सेवा उपलब्ध करून देऊन कुपोषण रोखण्याकरिता जागरूकता निर्माण करणे. आरोग्यदायक खाण्याची सवय व उत्तम स्वच्छता पद्धती बाबत प्रसार करणे.

१.११ आरोग्याच्या वर्तनामध्ये सुधारणा करण्याकामीच्या संदर्भाने समुदाय- आधारित संस्था यांची क्षमता वाढविणे व योग्य संदर्भीय यंत्रणा स्थापन करणे.

१.१२ आदिवासी, शहरी भागातील गरीब बालके, स्थलांतरित कुटुंबे, रस्त्यावरील मुले, बेघर बालके, धार्मिक अल्पसंख्याक समाजातील बालके, दिव्यांग बालके, त्रितीयपंथी बालके इत्यादींसह उपेक्षित भागातील मुलांच्या प्राथमिक सेवांच्या गरजा पूर्ण करणे.

१.१३ सामान्य जुनाट आजार (संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग) विशेषतः मुलींमधील ॲनिमिया गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग रोखण्याकरिता लसीकरण, तपासणी व समुपदेशनाद्वारे **किशोरवयीन आरोग्य व सशक्ता** याबाबत प्रसार करणे. किशोरवयीन मुलांमध्ये आरोग्यदायी खाण्याच्या सवयींना प्रोत्साहन देण्यासाठी पौष्टिक समुपदेशन सेवा प्रदान करणे. **किशोरवयीन** मुलांना ज्ञान, पुरेशा सेवांची सुधारीत उपलब्धता मिळवून देण्याकरिता तसेच त्यांचे दृष्टीकोनास वाचा व कुटुंब, सेवा प्रदाते आणि इतरांपर्यंत त्यांची चिंता पोहोचवण्यासाठी **सक्षम करणे**. किशोरवयीन मुलांच्या लग्नात वयातील विलंब यासह त्यांचे आरोग्य व सशक्ता राखण्यासाठी सहाय्यक उपाय वाढविणे. किशोरवयीन मुलांचा **लैंगिक आरोग्य शिक्षण, जीवन कौशल्य शिक्षण, मानसिक-सामाजिक** समर्थन तसेच शाळा, कौटुंबिक व सामुदाय स्तरावरील सेवांमध्ये प्रवेश सक्षम करणे. धोकादायक वर्तनामध्ये बदल करण्यासाठी पावले उचलणे व धुम्रपान, मद्यपान, अमली व इतर पदार्थांचे **व्यसन** असलेल्या किशोरवयीन मुलांना **उपचार आणि पुनर्वसन सेवा** प्रदान करणे.

कुपोषणाचा तिहेरी भार या शब्दाचा अर्थ-कमी वजन, सूक्ष्म पोषक घटकांच्या कमतरतेने ग्रस्त मुले व जास्त वजन असणारी बालके.

१.१४ मानवी संसाधानांमधील ( तंत्रज्ञ, परिचारिका, वैद्यकीय व सहाय्यक कर्मचारी इ.) पोकळी संबोधित करणे. आघाडीच्या कार्यकर्त्या ( आशा वर्कर, अंगणवाडी सेविका व मदतनीस, सहाय्यक परिचारिका), आरोग्य सेवा प्रदाते, खाजगी व्यवसाय करणारे बालरोगतज्ञ, प्रसूती तज्ञ व समुदाय-आधारित संस्थांमधील कर्मचारी यांची नियमित क्षमता वाढ करणे. सदर बाब हि इंडियन मेडिकल असोशिएन

(IMA), इंडियन ॲकाडमी ऑफ पेडीयाट्रिक्स (IAP) आणि फेडरेशन ऑफ ऑबस्टेट्रिक ॲण्ड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (FOGSI) यांचे भागीदारीमध्ये करणे शक्य आहे.

१.१५ आरोग्याच्या संदर्भाने पायाभूत सुविधांची गुणवत्ता व सर्व स्तरावर उपकरणांची उपलब्धता यामध्ये गुंतवणूक व सुधारणा करणे. विशेषतः सर्वात दुर्लक्षित लोकसंख्येकरिता सेवा वितरण प्रणाली सक्षम करणे. सर्व आरोग्य केंद्रांवर बालस्नेही पायाभूत सेवा उपलब्ध असल्याची खात्री करणे. शासकीय कार्यालय, रेल्वे स्थानक, बस थांबा, मॉल्स इत्यादी ठिकाणी स्तनपान खोली करिता जागा उपलब्ध करून देणे.

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरणात्मक उपाय : १.१ , १.१३, १.१४ | | | | | | |
| १. | दर्जेदार प्रसूतीपूर्व काळजी व प्रसूती नंतरची काळजी सह मातेच्या आरोग्याची काळजी | तपासणी, पोषण शिक्षण व इतर आरोग्य सेवांसह गर्भधारणपूर्व आणि प्रसूतीपूर्व काळजी (ANC) बाबतच्या सेवा | अल्प कालावधी | • प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) , सामुदायिक आरोग्य केंद्र (CHC) व प्रसूतीपूर्व काळजी (ANC) बाबतची सेवा प्रदान करणारे प्राथमिक संदर्भीय कक्ष (FRU) यांची टक्केवारी<br>• आरोग्य, पोषण शिक्षण व सेवा मिळवणाऱ्या किशोरवयीन व नवविवाहित महिलांची एकुण संख्या<br>• गर्भधारणेची वैद्यकीय समाप्ती (MTP) सेवा उपलब्ध असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) , सामुदायिक आरोग्य केंद्र (CHC) यांची एकुण संख्या<br>• सामान्य शरीर द्रव्यमान | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | निर्देशांक (**Body Mass Index) (<18.5 BMI)** पेक्षा कमी असलेल्या स्त्रियांची एकुण संख्या | | |
| | | राष्ट्रीय अधिक लोह उपक्रम (**National Iron Plus Initiative)** मार्गदर्शक तत्वानुसार रक्तक्षय व लोहयुक्त फॉलिक आम्ल (**IFA**) व कॅलशियम पुराकांचे वितरण व सेवन व त्याबाबत नियमित तपासणी | अल्प कालावधी | • गरोदरपणात १०० दिवसात लोहयुक्त फॉलिक आम्ल (**IFA**) गोळ्यांचे सेवन करणाऱ्या गर्भवती महिलांची टक्केवारी<br>• १५ ते ४९ वयोगटातील महिला ज्यांना अशक्तपणा / रक्तक्षय (<100 **g/dl**) आहे अश्या महिलांची टक्केवारी | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |
| | | निरोगी पालक -निरोगी बालक उपक्रम संपूर्ण राज्यात वाढविणे | अल्प कालावधी | • निरोगी पालक -निरोगी बालक उपक्रम अंतर्गत व्यापलेल्या जिल्ह्यांची एकुण संख्या<br>• | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग |

## १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण

| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रसूतीपूर्व काळजी घेणारे चिकित्सालय (ANC) / उप प्राथमिक आरोग्य केंद्रे (Sub-PHC) , प्राथमिक आरोग्य केंद्रे (PHC) व अंगणवाडी केंद्रे (AWCs) यांचे मार्फत गर्भवती व स्तनदा मातांना मोफत आरोग्य तपासणी, औषधे व काळजी बाबतच्या सुविधा | अल्प कालावधी | • गरोदरपणाच्या पहिल्या तिमाही कालावधीमध्ये नोंदणीकृत गर्भवती महिलांची टक्केवारी<br>• सर्व आवश्यक प्रसूतीपूर्व काळजी घेणारे चिकित्सालय (ANC) सेवा प्राप्त करणाऱ्या गर्भवती महिलांची टक्केवारी<br>• एकात्मिक बाल विकास योजना अंतर्गत नोंदणी झालेल्या गर्भवती व स्तनदा मातांची संख्या<br>• ग्राम आरोग्य व पोषण दिवस (VHNDs) आयोजित केलेल्या गाव /पाडा यांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |
| | | शहरी, ग्रामीण व आदिवासी भागात आरोग्य सेवा उपलब्ध नसलेल्या दुर्गम व पोहोचण्यास कठीण असलेल्या भागात मोफत आरोग्य तपासणी शिबीर | अल्प कालावधी | • ग्राम पंचायत / वॉर्ड / प्रभाग / जिल्हा स्तरावर आयोजित केलेल्या आरोग्य तपासणी शिबिरांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | आयोजित करणे | | • सदर शिबिरापर्यंत पोहोचलेल्या महिलांची संख्या | | ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |
| | | अंगणवाडी कर्मचारी (**AWWs**), आशा वर्कर व सहाय्यक परिचारिका (**ANMs**) यांचे मध्ये योग्य समन्वय साधून सर्व मातांची प्रसूती नंतरची काळजी (**PNC**) घेणे (प्रसूती नंतर ४८ तास संस्था/रुग्णालय येथे राहणे व त्यानंतर ४२ दिवस पाठपुरावा) | अल्प कालावधी | • प्रसूती नंतरची काळजी (**PNC**) सेवा उपलब्ध झालेल्या महिलांची टक्केवारी | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |
| | वर्तनातील बदलाचे अनुषंगाने संवाद (**BCC**) – पालक व काळजी घेणाऱ्या व्यक्तींना समर्थन | प्रसूती पूर्व काळजी (**ANC**), प्रसूती नंतरची काळजी (**PNC**) या बाबतचे महत्व, प्रथम १००० दिवस, स्वच्छता पद्धती, आहार पद्धती, बालकांच्या वाढीचे निरीक्षण इत्यादी बाबत पालक व काळजी वाहक यांना सक्षम बनविणे. तसेच पालक व काळजी वाहक यांना वर्तनातील बदल क्रिया व समुपदेशन देणे | अल्प कालावधी | • मातृ आरोग्य, प्रसूती पूर्व काळजी (**ANC**) व प्रसूती नंतरची काळजी (**PNC**) यावर केंद्रित अभियान यांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | महिला व बाल विकास विभाग |

## १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण

| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | कुशल आरोग्य कर्मचाऱ्याद्वारे सुरक्षित प्रसूती | दर्जेदार व कुशल जन्म परिचर, आपत्कालीन प्रसूती काळजी व नवजात पुनरुज्जीवन या सेवांची उपलब्धता | अल्प कालावधी | • संस्थात्मक प्रसुतींची टक्केवारी<br>• भारतीय सार्वजनिक आरोग्य मानक (IPHS) नियमानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) , सामुदायिक आरोग्य केंद्र (CHC) यांची संख्या<br>• प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) , सामुदायिक आरोग्य केंद्र (CHC) मधील फिजिशियन / स्त्रीरोग तज्ञ / प्रसूती तज्ञ यांचे रिक्त पदांची टक्केवारी व संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |
| | | जननी सुरक्षा योजना (JSY) व जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK) यांची प्रभावी अंमलबजावणी | अल्प कालावधी | • जननी सुरक्षा योजना (JSY) अंतर्गत समाविष्ट लाभार्थी संख्या<br>• जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK) अंतर्गत समाविष्ट लाभार्थी संख्या | | |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | सुसज्ज रुग्णवाहिका यांची उपलब्धता व सदर रुग्णवाहिका सुलभतेने उपलब्ध होणे बाबत जाहिरात करणे | अल्प कालावधी | • प्रत्येक आरोग्य कक्षामध्ये उपलब्ध असलेल्या रुग्णवाहिकांची संख्या<br>• भौगोलिक दृष्ट्या वागळलेल्या भागांमध्ये उपलब्ध असलेल्या मोबाईल वैद्यकीय कक्षांची संख्या | | |
| ३ | उत्तम प्रकारे प्रसूती व नवजात बालकांची काळजी तसेच संदर्भीय सेवांची सार्वत्रिक उपलब्धता | पूर्ण सुविधा-आधारित नवजात काळजी कक्ष, नवजात स्थिरीकरण (**stabilization**) कक्ष, विशेष नवजात काळजी कक्ष (**NSCUs**) व आपत्कालीन वाहनांची उपलब्धता | अल्प कालावधी | • उपलब्ध कार्यरत उष्मयान (**incubation**) सुविधांची संख्या<br>• सामुदायिक आरोग्य केंद्र (**CHC**) मधील बालरोगतज्ञ यांचे रिक्त पदांची टक्केवारी व संख्या<br>• विशेष नवजात शिशु देखभाल कक्ष (**SNCU**) सेवा उपलब्ध असल्याची संख्या<br>• सुविधांचे अनुषंगाने संदर्भीय सेवांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| ४. | माता, नवजात, अर्भक व बाल मृत्युदर कमी करणे | महिला व ५ वर्षाखालील बालके यांचेशी निगडीत सर्व आरोग्य व पोषण याबाबत कार्यवाही करणे | अल्प कालावधी | • माता मृत्यू दर (**MMR**)<br>• नवजात मृत्यू दर (**NNMR**)<br>• अर्भक मृत्यू दर (**IMR**)<br>• बाल मृत्यू दर (**CMR**)<br>• माता व बाल मृत्युच्या संदर्भाने पूर्ण झालेल्या लेखापरीक्षणाची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | आदिवासी विकास विभाग,<br>ग्राम विकास विभाग,<br>नगर विकास विभाग |
| धोरणात्मक उपाय : १.२ | | | | | | |
| ५ | लिंग निवड पद्धत पूर्णत: बंद करून मुलींचे संरक्षण | सार्वजनिक व खाजगी सुविधांमध्ये गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदानतंत्र लिंग निवडीस प्रतिबंध अधिनियम, १९९४ (**PCPNDT**) अंतर्गत प्रक्रियांचे पालन होत असलेबाबत नियमित व पद्धतशीर निरीक्षण करणे | अल्प कालावधी | • गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदानतंत्र लिंग निवडीस प्रतिबंध अधिनियम, १९९४ (**PCPNDT**) अंतर्गत लेखापरीक्षण / निरीक्षण अहवाल<br>• लिंग निवड पद्धती माहिती प्राप्त झालेल्या प्रकरणांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | गृह विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग,<br>वैद्यकीय शिक्षण व औषधे विभाग (**MEDD**) |
| | | मुलींचा जीवन जगण्याचा, आरोग्य व पोषणाचा अधिकार सुरक्षित करणे | अल्प कालावधी | • जन्माचे लैगिक गुणोत्तर<br>• मुलींबाबत जागरूकता | सार्वजनिक आरोग्य विभाग | गृह विभाग,<br>महिला व बाल |

## १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण

| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निर्माण करण्याकरिता सार्वजनिक समर्थन, जन अभियान, वर्तनातील बदलाचे अनुषंगाने संवाद (BCC) यांची संख्या | | विकास विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधे विभाग (**MEDD)** |
| | | लिंग गुणोत्तर प्रमाण जास्त असलेली गावे / ग्राम पंचायत / वॉर्ड यांना प्रोत्साहन / पुरस्कार देणे | मध्यम कालावधी | • सुधारीत लिंग गुणोत्तर असमान स्थिती खेडे / ग्राम पंचायत / वॉर्ड नुसार लागू आहे<br>• पारितोषिक मिळालेल्या खेडे / ग्राम पंचायत यांची संख्या | महिला व बाल विकास विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | लिंग निवड पद्धती बाबत वर्तनातील बदलाचे अनुषंगाने संवाद (BCC) | लिंग – निवडक गर्भपात रोखण्याकरिता वैद्यकीय व्यवसायिक यांचे करिता वर्तनातील बदलाचे अनुषंगाने संवाद (BCC) मोहीम | अल्प कालावधी | • गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदानतंत्र लिंग निवडीस प्रतिबंध अधिनियम, १९९४ (**PCPNDT)** च्या प्रभावी अंमलबजावणी करिता आयोजित जनजागृती मोहिमांची संख्या व कायद्याचे पालन न केल्याबद्दल संबंधित दंड | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | लैंगिक समानता, मुलींचे महत्व, लैंगिक भेदभावाचा प्रभाव इत्यादींवर सामाजिक व वर्तनातील बदलाचे अनुषंगाने संवाद (**SBCC**) मोहिमांद्वारे विषम लिंग गुणोत्तर असलेल्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे | | • जनजागृती मोहिमांची संख्या | | |
| धोरणात्मक उपाय : १.३, १.४ | | | | | | |
| ६. | लसीकरण सेवा | लसीकरणाच्या वेळापत्रकानुसार लसींचे नियमित व्यवस्थापन | अल्प कालावधी | • पूर्णतः लसीकरण झालेल्या मुलांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधे विभाग (**MEDD**), ग्राम विकास विभाग |
| | | दुर्गम व आदिवासी भागात लसींचे व्यवस्थापन सुलभ होणे करिता शिबीरे | अल्प कालावधी | • प्रति खेडे / पाडा लसीकरण शिबीर संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधे विभाग (**MEDD**), ग्राम विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | स्थलांतरित, दिव्यांग व रस्त्यावरील बालके यांचेवर विशेष लक्ष केंद्रित करून अंशत: लसीकरण व लसीकरण न झालेल्या बालकांचा मागोवा घेणे | अल्प कालावधी | • अंशत: लसीकरण व लसीकरण न झालेल्यात बालकांची टक्केवारी | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधे विभाग (**MEDD**), ग्राम विकास विभाग |
| | | लसीकरणाचे अनुषंगाने माहिती, शिक्षण व संवाद (**IEC**) | अल्प कलावधी | • लसीकरण माहिती, शिक्षण व संवाद (**IEC**) च्या अनुषंगाने आयोजित मोहिमांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| ७. | अर्भक व लहान बालकांच्या आहारास प्रोत्साहन (**IYFC**) | स्तनपान व कांगारू आधारित माता काळजी (**KMC**) यास प्रोत्साहन देणे | अल्प कालावधी | • जन्मापासून एक तासाच्या आत स्तनपान करणाऱ्या ३ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांची टक्केवारी | सार्वजनिक आरोग्य विभाग | |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | • केवळ स्तनपान करणाऱ्या ६ महिन्यांपेक्षा कमी वय असलेल्या बालकांची टक्केवारी<br>• आईच्या दुधाव्यतिरिक्त अन्य पर्यायांचे विपणन व वितरण यांचे नियमन लागू करणे बाबतची कारवाई. | | |
| | | ६ महिन्यापेक्षा जास्त वयाच्या सर्व बालकांना सतत स्तनपान यासह दर्जेदार पूरक आहार यास प्रोत्साहन देणे | अल्प कालावधी | • घनरूप किंवा अर्ध- घनरूप अन्न व मातेचे दुध या दोन्ही बाबींचे सेवन करीत असलेल्या ६ ते ८ महिने वयोगटातील बालकांची टक्केवारी<br>• ६ ते २३ महिने वयोगटातील पुरेसा आहार मिळत असलेल्या बालकांची टक्केवारी<br>• अंगणवाडी (**AWWs**) सेविका यांचे मार्फत करण्यात आलेल्या | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | समुपदेशनांची संख्या | | |
| | | सार्वजनिक व कामाच्या ठिकाणी सुरक्षित परिचारिका ठिकाण विकसित करण्यास प्रोत्साहन देणे | मध्यम कालावधी | ● समर्पित लालनपालन खोली / क्षेत्र असलेल्या सार्वजनिक ठिकाणांची संख्या<br>● कामाच्या ठिकाणी स्तनपानाकारीता बालवाडी आणि समर्पित ठिकाणांबाबत नियमन सुरु करणे. | नगर विकास विभाग, रेल्वे विभाग, परिवहन विभाग, उद्योग विभाग, उर्जा व कामगार विभाग | महिला व बाल विकास विभाग |
| | | समुदाय स्तरावरील जागरूकता व वर्तनातील बदलाचे अनुषंगाने संवाद (BCC) च्या अनुषंगाने हस्तक्षेप / समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), स्तनपान आणि पूरक आहार पद्धतीवर लक्ष केंद्रित करणे | मध्यम कालावधी | ● समुदाय – आधारित हस्तक्षेप आणि जनजागृती बाबत आयोजित केलेल्या अभियानानांची संख्या<br>● स्तनपानाचे महत्व व पूरक आहार याचे लक्ष केंद्रित करून वर्तनातील बदल अनुषंगाने संवाद (BCC) बाबत आयोजित अभियानानांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरणात्मक उपाय : १.५, १.१३ | | | | | | |
| ८. | नवजात, अर्भक व बालकांना मुलभूत प्राथमिक आरोग्य सेवा प्रदान करणे | निमोनिया, अतिसार, कॉलरा, कावीळ, टीबी, तीव्र श्वसन संक्रमण, मलेरिया या सारख्या लहान मुलांमधील संसर्गजन्य व गैर – संसर्गजन्य रोगांना प्रतिबंध व व्यवस्थापन करणे. | अल्प कालावधी | • रोग निदान सुविधा, औषधे व इतर आरोग्य सेवा उपलब्ध असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र (**PHC**) , सामुदायिक आरोग्य केंद्र (**CHC**) यांची संख्या<br>• डायरियाग्रस्त बालकांना ओरल रीहायड्रेशन सॉल्ट (**ORS**) आणि झिंक दिलेल्या बालकांची टक्केवारी<br>• प्रतिबंध करता येणाऱ्या संसर्गजन्य रोगांकरिता आयोजित जनजागृती अभियानानांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग , आपल्संख्यांक विकास विभाग, महिला व बाल विकास विभाग |
| | | शहरी, ग्रामीण व आदिवासी भागात आरोग्य सेवा नसलेल्या दुर्गम व पोहोचण्यास कठीण भागात मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित | अल्प कालावधी | • झोपडपट्टी, आदिवासी वस्ती व खेड्यात पोहोचण्यास कठीण असलेल्या ठिकाणी आयोजित केलेल्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग | |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | करणे | | आरोग्य शिबिरांची संख्या<br>● आरोग्य व्यवसायिक व रुग्ण सेवक यांच्या भेटींची संख्या | | |
| ९. | सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता व आरोग्यशास्त्र (**WASH**) | सुरक्षित पिण्याचे पाणी बाबत तरतूद | अल्प कालावधी | ● सुरक्षित पिण्याचे पाणी बाबत तरतूद असलेल्या गावे / वॉर्ड यांची टक्केवारी<br>● सुरक्षित पिण्याचे पाणी तरतूद असलेल्या अंगणवाडी केंद्राची टक्केवारी<br>● सुरक्षित पिण्याचे पाणी तरतूद असलेल्या शाळांची टक्केवारी | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शालेय शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग | ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |
| | | स्वच्छता बाबतची तरतूद | अल्प कालावधी | ● प्रति १००० लोकसंख्येमागे पाण्याचे सुविधासह सार्वजनिक शौचालय उपलब्ध असलेल्या गावांची टक्केवारी<br>● घरगुती शौचालय यांची टक्केवारी | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शालेय शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग | ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | • शौचालये, मुत्रालये व हात धुण्याची केंद्रे कार्यरत असलेल्या शाळांची टक्केवारी<br>• नियतकालिक आधारभूत संरचना स्वच्छता लेखापरीक्षण अहवाल | | |
| | | सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता व स्वच्छतेशी संबंधित सुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे बाबत जागरूकता व वर्तनातील बदलाचे अनुषंगाने संवाद (**BCC**) अभियान | अल्प कालावधी | • सुरक्षित पिण्याचे पाणी बाबतचे महत्व या विषयी आयोजित अभियानानांची संख्या<br>• उघड्यावर शौचास केल्यास उदभावणारे धोक्यांना प्रतिबंध करणे बाबत आयोजित अभियानानांची संख्या<br>• हात धुवण्याचे महत्व व इतर स्वच्छता पद्धती बाबत आयोजित अभियानानांची संख्या<br>• शौचालय वापरण्याचे | | |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | महत्व व सुरक्षित स्वच्छता पद्धती यावरील अभियानानांची संख्या | | |
| १०. | दीर्घकालीन व असाध्य आजारांचे व्यवस्थापन | दीर्घकालीन व असाध्य आजारांनी ग्रस्त मुलांकरिता तृतीयक काळजी सुविधा | अल्प कालावधी | • प्रति एक लाख लोकसंख्येमागे उपलब्ध असलेल्या तृतीयक काळजी सुविधांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | | दीर्घकालीन व असाध्य आजारांनी ग्रस्त असलेल्या मुलांचे पालक / काळजी घेणाऱ्या व्यक्तींसाठी तृतीय रुग्णालयामध्ये राहण्याची व्यवस्था | अल्प कालावधी | • आरोग्य सुविधांच्या परिसरामध्ये निवास केंद्रांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | |
| | | शस्त्रक्रिया, उपचार, उपकरणे, पोषण व मुलांशी संबंधित इतर आवश्यक गरजा करिता दुर्लक्षित कुटुंबांना आर्थिक सहाय्य | अल्प कालावधी | • आर्थिक सहाय्य प्राप्त झालेल्या कुटुंबे / मुलांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>वैद्यकीय शिक्षण व औषधे विभाग (**MEDD)** | महिला व बाल विकास विभाग,<br>आदिवासी विकास विभाग,<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| धोरण प्राधान्य : १.६ | | | | | | |
| ११. | रोग व दिव्यंगाची आरंभी ओळख | जन्मजात दोष / अनुवांशिक रोग / विकासास विलंब किंवा प्रारंभिक टप्प्यावर शस्त्रक्रिया आवश्यक | अल्प कालावधी | • आघाडीचे कार्यकर्ते व राष्ट्रीय बाल स्वास्थ | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | असलेल्या मुलांची प्रारंभीक ओळख, तपासणी व आवश्यक कारवाई | | कार्यक्रम (**RBSK**) पथकामार्फत दिव्यांगत्व व अन्य आजारांची तपासणी केलेल्या मुलांची एकुण संख्या<br>● दिव्यांगत्व / आजाराची ओळख पटलेल्या मुलांची संख्या<br>● त्या संदर्भाने केलेल्या कारवाईची संख्या<br>● उपचार प्राप्त झालेल्या मुलांची संख्या | | |
| १२. | मुलांना मानसिक आरोग्य व मानसिक-सामाजिक काळजी सेवांची उपलब्धता | सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये बालकांना दर्जेदार मनसोपचार आणि मानसशास्त्रीय समुपदेशन आणि उपचार उपलब्ध करणे | मध्यम कालावधी | ● सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध मनसोपचार यांची संख्या<br>● ब्लॉक / प्रभाग स्तरावर उपलब्ध समुपदेशन केंद्राची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग,<br>नगर विकास विभाग,<br>ग्राम विकास विभाग,<br>आदिवासी विकास विभाग, |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | | | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| | | मानसिक आरोग्य समस्या असलेल्या मुलांच्या दीर्घकालीन पुनर्वसनाची तरतूद करणे | मध्यम कालावधी | ●प्रति जिल्हा पुनर्वसन केंद्रांची संख्या<br>●समावेश असलेल्या मुलांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग,<br>नगर विकास विभाग ,<br>ग्राम विकास विभाग,<br>आदिवासी विकास विभाग,<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| | | विविध वयोगटातील ( बालपण, किशोरावस्था) मुलांमधील मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत पालक, शिक्षक, समुपदेशक व इतर काळजी घेणारे यांचेमध्ये जागरूकता निर्माण करणे . | मध्यम कालावधी | ●जनजागृती अभियानानांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,<br>महिला व बाल विकास विभाग,<br>नगर विकास विभाग ,<br>ग्राम विकास |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | | | विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| | | समर्पित हेल्पलाईन व समुपदेशन सेवा | मध्यम कालावधी | ● प्रति जिल्हा समुपदेशकांची संख्या<br>● प्रति दिवस हेल्पलाईन क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या दूरध्वनी यांची संख्या | महिला व बाल विकास विभाग, राज्य मानसिक आरोग्य प्राधिकारी | महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (प्रशिक्षणाकरिता) |
| धोरण प्राधान्य : १.७, १.८, १.९ व १.१० | | | | | | |
| १३. | अन्न व पोषण सुरक्षा | सार्वजनिक वितरण प्रणाली (**PDS**) द्वारे अन्नाची उपलब्धता | अल्प कालावधी | ● प्राधान्य कुटुंब (**PHH**) अंतर्गत समावेश असलेली व प्राधान्य नसलेली कुटुंबे यांची टक्केवारी | नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | |
| | | एकात्मिक बाल विकास योजना (**ICDS**) व **APJ** कलाम अमृत आहार योजना (**AAY**) मार्फत किशोरवयीन मुलींना मदत करणाऱ्या योजनांद्वारे पौष्टिक गरम शिजवलेले जेवण व घरी | अल्प कालावधी | ● एकात्मिक बाल विकास योजना (**ICDS**) द्वारे पूरक पोषण आहार घेणाऱ्या मुलींची संख्या<br>● अमृत आहार योजना | महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | न्या शिधा (THR) ची तरतूद करणे. | | (AAY) द्वारे पूरक पोषण आहार घेणाऱ्या मुलींची संख्या<br>● किशोरवयीन मुलींकरिता सहाय्यक योजनांद्वारे पूरक पोषण आहार घेणाऱ्या किशोरवयीन मुलींची संख्या | | |
| | | मध्यान्ह भोजन (MDM) कार्यक्रमाद्वारे शिजवलेल्या गरम पौष्टिक जेवणाची तरतूद करणे | अल्प कालावधी | ● मध्यान्ह भोजन (MDM) घेणाऱ्या मुलांची संख्या | शालेय शिक्षण विभाग | नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण |
| १४. | सूक्ष्म पूरक पोषण व वाढीची देखरेख | बालकांकारिता योग्य सूक्ष्म पूरक पोषण याबाबत तरतूद असून यामध्ये जीवनसत्व 'अ', लोह व आयोडीन पूरक तसेच जंतनाशक व अतिसार नियंत्रणाकरीता उपाय समाविष्ट आहेत. | अल्प कालावधी | ● ६ ते ५९ महिने, ५ ते ९ वर्षे व १० ते १९ वयोगटातील मुलांना लोहयुक्त फॉलिक आम्ल पुरवठा झालेल्या मुलांची टक्केवारी<br>● अलबेंडाझोल (Albendazole) औषधे मिळालेल्या मुलांची टक्केवारी | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>शालेय शिक्षण विभाग | महिला व बाल विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | ● जीवनसत्व 'अ' पूरक मिळालेल्या मुलांची टक्केवारी (६ ते ५९ महिने)<br>● डायरिया ग्रस्त मुलांना तोंडावाटे देण्यात येणारे रिहायड्रेशन सॉल्ट (ORS) व झिंक दिलेल्यांची टक्केवारी | | |
| १५. | एकात्मिक बाल विकास योजना (ICDS) व राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) | एकात्मिक बाल विकास योजना (ICDS) व राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत सर्व आरोग्य व पोषण सेवांचे बळकटीकरण | अल्प कालावधी | ● ५ वर्षापेक्षा कमी वयाची खुंटलेल्या मुलांची टक्केवारी (उंचीनुसार वय )<br>● वाया गेलेल्या ५ वर्षाखालील मुलांची टक्केवारी ( उंचीनुसार वजन)<br>● गंभीररीत्या वाया गेलेल्या ५ वर्षाखालील मुलांची टक्केवारी ( उंचीनुसार वजन)<br>● ज्यांचे वजन कमी आहे | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,<br>कामगार विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | अश्या ५ वर्षाखालील मुलांची टक्केवारी (वजनानुसार वय)<br>● जास्त वजन असलेल्या ५ वर्षाखालील मुलांची टक्केवारी (उंचीनुसार वजन)<br>●एकात्मिक बाल विकास योजना (**ICDS**) सेवांचा लाभ देण्यात आलेल्या स्थलांतरित मुलांची टक्केवारी<br>●पिण्याचे पाणी, कार्यक्षम शौचालय व हात धुवण्याचे केंद्र असलेल्या अंगणवाडी केंद्रांची टक्केवारी | | |
| १६. | मध्यम व गंभीर स्वरूपाच्या कुपोषणाचे व्यवस्थापन | गंभीर तीव्र कुपोषण (**SAM**) आणि मध्यम तीव्र कुपोषण (**MAM**) बाधित मुलांचे पालक व काळजी घेणारे यांना वैद्यकीय दक्षता, काळजी, अतिरिक्त पूरक पोषण व समुपदेशन उपलब्ध | अल्प कालावधी | ० ते ६ वयोगटातील गंभीर तीव्र कुपोषण (**SAM**) / मध्यम तीव्र कुपोषण (**MAM**) / गंभीरपणे कमी वजन (**SUW**) / मध्यम कमी वजन | सार्वजनिक आरोग्य विभाग<br>महिला व बाल विकास विभाग | आदिवासी विकास विभाग<br>ग्राम विकास विभाग<br>नगर विकास |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | करून देणे.<br>ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) आणि तीव्र कुपोषणाचे समुदाय-आधारित व्यवस्थापन (CMAM) द्वारे हस्तक्षेप सक्षम करणे | | (**MUW**) बालकांची टक्केवारी %<br>● अतिरिक्त घरी न्या शिधा (**THR**) उपलब्ध करून दिलेल्या गंभीरपणे कमी वजन असलेल्या मुलांची टक्केवारी<br>● ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) द्वारे गंभीर तीव्र कुपोषण (SAM) नोंदणी झालेल्या मुलांची टक्केवारी<br>● सुविधा किंवा समुदाय आधारित तीव्र कुपोषण व्यवस्थापन (**CMAM**) अंतर्गत समाविष्ट मुलांची टक्केवारी | | विभाग |
| | | गंभीर तीव्र कुपोषण (**SAM**) आणि मध्यम तीव्र कुपोषण (**MAM**) मुलांच्या सर्वसमावेशक व्यवस्थापनासाठी सुविधा आधारित हस्तक्षेप सक्षम करणे | अल्प कालावधी | ● पोषण पुनर्वसन केंद्र (**NRCs**) / ट्यूमर पेशी अभिसरण (**CTC**) / जिल्हा प्रारंभिक हस्तक्षेप | वैद्यकीय शिक्षण व औषधे विभाग | आदिवासी विकास विभाग<br>ग्राम विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | केंद्र (**DEIC**) / बाल रोग वॉर्डमध्ये दाखल झालेल्या गंभीर तीव्र कुपोषण (SAM) मुलांची टक्केवारी<br>• पोषण पुनर्वसन केंद्र (**NRCs**) अंतर्गत जिल्हानिहाय पलंग धारण केलेबाबतचा दर<br>• ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) / पोषण पुनर्वसन केंद्र (**NRCs**) अंतर्गत गंभीर तीव्र कुपोषण (SAM) असलेल्या मुलांचा रोगमुक्तता / रोग उलटण्याचा दर<br>• पोषण पुनर्वसन केंद्र (**NRCs**) मध्ये प्रवेश केल्यामुळे वेतनास मुकलेल्या पालकांची संख्या | | नगर विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| १७. | वर्तनातील बदलाचे अनुषंगाने संवाद (**BCC**) : पालक व काळजी घेणारे यांना सहाय्य | मुलांचे कमालीचे तीव्र कुपोषण टाळण्यासाठी पालक व काळजीवाहू यांना प्रथम १००० दिवसांचे महत्व व अर्भक व लहान मुलांना आहार देणे (**IYCF**) याविषयी समुपदेशन करणे. पालक व काळजी घेणाऱ्यांसाठी समुपदेशन व वर्तनातील बदलाचे अनुषंगाने संवाद उपक्रम | मध्यम कालावधी | • अर्भक व लहान मुलांना आहार देणे (**IYCF**) बाबत आयोजित अभियांनाची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | महिला व बाल विकास विभाग |
| | | मुलांमध्ये आरोग्यदायी खाण्याच्या सवयी वाढविणे व अनारोग्यकारक अन्न (junk food) कपात करणे / टाळणे. चरबी, मीठ व साखर (HFSS) उच्च अन्नाची उपलब्धता जसे की तळलेले पदार्थ, पिझ्झा, बर्गर, गोड कार्बोनेटेड व नॉन- कार्बोनेटेड पेये शाळा किंवा महाविद्यालय परिसराच्या ५० मीटर परीघामध्ये प्रतिबंधित करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाची मार्गदर्शक तत्वे लागू करणे. तसेच शालेय उपहारगृह व जेवणामध्ये आरोग्यदायी, पौष्टिक व स्वच्छ खाण्याचे पर्याय सुनिश्चित करणे | मध्यम कालावधी | • शाळांमध्ये आरोग्यदायी खाण्याच्या सवयी करिता अन्न व औषध प्रशासनाची (FDA) मार्गदर्शक तत्वे लागू करणे<br>• समुदायामध्ये आयोजित केलेल्या अभियांनाची संख्या<br>• चांगले खाण्याच्या सवयी बाबत कार्यशाळा आयोजित केलेल्या शाळांची संख्या | अन्न व औषध प्रशासन विभाग,<br>शालेय शिक्षण विभाग | महिला व बाल विकास विभाग |

| १. कृती आराखडा- आरोग्य, पोषण आणि कल्याण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : १.१४, १.१३ | | | | | | |
| | | स्थलांतरित कुटुंबातील मुलांना मुक्कामाच्या ठिकाणी शिक्षणामध्ये प्रवेश उपलब्ध करून देणे | अल्प कालावधी | • स्थलांतरित कुटुंबातील मुलांचा शाळेत दाखल होण्याचा दर<br>• स्थलांतरित कुटुंबातील मुलांचा शाळेत कायम राहण्याचा दर | शालेय शिक्षण विभाग | महिला व बाल विकास विभाग, कामगार विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | संस्था व निवारागृहामध्ये दाखल मुलांना ( विधीसंघर्षग्रस्त मुले, कैद्यांची मुले, वेश्याव्यवसाय पिडीत महिलांची मुले) यांना अतिरिक्त | अल्प कालावधी | • औपचारिक शाळेमध्ये प्रवेश घेतलेल्या संस्थेमधील मुलांची संख्या | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | |

| २. कृती आराखडा- शिक्षण आणि विकास | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | शिक्षण सहाय्य (शिक्षक, काळजीवाहू व स्वयंसेवक) प्रदान करणे. | | • संस्थेमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या मुलांची संख्या | विभाग,<br>शालेय शिक्षण विभाग,<br>गृह विभाग | |
| | | कारागृहामध्ये मतांसोबत राहणाऱ्या ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांकरिता पूर्व-प्राथमिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे | अल्प कालावधी | • पूर्व-प्राथमिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या कारागृह (महिला) यांची टक्केवारी<br>• कारागृहामध्ये पूर्व-प्राथमिक शिक्षण प्राप्त करणाऱ्या मुलांची संख्या | गृह विभाग | शालेय शिक्षण विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग |
| | | सज्ञान होण्यापूर्वी लग्न झालेल्या मुलांची शाळेमध्ये पुनर्नोंदणी करणे करिता उपाययोजना करणे | अल्प कालावधी | • पुनर्नोंदणी झालेल्या अल्पवयीन विवाहित मुलांची संख्या | शालेय शिक्षण विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | |
| | | नागरी अशांतता व आपत्तींच्या क्षेत्रामध्ये मुलांचे शिक्षण सुरु ठेवण्याची व्यवस्था करणे | अल्प कालावधी | • नागरी अशांतता व आपत्तींच्या क्षेत्रामध्ये मुलांचे शिक्षणाकरिता सुरु केले केंद्रे /शाळा यांची संख्या<br>• केंद्रे /शाळा यांचे मार्फत उपलब्ध सुविधा प्राप्त | मदत व पुनर्वसन विभाग | महिला व बाल विकास विभाग |

| २. कृती आराखडा- शिक्षण आणि विकास | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | होणाऱ्या मुलांची संख्या | | |
| | | दुरध/असाध्य आजारग्रस्त मुलांचे शिक्षण सुरु ठेवणे करिता सहाय्य (सवलती व समुपदेशन इ.) प्रदान करणे | अल्प कालावधी | • सहाय्य प्राप्त होत असलेल्या दुरध/असाध्य आजारग्रस्त मुलांची संख्या | शालेय शिक्षण विभाग | महिला व बाल विकास विभाग |
| धोरण प्राधान्य : २.१७ | | | | | | |
| १४. | मुलींचे शिक्षण | माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण स्तरावर किशोरवयीन मुलींची शाळेमध्ये नाव नोंदणी वाढविणे व शिक्षण प्रवाहात कायम ठेवण्याचे प्रमाण सुधारणे | अल्प कालावधी | • नव्याने सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या<br>• माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये नोंदणी झालेल्या मुलींची संख्या<br>• माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या मुलींची संख्या | शालेय शिक्षण विभाग | |
| | | पुरेशा वाहतूक सुविधा, शिष्यवृत्ती / फ्री-शिप व वसतिगृहे याद्वारे किशोरवयीन मुलींचा शिक्षण प्रवेश वाढविणे | अल्प कालावधी | • भौगोलिक दृष्ट्या दुर्गम भागाशी जोडलेल्या बस सेवांची संख्या<br>• शाळेत जाणे-येणे करिता सायकल प्राप्त झालेल्या मुलींची संख्या | शालेय शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग | |

| २. कृती आराखडा- शिक्षण आणि विकास | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | • शिष्यवृत्ती / फ्री-शिप प्राप्त होणाऱ्या मुलींची संख्या<br>• मुलींकरिता असलेल्या वसतिगृहांची संख्या | | |
| | | दुर्गम व आदिवासी भागात कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (**KGBV**) चा इयत्ता १० पर्यंत विस्तार करणे | मध्यम कालावधी | • माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण उपलब्ध करून देणाऱ्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (**KGBV**) शाळांची संख्या<br>• कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (**KGBV**) द्वारे नोंदणी झालेल्या व शिक्षण पूर्ण केलेल्या मुलींची संख्या ( प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक वेगवेगळे) | शालेय शिक्षण विभाग | महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| धोरण प्राधान्य : २.१९, ८.८ | | | | | | |
| १५. | व्यवसाय व कौशल्य निर्माण | पायाभूत सुविधा, प्रशिक्षकांची गुणवत्ता, संसाधन सामुग्रीची उपलब्धता व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (**ITI**) येथे दिले जाणारे अभ्यासक्रम सक्षम करणे | अल्प कालावधी | • औद्योगिक प्रशिक्षण संस्था (**ITI**) यांची संख्या<br>• औद्योगिक प्रशिक्षण संस्था (**ITI**) येथे नोंदणी झालेल्या मुलांची संख्या व टक्केवारी | कौशल्य विकास व उद्योजगता विभाग | शालेय शिक्षण विभाग |

| २. कृती आराखडा- शिक्षण आणि विकास | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | ● प्रशिक्षक : विद्यार्थी गुणोत्तर | | |
| | | पर्यायी आराखडा विकसित करताना विशेष काळजीची गरज असलेल्या बालकांच्या गरजा लक्षात घेऊन लवचिक, संदर्भानुसार संबंधित व्यवसायिक प्रशिक्षण विकसित करणे | मध्यम कालावधी | ● स्थानिक गरजा व विशेष काळजीची गरज असलेल्या बालकांच्या गरजांवर आधारित नवीन अभ्यासक्रमांची संख्या<br>● प्रशिक्षित मुलांची संख्या | कौशल्य विकास व उद्योजगता विभाग | |
| | | शिक्षक / प्रशिक्षकांची कौशल्ये नियमितपणे अद्यावत करणे | मध्यम कालावधी | ● आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या | | |
| | | अभ्यासक्रमाकरिता नावनोंदणीमध्ये असलेली साचेबंद लिंग पद्धती काढून टाकणे | अल्प कालावधी | ● आयोजित केलेल्या विशेष जनजागृती अभियानांची संख्या<br>● विविध अभ्यासक्रमांमध्ये नोंदणी झालेले लिंग गुणोत्तर प्रमाण<br>● पारंपारिक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त नविन अभ्यासक्रम निवडलेल्या मुलींची संख्या | कौशल्य विकास व उद्योजगता विभाग<br>शालेय शिक्षण विभाग | शालेय शिक्षण विभाग |
| | | सर्व शाळांमध्ये व्यवसाय/नोकरी क्षेत्र निवडण्याकरिता समुपदेशन सुविधांची | मध्यम कालावधी | ● व्यवसाय/नोकरी क्षेत्र निवडण्याकरिता समुपदेशन | शालेय शिक्षण विभाग | महिला व बाल विकास विभाग |

| २. कृती आराखडा- शिक्षण आणि विकास | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | उपलब्धता सुनिश्चित करणे | | सुविधांची उपलब्धता असलेल्या शाळांची संख्या<br>● व्यवसाय/नोकरी क्षेत्र निवडण्याकरिता समुपदेशन सत्र आयोजित केलेल्या शाळांची संख्या | | |
| धोरण प्राधान्य : २.२०, १.१३ | | | | | | |
| १६. | जीवन कौशल्य शिक्षण, लिंग संवेदना व लिंग परिवर्तन कार्यक्रम | स्वतःची ओळख निर्माण करणे, निर्णय घेणे, गांभीर्यपूर्वक विचार, सहभाग, वाटाघाटी, समस्या सोडविणे, संवाद, सहानभूती विकसित करणे व विविधतेचा आदर करणे इत्यादी बाबत सर्वसमावेशक जीवन कौशल्य शिक्षण लागू करणे व किशोरवयीन मुलांना वेगवेगळ्या पैलूमध्ये सक्षम बनविणे | मध्यम कालावधी | ● जीवन कौशल्य शिक्षण उपलब्ध करणाऱ्या शाळांची संख्या<br>● मुला-मुलींसाठी लिंग परिवर्तन कार्यक्रम हाती घेणाऱ्या शाळांची संख्या<br>● समुदाय स्तरावर आघाडीच्या कार्यकर्त्यांचे मार्फत जीवन कौशल्य शिक्षण मिळविणाऱ्या मुलींची संख्या | शालेय शिक्षण विभाग | |
| धोरण प्राधान्य : २.२१ | | | | | | |
| १७. | मनोरंजन, खेळ व स्वरक्षण | गाव / तालुका / जिल्हा स्तरावर शाळा / सार्वजनिक ग्रंथालय स्थापित करणे | | ● गाव / तालुका / जिल्हा स्तरावर स्थापित सार्वजनिक | शालेय शिक्षण विभाग | ग्रंथालय संचनालय |

| २. कृती आराखडा- शिक्षण आणि विकास | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | ग्रंथालयांची संख्या<br>● ग्रंथालय कार्यरत असलेल्या शाळांची संख्या | | |
| | | शाळेमध्ये असलेल्या मुलांकरिता क्रीडांगणे विकसित करणे | | ● क्रीडांगणे असलेल्या शाळांची संख्या | शालेय शिक्षण विभाग | |
| | | सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये वयोगटानुसार खेळ व मनोरंजनाच्या (कला, नृत्य, संगीत, नाट्य इत्यादी) सुविधा.<br>किशोरवयीन मुलींच्या विकासाकरिता व सक्षमीकरणाकरिता खेळास प्राधान्य देणे<br>मुलींकरिता स्वसंरक्षणाच्या प्रशिक्षण संधींना प्रोत्साहन देणे | मध्यम कालावधी | ● मनोरंजन व खेळाच्या सुविधा उपलब्ध असलेल्या शाळांची संख्या<br>● मुलींच्या विकासाकरिता खेळ व स्वसंरक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देणाऱ्या शाळांची संख्या | शालेय शिक्षण विभाग | क्रीडा व युवा सेवा संचनालय |
| धोरण प्राधान्य : २.२२ | | | | | | |
| १८. | क्षमता वृद्धी | शिक्षकांकरिता नियमित /उजळणी प्रशिक्षण | मध्यम कालावधी | ● नियमित प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांची संख्या<br>● उजळणी प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांची संख्या | शालेय शिक्षण विभाग जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (**DIET**) | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (**SCERT**) |
| | | पाणी, स्वच्छता व आरोग्यशास्त्र (**WASH**) च्या घटकांसह इतर | मध्यम कालावधी | ● बाल सुरक्षा व संरक्षणाच्या विविध पैलूबाबत प्रशिक्षित | शालेय शिक्षण विभाग, | राज्य शैक्षणिक संशोधन व |

| २. कृती आराखडा- शिक्षण आणि विकास | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | प्रशिक्षण, सुरक्षा राजशिष्टाचार, पर्यावरण व हवामानातील बदल | | शिक्षकांची संख्या<br>• आरोग्य, आरोग्यशास्त्र व स्वच्छता विषयक व सुरक्षा राजशिष्टाचार या बाबत प्रशिक्षित शिक्षकांची संख्या<br>• माझी वसुंधरा मिशन आराखड्यांबाबत प्रशिक्षित शिक्षकांची संख्या<br>• विविध ऑनलाईन अध्यापन व मुल्यांकन पद्धतींबाबत प्रशिक्षित शिक्षकांची संख्या | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (**DIET**) | प्रशिक्षण परिषद (**SCERT**), पर्यावरण व हवामान बदल विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग |
| १९. | मनुष्य संसाधनामधील तफावत | सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची (सर्व स्तरावर) रिक्त पदे भरणे | मध्यम कालावधी | • रिक्त पदांची संख्या | शालेय शिक्षण विभाग | |

## ३. बाल संरक्षण

३.१ सर्व परिस्थितींतील बालकांची असुरक्षितता कमी करण्यासाठी तसेच निवास, संस्था व सार्वजनिक ठिकाणांसह इतर सर्व ठिकाणी त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी राज्य शासन सर्व बालकांकरिता एक काळजी घेणारे, सुरक्षित व योग्य वातावरण निर्माण करेल. बाल संरक्षणाच्या बहुस्तरीय स्वरूप तसेच **काळजी व संरक्षणाची निरंतरता** जाणून घेऊन त्यास राज्य शासन मान्यता प्रदान करेल. यामध्ये जागरूकता, प्रतिबंध, हस्तक्षेप आणि समस्या सोडविणे या बाबींचा समावेश असेल.

३.२ राज्य शासन ऑनलाईन व ऑफलाईन शोषण, छळ यांचा समावेश असलेली सर्व प्रकारची हिंसा, शोषण व छळापासून मुलांना प्रतिबंधित करून त्यांचे संरक्षण करेल. तसेच बालकांची काळजी, मानसिक आरोग्य आणि मानसशास्त्रीय कल्याणाला चालना देऊन पीडित बालकांना वेळेवर न्याय व हानीकारक पद्धती समाप्त करेल.

३.३ व्यक्तिगत, पर्यावरणीय किंवा व्यवस्थेतील घटकांमुळे होणा-या हिंसा, हानी किंवा शोषणाच्या घटनांपासून **जोखमीतील मुले किंवा कुटुंबांचे** संरक्षण करणे. जोखमीमध्ये असलेल्या मुलांची समावेशक यादी तयार करणे, ज्यामध्ये इतर मुलांसह दिव्यांग मुले, भिन्न लैंगिक स्वरूप किंवा लिंग ओळख असलेली मुले, द्विपालक आणि/ किंवा एकल पालक असलेली कुटुंबे, तस्करी पिडीत / तस्करी होण्याची शक्यता असलेली मुले, स्थलांतरित मजुरांची मुले, रस्त्यावरील मुले किंवा बेघर मुले, बालकामगार, दुर्धर/ असाध्य रोगाने पीडित मुले किंवा रोगग्रस्त कुटुंबातील मुले, बाल कलाकार, व्यसनाधीन मुले, विवाहित असलेली किंवा विवाहित असण्याची शक्यता असलेली अल्पवयीन मुले व शाळाबाह्य मुले यांचा समावेश असेल. तसेच, आपात्काळ/ महामारी/ रोगाची साथ यामुळे उद्भवलेल्या आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या मुलांच्या संवेदनशील स्थितीच्या संदर्भाने कृती करणे.

३.४ **असुरक्षित आणि जोखमीमध्ये असलेली मुले आणि कुटुंबांकरिता सामाजिक संरक्षण सेवांचा संबंध बळकट करणे**. सामाजिक व वर्तनाच्या बदलांच्या कृतीद्वारे नकारात्मक सामाजिक रुढींमध्ये रुपांतरण करण्यासाठी राज्य शासन उपाय करेल; व आरोग्य, शिक्षण, संरक्षण व अन्य प्रणालींमधील एकात्मिक घटक म्हणून बाल संरक्षण कर्मचारी यांची क्षमता अधिक बळकट करेल. औपचारिक शाळा प्रणाली, समुपदेशन, समवयस्क गटाचे सहकार्य आणि कौशल्य विकास व अन्य सेवा, विशेषत: बाल तस्करी होण्याची शक्यता असलेले, बाल श्रमिक, बाल विवाह होण्याची शक्यता असलेल्या बालकांकरिता संलग्नतेची खात्री करणे.

३.५ प्रायोजकत्व, पालकत्व काळजी, दत्तक घेणे व अन्य सामाजिक संरक्षण उपायांसारख्या सेवांना सक्षम करून **संस्थेव्यतिरिक्त अन्य काळजीच्या सेवांमध्ये** गुंतवणूक करणे व बळकटी देणे. जिथे कुठे योग्य असेल, तिथे मुलांना संस्थात्मक यंत्रणेपासून मुक्त करण्यास राज्य शासन प्रोत्साहन देईल.

३.६ **संस्थात्मक काळजीमध्ये असलेली सर्व मुले** (बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमामध्ये व इतर अधिनियमांमध्ये समाविष्ट असलेल्यांसह) सुरक्षित आहेत आणि त्यांची व्यापक व गुणवत्तापूर्ण

काळजी व संरक्षण दिले जात आहे, ह्याची खात्री करणे. याकरिता राज्य शासन मुलांची काळजी, सुरक्षितता, संरक्षण व त्याकरिता आवश्यक देखरेख व त्यानुषंगाने सर्व मानकांची प्रभावी अंमलबजावणी करेल. राज्य शासन हे **बालकांच्या काळजी घेणाऱ्या संस्था, आश्रम शाळा** व अन्य संस्थांमधील **मुलांच्या विरोधातील हिंसाचारावर तात्काळ कारवाई करेल**.

३.७ काळजी व संरक्षणाची गरज असलेली आणि विधीसंघर्षग्रस्त मुलांसाठी **बाल न्याय प्रणालीचे सक्षमीकरण करण्यासाठी** योग्य ते उपाय करणे. यामध्ये प्रकरण गुणवत्ता व्यवस्थापनावर आधारित प्रतिबंधात्मक, पुनर्संसंचयित, पुनर्वसन व सामाजिक पुनएकात्मीकरण सेवांचा समावेश आहे. बाल कल्याण समिती , बाल न्याय मंडळ, विशेष बाल पोलीस पथक, हरवलेल्या मुलांना शोधण्याची केंद्रे, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग अशा विविध यंत्रणांच्या प्रणालींना बळकट करण्यासाठी राज्य शासन उपाय योजना करेल.

३.८ बाल न्यायाच्या अंमलबजावणीशी संबंधित जवाबदार प्रणालींमध्ये **समन्वय आणि सामंजस्य** येण्यासाठी राज्य शासन त्यांना बळकट करण्याचे उपाय करेल ज्यामध्ये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारीत अधिनियम, २०२१; बाल व किशोरवयीन श्रमिक (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ (सुधारीत २०१६); लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (सुधारीत) अधिनियम, २०१९; बाल विवाह प्रतिबंध अधिनियम आणि व्यक्तींची तस्करी (प्रतिबंध, देखभाल व पुनर्वसन) अधिनियम, २०२१ यांचा समावेश असेल ज्याद्वारे बाल पीडितांना संरक्षण, पुनर्वसन आणि समाजात पुन्हा पुनर्स्थापित करण्यासाठी सक्षम केले जाईल.

३.९ मुलांच्या विरोधातील हिंसा प्रतिबंधित करण्यासाठी समुदाय स्तरावरील उपक्रमांना चालना देणे आणि विविध यंत्रणा ( पोलिस, न्यायालये, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, स्वयंसेवी संस्था, चाईल्डलाईन, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण इ.) यांचेमध्ये समन्वय व सामंजस्याद्वारे **सक्षम प्रतिसाद व समस्या सोडवणारी यंत्रणा उभी करणे.**

३.१० पूर, दुष्काळ, महामारी इ. **आपात्कालीन आणि आपत्तीच्या स्थितींमुळे प्रभावित मुलांना** राज्य शासन वेळेवर सहाय्य व सामाजिक संरक्षण सेवा प्रदान करेल. अनाथ झालेल्या किंवा एक पालक गमावलेल्या मुलांसाठी राज्य शासन कुटुंबातील पर्याय्री काळजी सेवांवर अधिक भर देईल.

३.११ **किशोरवयीन मुलांच्या वयात होणा-या बदलाची दाखल घेऊन** त्यांच्याशी संबंधित निवडींबद्दल त्यांचे मत विचारात घेणे. **सामंजस्याचा दृष्टीकोन ठेवणे आणि** सहमतीने होणा-या किशोरवयीन नात्यांबद्दल दंड न देणे किंवा त्यांना अपराध न मानणे.

३.१२ **ऑनलाईन सुरक्षिततेच्या संदर्भात जागरूकता वाढवण्यासाठी राज्य शासन योग्य ती कृती करेल**. इंटरनेट, विविध सामाजिक माध्यमांचे मंच, गेमिंग एप्लिकेशन्स इ. द्वारे पोर्नोग्राफी/ अनुचित आशय किंवा सायबर गुन्ह्यांच्या संपर्कापासून मुलांचा बचाव व दूर ठेवण्याकरिता पावले उचलणे. तसेच, राज्य माहिती तंत्रज्ञान

अधिनियम, २००० आणि लैंगिक छळापासून बालकांचे संरक्षण अधिनियम तसेच महिला व मुलांच्या विरोधात सायबर अपराध व सायबर त्रासास प्रतिबंध करणे करिता भारतीय दंड संहिता कलम ३५४(अ) आणि ३५४ (ड) यासारख्या अधिनियमांचीही अंमलबजावणी करेल.

३.१३ अधिक चांगली पोहोच, सेवांची गुणवत्ता आणि प्रभावी परिणाम याकरिता **स्वयंसेवी संस्था आणि समुदाय आधारित संघटना यांचे सोबत भागीदारी बळकट करणे**.

३.१४ रिक्तता, दुहेरी भुमिका, वेतनातील तफावत इ. मुद्द्यांचे निराकरण करून **बाल संरक्षण कर्मचाऱ्यांच्या मानवी संसाधन धोरणामध्ये** सुधारणा करणे. बाल संरक्षण, संस्थात्मक व संस्थाबाह्य सर्व सेवांशी निगडीत सर्व कर्मचा-यांसाठी राज्य शासन कार्यबळ विकास आणि नियमित क्षमता बांधणी (तांत्रिक कौशल्ये तसेच सोपी कौशल्ये) यामध्ये गुंतवणूक करेल. पोलिस, आरोग्य/ रुग्णालय कर्मचारी अशा अन्य सहाय्यक व संबंधित सेवांची नियमित प्रकारे क्षमता वाढीकरिता राज्य शासन प्रयत्न करेल.

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : ३.१, ३.२, ३.९ | | | | | | |
| १. | बाल संरक्षणाबद्दल सामान्य जागरूकता सुधारणे | शाश्वत अभियानाद्वारे सर्व स्तरावर म्हणजेच कुटुंब, अतिपरिचित क्षेत्रे, समुदाय, शाळा, संस्था, मोक्याची ठिकाणे इत्यादी ठिकाणी बाल संरक्षण आणि कायद्याबद्दल सर्व सामान्य नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे. | अल्प कालावधी | • जनजागृती अभियानांची संख्या<br>• बाल हक्क सप्ताहादरम्यान (१४ ते २१ नोव्हेंबर) सखोल जनजागृती अभियान | महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचनालय | शालेय शिक्षण विभाग, नगर विकास विभाग , अधिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग |
| | | वेगवेगळ्या प्रकारच्या शोषण आणि हिंसेबाबत मुलांना शिक्षित करण्यासाठी वयोमानानुसार मुलांकरिता योग्य व बालस्नेही संसाधन सामग्रीचा प्रसार करणे तसेच माहिती / तक्रार देण्यासाठी आणि मदत मिळेल याबाबत त्यांचा आत्मविश्वास वाढवा. | अल्प कालावधी | • शाळा, बालकांच्या काळजी घेणाऱ्या संस्था व समाज स्तर या विविध स्तरांवर आयोजित केलेल्या कार्यशाळांची संख्या | महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचनालय | शालेय शिक्षण विभाग, नगर विकास विभाग , अधिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग |
| २. | हिंसा, अत्याचार आणि दुर्लक्ष यापासून मुलांचे संरक्षण आणि प्रतिबंध | सर्व सार्वजनिक आणि खाजगी संस्था, जागा आणि सुविधा जसे की AWCs, शाळा, आरोग्य सुविधा, रुग्णालये, | अल्प कालावधी | • पूर्व शालेय /शाळा / बालकांच्या काळजी घेणाऱ्या संस्था आणि इतर | महिला व बाल विकास विभाग, शालेय शिक्षण | नगर विकास विभाग, ग्राम विकास |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | CCIs, वाहतूक सुविधा इत्यादींमध्ये मुलांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुरक्षिततेसाठी धोरणे आणि प्रक्रिया आहेत. | | संस्थांमध्ये बाल सुरक्षा आणि संरक्षण धोरण<br>● आरोग्य आणि रुग्णालयातील सुविधांमध्ये बाल संरक्षण धोरण<br>● सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये वैयक्तिक सुरक्षिततेबाबत जागरुकतेसह सुरक्षित वाहतूक धोरण | विभाग,<br>सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>वैद्यकीय शिक्षण विभाग,<br>रेल्वे महामार्ग पोलीस,<br>राज्य परिवहन सुविधा | विभाग |
| | मुलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचारास प्रतिसाद | बाल संरक्षणचे कामकाज करणाऱ्या यंत्रणाच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे. त्यामध्ये पोलिस, न्यायालय, बाल कल्याण समिती ,चाइल्डलाइन , जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांची सक्षमीकरण व निवारण यंत्रणा विकसित करणे. | अल्प कालावधी | ● मुलांविरुद्ध झालेल्या गुन्ह्याची नोंद झालेली संख्या | महिला व बाल विकास विभाग,<br>गृह विभाग,<br>विधी व न्याय विभाग | |
| | | प्रतिसाद आणि निवारणाच्या योग्य | अल्प | ● मुलांविरुद्ध झालेल्या | महिला व बाल | |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | प्रक्रियेचे पालन करणे | कालावधी | गुन्ह्याची नोंद झालेली संख्या<br>• निकाली काढलेल्या प्रकरणांची संख्या | विकास विभाग,<br>गृह विभाग,<br>विधी व न्याय विभाग | |
| धोरण प्राधान्य : ३.३, ३.४ | | | | | | |
| ३. | जोखीम असलेल्या मुलांचे/कुटुंबांचे संरक्षण | जोखीम असलेली कुटुंबे आणि मुलांची लोकसंख्या शास्त्रीय रचनेसह सर्वसमावेशक असुरक्षा रेखांकन आयोजित करणे. | अल्प कालावधी | लोकसंख्या शास्त्रीय रचना आणि असुरक्षितता पूर्ण झाल्याचे सुनिश्चितता करणे | महिला व बाल विकास विभाग,<br>गृह विभाग | आदिवासी विकास विभाग,<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,<br>नगर विकास विभाग,<br>ग्राम विकास विभाग,<br>अल्पसंख्यांक विकास विभाग,<br>बहुजन विकास विभाग |
| | | जोखीम असलेली मुले आणि त्यांच्या कुटुंबांना शासकीय सामाजिक सुरक्षा | अल्प कालावधी | विविध शासकीय योजनांतर्गत समाविष्ट | महिला व बाल विकास विभाग, | आदिवासी विकास विभाग, |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | आणि उपजीविका उपक्रमांशी जोडणे | | मुलांची संख्या | गृह विभाग | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, बहुजन विकास विभाग |
| | | जोखीम असलेल्या मुलांचे पुनर्वसन आणि प्रतिबंध करण्यासाठी बाल संरक्षण योजना सक्षम करणे<br>१८ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी पाळणाघर /ड्रॉप-इन केंद्रांसारख्या काळजी घेण्याच्या सुविधांचा विस्तार करणे | अल्प कालावधी | लाभार्थ्यांची संख्या (वेगवेगळ्या योजनेनुसार) | महिला व बाल विकास विभाग, गृह विभाग | आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, बहुजन विकास विभाग |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | बाल संरक्षण, कुटुंब बळकटीकरण सेवा आणि इतर सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये प्रवेश सुनिश्चित करून जोखीम असलेली मुले आणि कुटुंबांना ओळखण्यासाठी आणि त्यांना समर्थन देण्यासाठी बाल संरक्षण समितीला सक्षम करणे | अल्प कालावधी | • सक्रिय बाल संरक्षण समितीची टक्केवारी<br>• प्रशिक्षित बाल संरक्षण समितीची टक्केवारी<br>• जोखीम असलेल्या मुलांची आणि कुटुंबांची संख्या ओळखणे आणि समर्थित/संदर्भित करणे | महिला व बाल विकास विभाग, गृह विभाग | आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, बहुजन विकास विभाग |
| ४. | बालविवाह प्रतिबंध | बालविवाहाच्या विरोधात स्थानिक नेते, बालकांसाठी काम करणाऱ्या संस्था आणि स्थानिक पातळीवरील गावातील नेते यांचा समवेत मोहीम आयोजित करणे. | अल्प कालावधी | • जनजागृती अभीयानांची संख्या | महिला व बाल विकास | शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, |
| | | विशेषतः मुलींना माध्यमिक / उच्च माध्यमिक शिक्षणाला प्रोत्साहन देणे | अल्प कालावधी | • माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर धारण दर | शालेय शिक्षण विभाग | नगर विकास विभाग, |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | (लिंग निहाय वेग-वेगळे)<br>● माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांवर पूर्णता दर (लिंग निहाय वेग-वेगळे) | | ग्राम विकास विभाग,<br>कौशल्य विकास विभाग |
| | | किशोरवयीन मुलींसाठी योजना, राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम (RKSK) यासारख्या किशोरवयीन विशिष्ट योजनांची अंमलबजावणी सक्षम करणे. | अल्प कालावधी | ● या योजनांतर्गत समाविष्ट किशोरवयीन मुलांची संख्या | महिला व बाल विकास विभाग | नगर विकास विभाग,<br>ग्राम विकास विभाग,<br>अधिवासी विकास विभाग |
| | राज्यात बालविवाह कायदा व नियमांची अंमलबजावणी | राज्य स्तरावर नियम तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे. | अल्प कालावधी | ● राज्य नियम तयार करणे<br>● सर्व भागधारकांना नियमांचे प्रशिक्षण देणे | महिला व बाल विकास विभाग | नगर विकास विभाग,<br>ग्राम विकास विभाग,<br>आदिवासी विकास विभाग |
| | | बालविवाह प्रतिबंधक अधिकारी (CMPO) आणि संबंधित अधिकारी | अल्प कालावधी | ● आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या | महिला व बाल विकास विभाग | नगर विकास विभाग, |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | आणि नागरी समाज सदस्यांचे नियमित प्रशिक्षण | | | | ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | उच्च बालविवाह घटना घडणाऱ्या जिल्हांवर लक्ष केंद्रित करणे आणि भिन्न धोरण स्वीकारणे | अल्प कालावधी | • नोंदणीकृत विवाहांची टक्केवारी<br>• उच्च प्राधान्य असलेल्या जिल्ह्यांमध्ये बालविवाहाच्या घटनांमध्ये घट | महिला व बाल विकास विभाग | नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| ५. | बालमजुरी प्रतिबंध, सुटका आणि पुनर्वसन | धोकादायक व्यवसाय आणि प्रक्रियांमध्ये काम करणाऱ्या 18 वर्षाखालील मुलांना वाचवणे आणि त्यांचे पुनर्वसन करणे. | अल्प कालावधी | • सुटका करण्यात आलेल्या बालकामगारांची संख्या<br>• पुनर्वसन झालेल्या बालकामगारांची संख्या<br>• केलेल्या तपासणी / छाप्यांची संख्या | कामगार विभाग | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| | | गैर-धोकादायक व्यवसाय आणि | अल्प कालावधी | • बाल कामगार म्हणून | कामगार विभाग | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | प्रक्रियांमध्ये काम करणाऱ्या मुलांचे काटेकोरपणे निरीक्षण करणे आणि कारवाई करणे | | सुटका केलेल्या बालकांची संख्या<br>• केलेल्या तपासणी / छाप्यांची संख्या | | विभाग |
| | | विशेषत: शहरी भागात घरगुती बालमजुरी रोखणे आणि प्लेसमेंट एजन्सीं साठी नियमवली करणे. गृहनिर्माण संस्थेतील बालमजुरी बाबत नियमांची खात्री करणे | अल्प कालावधी | • प्लेसमेंट एजन्सीचे नियमन<br>• नियमावली लागू करणाऱ्या गृहनिर्माण संस्थांची संख्या | कामगार विभाग | गृहनिर्माण मंडळ |
| | | किशोरवयीन मुलांसाठी उच्च माध्यमिक शिक्षणाला प्रोत्साहन देणे | मध्यम कालावधी | • नावनोंदणी, धारणा आणि उच्च माध्यमिक स्तराचा दर<br>• शाळाबाह्य मुलांची पुनर्नोंदणी | कामगार विभाग | ग्राम विकास विभाग<br>नगर विकास विभाग<br>आदिवासी विकास विभाग |
| | | राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (NCLP) कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करणे | मध्यम कालावधी | • राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (NCLP) कार्यक्रमांतर्गत समाविष्ट | कामगार विभाग | कौशल्य विकास विभाग |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | मुलांची संख्या<br>• विशेष प्रशिक्षण केंद्रांतर्गत (STCs) नोंदणी केलेल्या मुलांची संख्या | | |
| ६. | बाल तस्करी प्रतिबंध, सुटका आणि पुनर्वसन | लहान मुलांच्या तस्करीबाबत वाहतूक केंद्रे, राज्य सीमा, किनारी भाग, सार्वजनिक ठिकाणी दक्षता यंत्रणा सक्षम करणे | मध्यम कालावधी | • पोलिस, सीमा सुरक्षा कर्मचारी, रेल्वे संरक्षण दल, विमानतळ कर्मचारी, बस डेपो कर्मचारी, तटरक्षक दल यांना बाल तस्करीच्या मुद्द्यावर देण्यात आलेल्या प्रशिक्षणाची संख्या | गृह विभाग,<br>वाहतूक विभाग,<br>रेल्वे महामार्ग,<br>भारतीय विमानतळ प्राधिकरण,<br>कामगार विभाग | महिला व बाल विकास विभाग |
| | | व्यावसायिक लैंगिक शोषण (CSEC), बालमजुरी, बेकायदेशीर दत्तक, बालविवाह इत्यादींसाठी तस्करी केलेल्या १८ वर्षांखालील मुलांची सुटका करणे आणि त्यांचे पुनर्वसन करणे | अल्प कालावधी | • सुटका करण्यात आलेल्या मुलांची संख्या<br>• पुनर्वसन करण्यात आलेल्या मुलांची संख्या | गृह विभाग,<br>कामगार विभाग<br>महिला व बाल विकास विभाग | ग्राम विकास विभाग,<br>नगर विकास विभाग |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | विशेषत: तस्करीचे प्रमाण जास्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्ह्यांमध्ये मानवी तस्करीविरोधी कक्ष (AHTUs) बळकट करणे | अल्प कालावधी | • स्थापित आणि कार्यरत मानवी तस्करीविरोधी कक्ष यांची संख्या<br>• मानवी तस्करीविरोधी कक्ष कर्मचाऱ्यांसाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या | गृह विभाग | महिला व बाल विकास विभाग |
| | | बाल तक्रारी पासून मुलांचे संरक्षण करणारी यंत्रणा मधील समन्वय सक्षम करणे | अल्प कालावधी | • आंतरराज्य तस्करीच्या प्रकरणांची संख्या<br>• मुलांच्या तस्करीच्या अनुषंगाने कारवाईचा अहवाल | गृह विभाग, महिला व बाल विकास विभाग , कामगार विभाग | |
| | | तस्करीविरोधी राज्य कृती आराखडा लागू करणे | अल्प कालावधी | • तस्करीविरोधी राज्य कृती आराखडा प्रगती अहवाल | गृह विभाग, महिला व बाल विकास विभाग , कामगार विभाग | |
| | | पीडितांसाठी भरपाई तरतूद सक्षम | अल्प कालावधी | • पीडित भरपाई प्रदान | | |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | करणे | | केलेल्या प्रकरणांची संख्या | | |
| धोरण प्राधान्य ३.५ | | | | | | |
| ७. | मुलासाठी संस्था बाह्य सेवा सक्षम करणे | कुटुंब बळकटीकरण, डे-केअर, प्रायोजकत्व व प्रतिपालकत्व सारख्या गेटकीपिंगद्वारे संस्था बाह्य सेवा सक्षम करणे<br>कुटुंब शोध, पुनर्वसन, सामाजिक पुनर्एकीकरण या पद्धती सक्षम करणे | अल्प कालावधी | • संस्था बाह्य काळजी सेवा अंतर्गत समाविष्ट मुलांची संख्या (सेवांच्या प्रकारांनुसार वर्गीकृत)<br>• संस्थात्मक नसलेल्या आणि संस्था बाह्य सेवा प्रदान केलेल्या मुलांची संख्या | महिला व बाल विकास विभाग | शालेय शिक्षण विभाग |
| ७. | | बालक दत्तक घेण्याची प्रक्रिया सुलभ करणे व बेकायदेशीर बालक दत्तक घेण्यास प्रतिबंध करण्यासाठी पावले उचलण्यात यावी | मध्यम कालावधी | • बेकायदेशीरपणे मूले दत्तक घेतल्याबद्दल नोंदवलेल्या गुन्ह्यांची संख्या | महिलाव व बाल विकास विभाग (राज्य दत्तक स्त्रोत)<br>गृह विभाग | विधी व न्याय विभाग |
| | | नियमित मार्गदर्शन आणि परस्पर सहकार्य याद्वारे संस्था बाह्य काळजीची | मध्यम कालावधी | • कामगार:केस व्यवस्थापनसाठी | महिला व बाल विकास विभाग | |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | गरज असणाऱ्या बालकांसाठी प्रकरण व्यवस्थापन सक्षम करणे | | बालकांचे प्रमाण | | |
| धोरण प्राधान्य ३.६ | | | | | | |
| ८. | बाल न्याय व्यवस्था मजबूत करणे | सर्व बालकांच्या काळजी घेणाऱ्या संस्थांची नोंदणी (CCIs) | अल्पकालीन | • नोंदणीकृत बालगृहांची संख्या | महिला व बाल विकास विभाग,<br>विधी व न्याय विभाग | |
| | | काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके व विधीसंघर्षग्रस्त बालके यांच्या साठी असणाऱ्या सर्वसाधारण कार्यपद्धती सक्षम करणे | अल्प कालावधी | • बालगृहांमध्ये केलेल्या तपासणी यांची संख्या<br>• मूल्यांकन आणि सामाजिक लेखापरीक्षणांची संख्या, आणि केलेल्या कार्यवाहीची संख्या | महिला व बाल विकास विभाग | |
| | | सुरक्षित ठिकाण, बाल न्यायालय, व्यसनमुक्ती सुविधांसह आवश्यक संरचना आणि सेवा सक्षम करणे | अल्प कालावधी | • बाल न्यायालयांची संख्या<br>• बाल न्यायालय मार्फत प्रकरण व्याप्ती संख्या<br>• अभियोग व शिक्षा दर<br>• बालकांना उपलब्ध करून | महिला व बाल विकास विभाग,<br>विधी व न्याय विभाग | |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | दिलेले व्यसनमुक्ती केंद्रांची संख्या<br>● सुरक्षित ठिकाण या सेवेमध्ये समाविष्ट बालकांची संख्या | | |
| | | बाल न्याय एमआयएस व माहिती प्रणालीचे एकत्रीकरण आणि तंत्रज्ञानाचा वापर करणे | मध्यम कालावधी | ● बाल न्याय एमआयएस व इतर बाल संरक्षण माहिती प्रणालीचे एकत्रीकरण | महिला व बाल विकास विभाग,<br>विधी व न्याय विभाग | |
| | इतर संस्थांमधील बालकांची काळजी (कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, आश्रमशाळा, वसतिगृह) | पर्यवेक्षीय यंत्रणेसह बाल संरक्षण धोरण व सर्व निवासी संस्था / सुविधांमध्ये पाठपुरावा | | ● मुलांचे रक्षण करण्याचे धोरण<br>● आढावा अहवाल | शालेय शिक्षण विभाग,<br>आदिवासी विकास विभाग | महिला व बाल विकास विभाग |
| | | मुलांची काळजी, सुरक्षा, संरक्षण या मानकांची व्यापक अंमलबजावणी व देखरेख | अल्प कालावधी | ● हिंसाचार, गैरवर्तणूक आणि दुर्लक्ष या नोंदविल्या गेलेल्या प्रकरणांची संख्या | आदिवासी विकास विभाग,<br>सामाजिक न्याय कक्ष | महिला व बाल विकास विभाग |
| | | सदर संस्थांद्वारे प्रदान केलेल्या सेवांची | अल्प | ● केलेल्या लेखापरीक्षणांची | आदिवासी विकास | महिला व बाल |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | नियमित तपासणी आणि लेखापरीक्षण | कालावधी | संख्या<br>• हिंसाचार, गैरवर्तणूक आणि दुर्लक्ष या नोंदविल्या गेलेल्या प्रकरणांची संख्या<br>• निवारण झालेल्या प्रकरणांची संख्या | विभाग,<br>सामाजिक न्याय कक्ष | विकास विभाग |
| | विधीसंघर्ष ग्रस्त बालकांची काळजी | विधीसंघर्ष ग्रस्त बालक यांचे बाबतची प्रक्रिया व सेवा सक्षम करणे | अल्प कालावधी | • बाल न्याय मंडळाने दाखल करून घेतलेल्या प्रकरणांची संख्या<br>• स्थापित तक्रार निवारण प्रणाली असलेल्या संस्थांची संख्या | | |
| | | सर्व निरीक्षणगृहे, विशेष गृहे व सुरक्षित ठिकाणे येथे विधीसंघर्ष ग्रस्त यांचे सोबत काम करणारे परीविक्षा अधिकारी व समुपदेशक यांचे प्रशिक्षणाकरिता अभ्यासक्रम सक्षम करणे व विधीसंघर्ष ग्रस्त बालकांच्या विशेष गरजा पूर्ण | अल्प कालावधी | • अभ्यासक्रमाचा आढावा व बदल<br>• प्रशिक्षित परीविक्षा अधिकारी यांची संख्या<br>• प्रशिक्षित समुपदेशकांच्या संवर्गाची संख्या | | SDED |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | करणे करिता त्यांना संवेदानशील करणे करिता पावले उचलणे. | | | | |
| | | बाल न्याय अधिनियमाअंतर्गत पुरेसे व प्रशिक्षित मानसिक आरोग्य चिकित्सकांची उपलब्धता सुनिश्चित करणे | अल्प कालावधी | • प्रशिक्षित मानसिक आरोग्य चिकित्सकांची संख्या | महिला व बाल विकास विभाग,<br>गृह विभाग,<br>विधी व न्याय विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| | | विधीसंघर्ष ग्रस्त मुलांचे सर्वांगीण पुनर्वसन आणि सामाजिक पुनएकीकरण | अल्प कालावधी | • पुनर्वसन आणि सामाजिक पुनएकीकरण झालेल्या प्रकरणांची संख्या<br>• पुनर्वसन पर्याय उपलब्ध करून दिलेल्या प्रकरणांची संख्या | महिला व बाल विकास विभाग,<br>गृह विभाग,<br>विधी व न्याय विभाग | |
| | अनुरक्षण आणि काळजीच्या कक्षेतून बाहेर पडलेल्यांना सहाय्य | काळजीच्या कक्षेतून बाहेर पडलेल्यांसाठी पूर्व-अनुरक्षण, अनुरक्षण आणि सेवांचे सातत्य सक्षम करणे<br>वसतिगृहात दाखल नसलेल्या काळजीवाहू व्यक्तींसाठी समर्थन | अल्प कालावधी | • अनुरक्षण गृह अंतर्गत लाभार्थाची संख्या ( शासकीय व स्वंयसेवी द्वारे वर्गीकृत)<br>• आर्थिक सहाय्य व इतर पुनर्वसन पर्यायांचा वापर | महिला व बाल विकास विभाग,<br>गृह विभाग,<br>विधी व न्याय विभाग | |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | कार्यक्रम सक्षम करणे<br>अनुरक्षण गृह / वसतिगृहांची संख्या वाढविणे | | करून समर्थन दिलेल्या काळजीवाहू व्यक्तींची संख्या | | |
| | | प्रशिक्षण आणि सहाय्यक पर्यवेक्षण / मार्गदर्शनाद्वारे प्रकरण व्यवस्थापन प्रणाली सक्षम करणे | अल्प कालावधी | • आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या<br>• तयार केलेल्या सहाय्यक पर्यवेक्षण संधींची संख्या | महिला व बाल विकास विभाग,<br>गृह विभाग,<br>विधी व न्याय विभाग | |
| धोरण प्राधान्य ३.७ | | | | | | |
| ९. | बाल न्याय व्यवस्थेचे प्रशासन सक्षम करणे | एकात्मिक बाल संरक्षण योजना, संरक्षण अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हि रिक्त पदे विभाग निहाय भरणे | अल्प कालावधी | • एकात्मिक बाल संरक्षण योजना, संरक्षण अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हि रिक्त पदे भरल्याची टक्केवारी | महिला व बाल विकास विभाग | |
| | | बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, विशेष बाल पोलीस पथक व हरवलेल्या मुलांचा शोध संस्था या विद्यमान संरचना व प्रक्रिया सक्रीय | अल्प कालावधी | • (बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, विशेष बाल पोलीस पथक व हरवलेल्या मुलांचा शोध संस्था) मध्ये भरलेल्या | महिला व बाल विकास विभाग,<br>विधी व न्याय विभाग,<br>जिल्हा विधी सेवा | वित्त विभाग,<br>शालेय शिक्षण विभाग,<br>क्रीडा व युवा विभाग, |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | करणे व पूर्णपणे कार्यान्वित करणे | | पदांची टक्केवारी<br>• कार्यरत हरवलेल्या मुलांचा शोध घेणाऱ्या केंद्रांची संख्या<br>• बाल न्याय संरचना बाबतचा वार्षिक लेखा परीक्षण अहवाल | प्राधिकरण,<br>गृह विभाग | कौशल्य विकास विभाग, |
| | | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग सक्षम करणे | अल्प कालावधी | • विहित मुदतीमध्ये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग सदस्यांची नियुक्ती करणे | महिला व बाल विकास विभाग | |
| धोरण प्राधान्य ३.८ | | | | | | |
| | | बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण, बालकांचे बाल विवाहापासून संरक्षण, बाल मजुरी प्रतिबंध व नियमन यांचे अंमलबजावणीची जबाबदारी असलेल्या प्रणालींसोबत अभिसरण व समन्वय वाढविणे जेणेकरून पिडीत | अल्प कालावधी | • झालेल्या अभिसरण बैठकांची संख्या | सर्व संबंधित विभाग | |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | बालकांची काळजी, संरक्षण, पुनर्वसन व पुनएकीकरण सक्षम होईल. | | | | |
| धोरण प्राधान्य ३.१०, १०.६, १०.७ | | | | | | |
| १०. | आणीबाणी व आपत्ती मुळे प्रभावित बालके | आणीबाणी आणि आपत्तीच्या परिस्थितीमुळे प्रभावित झालेल्या मुलांकरिता बाल संरक्षण सेवा सक्षम करणे (शोध व पाठपुरावा, नियमित आवश्यक सेवांची तरतूद, अनाथ मुलांना प्राधान्याने कुटुंब आधारित पर्यायी सेवांद्वारे जोडणे, आवश्यकतेनुसार संस्थात्मक काळजी) | अल्प कालावधी | • आणीबाणी व आपत्तीमुळे अनाथ झालेल्या मुलांची संख्या<br>• कुटुंब आधारित पर्यायी सेवांद्वारे जोडण्यात आलेल्या मुलांची संख्या<br>• संस्थांमध्ये दाखल मुलांची संख्या | महसूल विभाग | शालेय शिक्षण विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग,<br>ग्राम विकास विभाग,<br>नगर विकास विभाग,<br>विधी व न्याय विभाग |
| धोरण प्राधान्य ३.११ | | | | | | |
| ११. | जागरूकतेपासून किशोरवयीन मुलांचे संरक्षण | जागरूकता निर्माण करणे व या काळामध्ये किशोरवयीन मुलांशी वागणुकीबाबत व त्यांच्या शाररीक आणि भावनिक संक्रमणाबाबत समुदाय, पालक, शिक्षक, पोलीस, न्यायालय व | अल्प कालावधी | • आयोजित करण्यात आलेल्या अभियानांची संख्या<br>• पोलीस, शिक्षक व बाल विवाह प्रतिबधक अधिकारी यांचे प्रशिक्षण | महिला व बाल विकास विभाग,<br>गृह विभाग,<br>शालेय शिक्षण विभाग,<br>विधी व न्याय विभाग | ग्राम विकास विभाग,<br>नगर विकास विभाग,<br>आदिवासी विकास विभाग |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | इतरांना संवेदानशील करणे | | कार्यक्रमांचा आढावा घेणे | | |
| | | सतर्क गट व नैतिक पोलिसिंग पासून किशोरवयीन मुलांचे संरक्षण करणे | | • नोंदविली गेलेली हिंसाचाराची प्रकरणे | महिला व बाल विकास विभाग,<br>गृह विभाग,<br>शालेय शिक्षण विभाग,<br>विधी व न्याय विभाग | |
| | | प्रेम / प्रकरण, बाल विवाह, पळून जाणे इत्यादी प्रकरणांमध्ये त्वरित कायदेशीर मदत व निवारण प्रदान करणे | | • कायदेशीर मदत प्रदान केलेल्या प्रकरणांची संख्या | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण | महिला व बाल विकास विभाग |
| धोरण प्राधान्य ३.१२ | | | | | | |
| १२. | ऑनलाईन सुरक्षिततेचा प्रसार करणे व मुलांवरील गुन्हांना प्रतिबंध करणे | वयोग्य सामुग्री, प्रोनोग्राफी व इतर अयोग्य सामुग्री माध्यमाद्वारे मुलांचे प्रदर्षण नियंत्रित करण्याच्या विविध मार्गाबाबत जागरूकता निर्माण करणे<br>शाळा, महाविद्यालये, सामुदायिक केंद्रे | अल्प कालावधी | • शिक्षकांकरिता शाळांमध्ये आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांची संख्या<br>• मुलांकरिता शाळांमध्ये आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांची संख्या | शालेय शिक्षण विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | व इतर सार्वजनिक प्रणालींमध्ये मुले व किशोरवयीन मुलांना वैयक्तिक सुरक्षा शिक्षण दिले जाते | | • समुदाय स्तरावर बाल संरक्षण समित्यांमार्फत आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांची संख्या | | |
| | | बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, माहिती व तंत्रज्ञान अधिनियम याद्वारे विविध अहवाल तंत्रज्ञानाबाबतचे ज्ञान वाढविणे | अल्प कालावधी | • बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, माहिती व तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत नोंदविलेल्या प्रकरणांची संख्या | महिला व बाल विकास विभाग, गृह विभाग | माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| | | शारीरीक लज्जा, सायबर गुंडगिरी, अश्लील सामुग्री, जाळ्यात अडकविणे (phishing), खोट्या बातम्या, गेमिंग व्यसन इत्यादींपासून मुलांना रोखणे करिता ऑनलाईन सुरक्षिततेच्या विविध पैलूंबाबत मुले, पालक व शिक्षक यांचेसोबत नियमित कार्यशाळा आयोजित करणे | अल्प कालावधी | • आयोजित केलेल्या कार्यशाळांची संख्या | महिला व बाल विकास विभाग, गृह विभाग | |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य ३.१४ | | | | | | |
| १३ | मुलांच्या संरक्षणाकरिता मनुष्यबळ संसाधन | जिल्हा बाल संरक्षण कक्ष, संरक्षण अधिकारी, बाल न्याय मंडळ, विशेष न्याय पोलीस कक्ष, बाल कल्याण समिती व हरवलेल्या मुलांचा शोध घेणारे केंद्र या मधील सर्व रिक्त पदांची भरती करणे | अल्प कालावधी | • रिक्त पदांची टक्केवारी (श्रेणी -निहाय)<br>• | महिला व बाल विकास विभाग,<br>जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,<br>गृह विभाग | |
| | | बाल संरक्षण कार्यबळ जसे की, संरक्षण अधिकारी, न्यायाधीश, सरकारी वकील, पोलीस, आरोग्य कर्मचारी, बाल कल्याण समिती, सदस्य, संस्थात्मक कर्मचारी व इतर यांची बाल संरक्षण समस्यांबाबत क्षमता वाढविणे व त्याची सुनिश्चितता करणे. तसेच तांत्रिक व सोप्या पद्धती वापरण्याकरिता क्षमता वाढविणे | अल्प कालावधी | • आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या ( समूह निहाय वेगवेगळे) | महिला व बाल विकास विभाग | महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था, पुणे |
| | | चाईल्ड लाईन सेवांची व्याप्ती वाढविणे | अल्प कालावधी | • व्यापलेल्या जिल्ह्यांची संख्या | महिला व बाल विकास विभाग | गृह विभाग,<br>विधी व न्याय विभाग |

| ३. कृती आराखडा- बाल संरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | • त्रासग्रस्त प्राप्त दुरध्वनी संख्या | | |

## ४. बाल सहभाग

### धोरणात्मक उपाय

४.१ राज्य शासन सर्व मुलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देईल, आणि त्यांच्या वयानुसार आणि विकसित क्षमतेनुसार त्यांचे **विचार व्यक्त करण्यासाठी सक्षम वातावरण, संधी प्रदान करेल**.

४.२ राज्य शासनाच्या सर्व स्तरांवर बालकांचा सहभाग निर्माण करेल, प्रोत्साहन देईल आणि टिकवून ठेवेल. राज्य शासन **सर्व मुलांना समान संधी** उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांची मते आणि अभिप्राय हे निर्णय प्रक्रियेत समाविष्ट करण्यासाठी **यंत्रणांना प्रोत्साहन** देईल. अपंग मुले, गरीब सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी, भिन्नता/अनुरूप नसलेली लिंग प्राधान्ये, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि धार्मिक अल्पसंख्याक मुले यासारख्या **उपेक्षित गटातील मुलांचा सहभाग सुनिश्चित** करण्यासाठी राज्य पावले उचलेल.

४.३. **स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मुलांचा सहभाग संस्थात्मक** करा. सर्व गावे /वॉर्ड /ब्लॉक /जिल्ह्यांमध्ये अनिवार्य बालसभा आणि बाल पंचायती स्थापन करा आणि इतर संस्थांमध्ये मुलांच्या नियमित आणि अर्थपूर्ण सहभागाला चालना द्या. ग्रामसभा / वॉर्ड सभा आणि निवडून आलेल्या संस्थांसारख्या नागरी सहभागाच्या व्यासपीठांसह बालसभा / पंचायती यांच्यात संवाद साधण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि राजशिष्टाचार मसुदा तयार करणे आणि अंमलात आणणे.

४.४. आश्रमशाळा, बालगृह इत्यादींसह **बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थांमध्ये मुलांचा सहभाग वाढवणे आणि प्रोत्साहन देणे**.

४.५. निवास, शाळा, सार्वजनिक जागा आणि सेवा वितरण संस्थांमध्ये निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत मुलांच्या सहभागाकडे सकारात्मक दृष्टीकोन वाढवण्यासाठी नियमित अंतराने **कार्यकर्ता / कर्तव्य धारक** (पालक, काळजी घेणाऱ्यांसह) **क्षमता निर्माण** करणे.

४.६. मुलांशी संबंधित सर्व बाबींमध्ये सक्रिय सहभाग घेण्यासाठी **मुले / किशोरवयीन मुलांमध्ये जागरूकता, कौशल्ये आणि क्षमता निर्माण** करणे. स्थानिक भाषेत वयोमर्यादा, सुस्पष्ट, लिंग संवेदनशील माहिती, उपदेशात्मक साहित्याची उपलब्धता विकसित आणि सुनिश्चित करणे. विशेष गरजा असलेल्या आणि विविध सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या मुलांचा समावेश करण्यासाठी विशिष्ट उपाययोजना केल्या जातील.

४.७. विकास नियोजन, समुदाय-आधारित व्यवस्थापन आणि पायाभूत सुविधांचा विकास, आपत्ती व्यवस्थापन यासारख्या सेवांचे निरीक्षण करण्यासाठी **किशोर-नेतृत्वाच्या पुढाकारांना प्रोत्साहन** देणे.

४.८. शासनामध्ये मुलांच्या सहभागासाठी व्यासपीठ स्थापन करणे करिता आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी **आर्थिक संसाधनांचे वाटप** करणे.

| ४. कृती आराखडा- बाल सहभाग | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य ४.१, ४.२, ४.४, ४.८ | | | | | | |
| १. | मुलांचे हक्क व सहभाग याविषयी जागृती | मुलांना त्यांचे अधिकार व मत / अभिप्राय / चिंता व्यक्त करण्याच्या महत्वाबाबत जागरूक करणे करिता स्थानिक भाषेमध्ये माहिती, शिक्षण व संवाद (IEC) साहित्य विकसित करणे.<br>माहिती, शिक्षण व संवाद (IEC) साहित्य हे लिंग संवेदनशील असावे दिव्यांग व सामाजिकदृष्ट्या उपेक्षित बालकांशी संबंधित बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. | मध्यम कालावधी | • बाल हक्कांच्या संदर्भाने विकसित केलेले माहिती, शिक्षण व संवाद (IEC) साहित्य<br>• बालकांच्या विविध योजनांवर (आरोग्य, शिक्षण, संरक्षण व सहभाग) विकसित केलेले माहिती, शिक्षण व संवाद (IEC) साहित्य<br>• विविध योजनांअंतर्गत बालकांकरिता पात्रता / तरतुदींवर विकसित वय-योग्य माहिती, शिक्षण व संवाद (IEC) साहित्य | महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचनालय | ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, नगर विकास विभाग |
| | | पालक, काळजीवाहू / काळजी घेणारे व समुदाय यांचे करिता स्थानिक भाषेमध्ये माहिती, शिक्षण व संवाद (IEC) | मध्यम कालावधी | • बाल हक्कांच्या संदर्भाने विकसित केलेले माहिती, शिक्षण व संवाद (IEC) | महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क | ग्राम विकास विभाग, आदिवासी |

| ४. कृती आराखडा- बाल सहभाग | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | साहित्य व जनसंवाद अभियान विकसित करणे जेणेकरून त्यांच्यामध्ये बालकांच्या हक्काबद्दल जागरूकता निर्माण होईल व बालकांची मते / अभिप्राय / चिंता यांचा आदर करणे बाबत संवेदनशील बनतील.<br>माहिती, शिक्षण व संवाद (**IEC**) साहित्य हे लिंग संवेदनशील असावे दिव्यांग व सामाजिकदृष्ट्या उपेक्षित बालकांशी संबंधित बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. | | साहित्य<br>• बालकांकरिता असलेल्या योजना व त्यांचे हक्क या संदर्भाने माहिती, शिक्षण व संवाद (**IEC**) साहित्य<br>• आयोजित केलेल्या जनसंवाद अभियानांची संख्या | महासंचनालय | विकास विभाग, नगर विकास विभाग |
| २. | पर्यावरण सक्षम करणे | बालकांशी निगडीत धोरणे व निर्णय प्रक्रियेमध्ये बालकांच्या सहभागाकरिता मार्गदर्शक तत्वे विकसित करणे | मध्यम कालावधी | • विकसित मार्गदर्शक तत्वे | महिला व बाल विकास विभाग | |
| | | दिव्यांग, गरीब सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी असलेली बालके, भिन्नता / अनुरूपता नसलेली लिंग प्राधान्य, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व धार्मिक अल्पसंख्यांक बालकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करणे | मध्यम कालावधी | • विकसित मार्गदर्शक तत्वे | महिला व बाल विकास विभाग,<br>आदिवासी विकास विभाग,<br>शालेय शिक्षण विभाग | ग्राम विकास विभाग,<br>नगर विकास विभाग |

| ४. कृती आराखडा- बाल सहभाग | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| ३ | आरोग्य कर्मचारी यांचे आरोग्याबाबतचे गैरसमज व पूर्वग्रह संबोधित करणे | संवेदनशील कार्यक्रमाद्वारे अल्पसंख्यांक समुदायातील महिला व बालकांना आरोग्य व पोषण काळजी सेवा अधिक चांगल्या प्रकारे उपलब्ध होतील याची सुनिश्चिता होणे करिता सर्व स्तरांवर आरोग्य सेवा कर्मचारी व अंगणवाडी केंद्रे यांचे अल्पसंख्यांक समुदायाप्रती असलेले गैरसमज व पूर्वग्रह संबोधित करणे | अल्प कालावधी | • अल्पसंख्यांक समुदायातील संपूर्ण लसीकरण झालेल्या ५ वर्षाखालील बालकांची टक्केवारी<br>• ३ प्रसूतीपूर्व काळजी सेवा (**ANC**) प्राप्त झालेल्या महिलांची टक्केवारी<br>• अल्पसंख्यांक समुदायातील महिलांकरिता - एम.एम.आर<br>• अल्पसंख्यांक समुदायातील बालकांकरिता - एन.एम.एम.आर<br>• अल्पसंख्यांक समुदायातील बालकांकरिता - आय.एम.आर | सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचनालय | |

| ५. कृती आराखडा- अल्पसंख्यांक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | • अल्पसंख्यांक समुदायातील बालकांकरिता – सी.एम.आर | | |
| | | अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील सार्वजनिक आरोग्य केंद्रामध्ये महिला वैद्यकीय चिकित्सक (डॉक्टर) व सहायक कर्मचारी यांचे नियुक्तीस प्राधान्य देणे | अल्प कालावधी | • सार्वजनिक आरोग्य केंद्रामध्ये असलेल्या महिला वैद्यकीय चिकित्सक (डॉक्टर) व सहायक कर्मचारी यांची टक्केवारी | सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | | समुदाय आधारित कार्यक्रमांची अंमलबजावणी करून गृह आधारित सर्वांगीण बाल काळजी प्रदान करणे करिता काळजी वाहकांची क्षमता निर्माण करणे | अल्प कालावधी | • | सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग | ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |
| | | महिला व बाल आरोग्यासंबंधीचे गैरसमज दूर करून आरोग्य शोधी वर्तन सुधारणे. महिला जननविषयक विकृती (**FGM**) सारख्या प्रतिगामी दूर करण्यासाठी पावले उचलणे | अल्प कालावधी | • वर्तनातील बदल संवादाचे अनुषगाने साहित्य विकसित व प्रसारित करणे<br>• वर्तनातील बदल संवादाचे अनुषंगाने आयोजित | सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग | अल्पसंख्यांक विकास विभाग |

| ५. कृती आराखडा- अल्पसंख्यांक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | सत्रांची संख्या | | |
| धोरण प्राधान्य : ५.६, ५.८ | | | | | | |
| ४. | अल्पसंख्यांक समुदायाकरिता शिक्षण सक्षम करणे | धार्मिक एकता व विविधतेला प्रोत्साहन देणे करिता अभ्यासक्रम व शिकवण्याच्या पद्धती संदर्भित करणे | अल्प कालावधी | • समावेश व विविधतेच्या दृष्टीकोनातून अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र बाबत पुंराविलोकन अहवाल | महिला व बाल विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग | |
| | | अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रामध्ये उर्दू भाषेमध्ये शिक्षणाचा (सर्व स्तरावर) पर्याय उपलब्ध करून देणे | अल्प कालावधी | | महिला व बाल विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग | |
| | | अल्पसंख्यांक समुदायातील मुलींकरिता माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचे बळकटीकरण व विस्तार करणे | अल्प कालावधी | • अल्पसंख्यांक समुदायातील बालकांचा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्याचा दर ( लिंगानुसार वेगवेगळे) | शालेय शिक्षण विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग | ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |

| ५. कृती आराखडा- अल्पसंख्यांक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | • संभाव्य शिक्षण संधींवर आयोजित केलेल्या अभिमुखता कार्यक्रमांची संख्या | | |
| | | अल्पसंख्यांक समुदायातील बालकांकारिता वसतिगृह, शिष्यवृत्ती व फ्री-शिप या सारख्या योजनांची व्याप्ती वाढविणे | अल्प कालावधी | • अल्पसंख्यांक समुदायातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या बालकांकरिता उपलब्ध आलेल्या वसतिगृहांची संख्या (लिंगानुसार वेग-वेगळे)<br>• शिष्यवृत्ती योजना – माहिती (लिंगानुसार वेग-वेगळे)<br>• ज्या शिष्यवृत्ती योजनांची रक्कम सुधारीत करण्यात आलेली आहे अश्या योजनांची संख्या व त्यांची सुधारीत रक्कम | शालेय शिक्षण विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग | |

| ५. कृती आराखडा- अल्पसंख्यांक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | मदरशांमध्ये शैक्षणिक शिक्षण बळकट करणे | अल्प कालावधी | • औपचारिक शिक्षण देणाऱ्या मदरशांची संख्या | अल्पसंख्यांक शिक्षण विभाग | शालेय शिक्षण विभाग |
| धोरण प्राधान्य : ५.८ | | | | | | |
| ५. | माहिती संकलन व देखरेख | अल्पसंख्यांक समुदायातील बालकांची वाढ व विकासाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे करिता गतिशील डेटाबेस विकसित करणे<br>व अल्पसंख्यांक समुदायातील बालकांच्या विकासाचा मागोवा घेण्यासाठी सामाजिक प्रगतीचा निर्देशांक विकसित करणे | अल्प ते मध्यम कालावधी | • नियमित माहिती संकलनासाठी एम.आय.एस (**MIS**) विकसित केले<br>• सांस्कृतिक विविधता निर्देशांक विकसित करणे | नियोजन विभाग,<br>अर्थ व सांख्यकी विभाग**,**<br>अल्पसंख्यांक विकास विभाग | |

## ६. नागरी भागातील गरीब समाजातील बालके

<u>धोरणात्मक उपाय</u>

६.१. **सर्व शहरी धोरणे आणि कार्यक्रमांद्वारे बालकांचे हक्क हे मुख्य प्रवाहात आणणे.** बालके, रहिवासी आणि कोणत्याही सरकारशी सलंग्न नसलेला समूह (non-state actors) यांच्या भागीदारीत सुरक्षित आणि सक्षम बालपणाला प्रोत्साहन देण्यासाठी बालस्नेही शहरे तयार करणे.

६.२ सर्वात दुर्लक्षित आणि बेघर लोकांसाठी निवारा पर्याय म्हणून **सुरक्षित घरांचा** प्रचार करा. सर्व अनौपचारिक आणि गैर-अधिसूचित वस्त्यांमध्ये **मूलभूत सेवा** जसे की बालस्नेही सार्वजनिक शौचालयांसह पाणी आणि स्वच्छता सुविधा इत्यादी सार्वत्रिक सेवांची उपलब्धता सुनिश्चित करा. आपत्तीच्या काळात बालकांचे संरक्षण करणे करिता व बालक आणि त्यांच्या कुटुंबियांना जबरदस्तीने बाहेर काढणे यास प्रतिबंध होणे करिता यंत्रणा तयार करणे.

६.३ प्राथमिक काळजी, बालरोग काळजी, लैंगिक आणि पुनरुत्पादक आरोग्य, व्यसनमुक्ती केंद्रे आणि मानसिक आरोग्य सेवा यासह प्रभाग स्तरावर दर्जेदार, अल्पदर, कार्यक्षम **आरोग्य-सेवा प्रणाली** प्रदान करणे. स्थलांतरित आणि बेघर कुटुंबांकरिता सदर आरोग्य सेवा सुविधांची उपलब्धता व प्रवेश वाढविण्यासाठी उपाययोजना करणे.

६.४ एकात्मिक बाल विकास योजना, मध्यान्ह भोजन आणि सार्वजनिक वितरण प्रणालींद्वारे **दर्जेदार पोषण सेवा** प्रदान करून नागरी गरीब मुलांची पोषण स्थिती सुधारणे. निरोगी आहार आणि सेवन पद्धतींना अनुकूल करणे करिता बालकांशी आणि पालकांशी वर्तन बदल संवाद उपक्रम आयोजित करणे.

६.५ बालवाडी आणि संपूर्ण दिवस काळजी केंद्रे सारख्या **बालसंगोपन सेवांची** गुणवत्ता आणि परवडणारी क्षमता सुधारणे.

६.६ सक्तीचे व मोफत शिक्षण अधिनियमातील तरतुदींनुसार सार्वजनिक शाळांमध्ये **मोफत आणि दर्जेदार शिक्षण** मिळण्यासाठी नागरी गरीब कुटुंबांना मदत करणे. नोंदणीकृत ओळख दस्तऐवज उपलब्ध नसलेल्या बालकांची नोंदणी करण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जातील. विशेषत: अनौपचारिक वस्त्यांमध्ये राहणाऱ्या बालकांसाठी समवयस्क शिक्षण, सहभाग आणि उपचारात्मक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी अनौपचारिक संरचना/जागांची उपलब्धता सुधारणे.

६.७ बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून **वाहतूक धोरणांचे** पुनरावलोकन करणे आणि सार्वजनिक तसेच खाजगी वाहनांद्वारे बालकांच्या वाहतुकीचे नियमन करण्यासाठी उपाययोजना करणे. रस्ता सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे अंमलात आणणे आणि सर्व कर्तव्य धारक व मुलांना रस्ता सुरक्षा नियमांबद्दल नियमितपणे शिक्षित करणे. शहरी गरीब मुले आणि कुटुंबांसाठी सार्वजनिक वाहतुकीची उपलब्धता आणि परवडणारी क्षमता सुधारणे. शहरांमध्ये बालकांकरिता सुरक्षित, अनुकूल आणि अडथळा विरहित पदपथ विकसित करणे.

६.८ शहर/नगर नियोजनामध्ये **नागरी रचना आणि नियोजन बाबत बालकांचा दृष्टीकोन** अंतर्भूत केला पाहिजे आणि त्यांना प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी करून घेतले पाहिजे. सर्व बालकांकारिता सर्वसमावेशक खेळ आणि खुल्या जागा तयार करणे. सर्व सार्वजनिक जागा, खेळण्याची जागा यामध्ये अपंग आणि विविध वयोगटातील बालकांच्या

गरजा विचारात घेण्यात येतील. बालकांसाठी असलेल्या मोकळ्या जागांवर अन्य हितसंबंधांकरिता अतिक्रमण होणार नाहीत याची खात्री करणे आणि शहरी गरीब बालकांसाठी ती प्रवेशयोग्य ठेवली पाहिजे.

६.९ **बेघर, रस्त्यावर आणि अनौपचारिक वस्त्यांमध्ये राहणाऱ्या बालकांची (विशेषतः मुली)** सुरक्षा आणि संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करणे. मुलांवरील हिंसाचार रोखण्यासाठी **सामुदायिक स्तरावरील उपक्रमांना** प्रोत्साहन देणे व विविध एजन्सी (पोलीस, न्यायालये, सीडब्ल्यूसी, जेजेबी, एनजीओ, डीएलएसए इ.) यांच्यात अभिसरण आणि समन्वय याद्वारे सक्षम प्रतिसाद आणि निवारण यंत्रणा तयार करणे. प्रभाग स्तरावर **बाल संरक्षण समित्यांची निर्मिती आणि कामकाज सक्षम** करणे. बालकांच्या संरक्षणात सक्रियपणे सहभागी होण्यासाठी नगरसेवक आणि इतर बाल संरक्षण समिती सदस्यांची क्षमता बांधणी सुनिश्चित करणे.

६.१० स्थानिक विश्लेषण आणि GIS मॅपिंग तंत्रांसह शहरी भागातील बाल हक्क समस्यांवरील विश्वासार्ह, भिन्न प्रतिनिधी आणि तुलनात्मक माहिती गोळा करण्यात गुंतवणूक करणे.

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : ६.१, ८.१ | | | | | | |
| १. | नागरी धोरणे व कार्यक्रम | नागरी विकास धोरणामध्ये ( पंतप्रधान आवास योजना, अमृत योजना, स्वच्छ भारत अभियान, स्मार्ट सिटी उपक्रम इ.) मुलांचे हक्क एकात्मिक करणे | मध्यम कालावधी | • नागरी गरीब बालकांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या धोरणांची संख्या<br>• नागरी गरीब बालकांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या कार्यक्रमांची संख्या | नगर विकास विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, महानगरपालिका | गृहनिर्माण विभाग |
| | | बालकांची समस्या व गरजा नागरी पायाभूत सुविधा व अवकाशीय नियोजनामध्ये समाविष्ट करणे | मध्यम कालावधी | • बालकांकरिता अनुकूल पायाभूत सुविधा व समर्पित जागा यावर लक्ष केंद्रित करणारा वार्षिक अहवाल ( मेट्रो / शहर / नागरी द्वारे वेग-वेगळे ) | नगर विकास विभाग, नियोजन विभाग, महिला व बाल विकास विभाग | गृहनिर्माण विभाग |
| | | निर्णय प्रक्रियेमध्ये बालकांच्या आवाजाचा समावेश करण्यासाठी प्रक्रिया विकसित करणे | मध्यम कालावधी | • बालकांशी सल्लामसलत केलेल्या धोरणांची / कार्यक्रमाची संख्या<br>• बालकांची मते समाविष्ट केलेल्या धोरणांची / कार्यक्रमांची संख्या | नगर विकास विभाग, महिला व बाल विकास विभाग | गृहनिर्माण विभाग |

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : ६.२ | | | | | | |
| २ | नागरी भागातील गरीब बालके व त्यांचे कुटुंबांना सुरक्षित घरे | अनौपचारिक व गैर- अधिसूचित वस्त्यांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांकरिता परवडणाऱ्या घरांच्या पर्यायामध्ये सुधारणा करणे | मध्यम कालावधी | • सुरक्षित घरामध्ये राहणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी | नगर विकास विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृह निर्माण विभाग | महानगरपालिका |
| | | अधिसूचित झोपडपट्ट्यांचे संखेत वाढ व कुटुंबांना सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी जमिनीचे पट्टे आवंटन करणे | मध्यम कालावधी | • अधिसूचित झालेल्या झोपडपट्ट्यांची टक्केवारी<br>• जमिनीचे पट्टे उपलब्ध करून देण्यात आलेल्या कुटुंबांची संख्या<br>• पक्क्या व अर्ध-पक्क्या घरांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी | नगर विकास विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृह निर्माण विभाग | |
| | | पायाभूत सुविधा प्रकल्प, बळजबरीने बेदखल करणे व हवामानातील बदलांमुळे विस्थापित झालेल्या कुटुंबांना पुनर्वसन घरे | मध्यम कालावधी | • पुनर्वसन पर्यायांचा लाभ झालेल्या कुटुंबांची संख्या ( पायाभूत सुविधा प्रकल्प, बळजबरीने बेदखल करणे व हवामानातील बदल नुसार वेग-वेगळे) | नगर विकास विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मदत व पुनर्वसन विभाग | आपत्ती व्यवस्थापन विभाग |

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | बेघर कुटुंबे व रस्त्यावरील परीस्थितीत राहणाऱ्या बालकांना रात्र निवारा गृह उपलब्ध करून देणे | मध्यम कालावधी | • बेघर कुटुंब व बालकांकरिता उपलब्ध निवारा गृहांची संख्या (शहर निहाय वेग-वेगळे)<br>• निवारा गृहांचा लाभ होत असलेल्या व्यक्तींची संख्या | नगर विकास विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,<br>गृह निर्माण विभाग | |
| | | घरांना वीज पुरवठा उपलब्धता सुधारणे | | • वीज पुरवठा मीटरने जोडलेल्या घरांची टक्केवारी | उर्जा विभाग,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी | महानगरपालिका |
| ३. | मुलभूत सुविधा- पाणी | सर्व झोपडपट्यांना व कमी उत्पन्न गटातील घरांना परवडणारा पाणी पुरवठा व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे | अल्प कालावधी | • सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध असलेल्या घरांची टक्केवारी<br>• प्रक्रिया केलेल्या स्तोत्राच्या पाईप द्वारे नळाच्या पाण्याने जोडलेल्या कुटुंबांची टक्केवारी | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | महानगरपालिका, सार्वजनिक आरोग्य विभाग |
| ४. | मुलभूत सुविधा – शौचालय व स्वच्छता | सर्व झोपडपट्यांना व कमी उत्पन्न गटातील घरांना सहज उपलब्ध होणारी | अल्प कालावधी | • घराचे परिसरामध्ये | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | |

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | शौचालय सुविधा | | उपलब्ध असेलेल्या शौचालयांची टक्केवारी<br>• बंद, खुले व मलवाहिनी उपलब्ध नसलेल्या घरांची टक्केवारी | | |
| | | सर्व सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांमध्ये बालस्नेही शौचालयांची व्यवस्था वाढविणे | मध्यम कालावधी | • सर्व सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांमध्ये उपलब्ध असलेल्या बालस्नेही शौचालयांची संख्या | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | |
| धोरण प्राधान्य : ६.३, १.१, १.६ | | | | | | |
| ५ | नागरी आरोग्य काळजी यंत्रणा सक्षम करणे | सर्व झोपडपट्यांना मुलभूत आत्यवश्यक आरोग्य सेवा जसे की, प्रसूतीपूर्व व प्रसवोत्तर काळजी सेवा, लैगिक व पुनरुत्पादन आरोग्य, निदान, औषधे व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांद्वारे (UHC) सल्लामसलत मिळणे आवश्यक | अल्प कालावधी | • नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र (UHC) यांची स्थापित संख्या (शहर/नगर नुसार वेग-वेगळे)<br>• प्रत्येक १ लाख जनसंख्येमागे स्थापित नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र (UHC) यांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>नगर विकास विभाग | महिला व बाल विकास विभाग,<br>महानगरपालिका |

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | • नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र (UHC) येथील रिक्त पदांची संख्या | | |
| | सार्वजनिक व्यसनमुक्ती केंद्रे | पुरेसा कर्मचारी व संसाधनासह प्रभाग स्तरावर व्यसनमुक्ती केंद्रे स्थापन करणे | मध्यम कालावधी | • स्थापन केलेल्या व्यसनमुक्ती केंद्रांची संख्या (शहर/नागरी नुसार वेग-वेगळे) | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>नगर विकास विभाग | महिला व बाल विकास विभाग,<br>महानगरपालिका |
| | प्रभाग स्तरावर मानसिक आरोग्य काळजी सुविधा | मानसिक आरोग्य सेवांची उपलब्धता वाढविणे | | • प्रभाग स्तरावर उपलब्ध मानसिक आरोग्य काळजी सुविधांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | राज्य मानसिक आरोग्य प्राधिकारी |
| धोरण प्राधान्य : ६.४, ६.६, १.७, १.८, १.९, ७.४ | | | | | | |
| ६. | नागरी गरिबांच्या पोषण स्थितीत सुधारणा | झोपडपट्या / नागरी अनौपचारिक वस्त्यांमध्ये अंगणवाडी केंद्रांची व्याप्ती वाढविणे व गुणवत्ता सुधारणे | | • झोपडपट्या / नागरी अनौपचारिक वस्त्यांमध्ये कार्यरत अंगणवाडी केंद्रांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | नगर विकास विभाग |
| | | अतितीव्र कुपोषित व मध्यम कुपोषित बालकांचे पालक व काळजीवाहू यांना वैद्यकीय सेवा, अतिरिक्त पूरक पोषण व समुपदेशन सेवा प्रदान करणे | | • नागरी क्षेत्रातील ०-६ वायोगातील तीव्र कुपोषित / मध्यम कुपोषित / तीव्र वजन कमी / मध्यम वजन | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | |

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | कमी असलेल्या मुलांची टक्केवारी | | |
| | नागरी गरीब स्थलांतरित व बेघर कुटुंबे यांचे करिता सार्वजनिक वितरण प्रणाली | नागरी गरीब स्थलांतरित व बेघर कुटुंबे यांचे करिता सार्वजनिक वितरण प्रणालीची व्याप्ती वाढविणे | अल्प कालावधी | • झोपडपट्टी भागामध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीची उपलब्धता असलेल्या कुटुंबांची टक्केवारी | नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | नगर विकास विभाग |
| धोरण प्राधान्य : ६.५, २.७ | | | | | | |
| ७. | नागरी भागातील गरिबांकरिता परवडणाऱ्या बालसंगोपन सेवा व त्यांची गुणवत्ता सुधारणे | बालकांकरिता दर्जेदार शहरव्यापी संपूर्ण दिवस काळजी केंद्रे व बालवाडी सेवा स्थापित करणे व सहाय्य देणे | अल्प कालावधी | • स्थापित संपूर्ण दिवस काळजी केंद्रे व बालवाडी यांची संख्या (शहर/नगर / खाजगी/ शासकीय नुसार वेग-वेगळे) | महिला व बाल विकास विभाग,<br>नगर विकास विभाग | खाजगी क्षेत्रे, शाशकीय कार्यालय |
| धोरण प्राधान्य : ६.६, २.१, २.२, २.१२ | | | | | | |
| ८. | मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनियमाची अंमलबजावणी करणे | सर्व विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमध्ये दुर्बल व वंचित घटकाकरिता मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनियमानुसार २५% मोफत जागांच्या तरतुदीचे काटेकोरपणे पालन | अल्प कालावधी | • दुर्बल व वंचित घटकाकरिता मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनियमानुसार २५% मोफत जागांच्या तरतुदीचे | शालेय शिक्षण विभाग,<br>महानगरपालिका | महिला व बाल विकास विभाग |

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | करणे | | पालन करणाऱ्या शाळांची टक्केवारी | | |
| | उपचारात्मक शिक्षण व ब्रिज कोर्स यांची उपलब्धता | शाळाबाह्य बालके व रस्त्यावरील परिस्थितीत राहणारी बालके यांचे करिता उपचारात्मक शिक्षण व ब्रिज कोर्स करिता प्रभाग स्तरावर संसाधन केंद्रे स्थापन / सहाय्य करणे | अल्प कालावधी | • स्थापित केंद्रांची संख्या (प्रभाग/ शहर/ नगर नुसार वेग-वेगळे)<br>• सहाय्य उपलब्ध करून देण्यात आलेल्या केंद्रांची संख्या (प्रभाग/ शहर/ नगर नुसार वेग-वेगळे) | शालेय शिक्षण विभाग,<br>नगर विकास विभाग,<br>महानगरपालिका | महिला व बाल विकास विभाग |
| धोरण प्राधान्य : ६.७, २.११, ८.१२ | | | | | | |
| ९. | नागरी गरीब बालके व कुटुंबांना पडवरणारी सार्वजनिक परिवहन व्यवस्था | लहान बालके व त्यांची काळजी घेणाऱ्या करिता बस, ट्रेन व मेट्रो इत्यादींचे पासची व्याप्ती वाढविणे | अल्प कालावधी | • बालकांकरिता सार्वजनिक परिवहन व्यवस्था उपलब्ध करून देणाऱ्या बसेसची संख्या<br>• अनुदानित दरामध्ये बस, ट्रेन व मेट्रो इत्यादींचे पास उपलब्ध असलेल्या बालकांची संख्या | मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण,<br>महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.,<br>रेल्वे महामार्ग,<br>सागरी व किनारपट्टी संसाधणे विभाग,<br>नगर विकास विभाग,<br>वाहतूक (पोलीस), | महानगरपालिका, शालेय शिक्षण विभाग |
| | | सुरक्षित प्रवासाविषयी जागरूकता वाढविणे जसे की, वाहतूक नियमांचे | अल्प कालावधी | • जनजागृती अभियानांची | | |

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | पालन करणे, दुचाकी चालविताना हेल्मेट घालणे, चार चाकी वाहन चालविताना सीट बेल्ट लावणे. | | संख्या | माहिती व जनसंपर्क महासंचनालय | |
| | | अडथळा विरहीत – मुक्त पदपथ, पायवाट, रस्ता ओलांडणे करिता ओव्हर ब्रिज इत्यादींची बांधणी करून रस्ता सुरक्षा सुधारणे | अल्प कालावधी | • शहराच्या एकुण लांबीच्या रस्त्याचे टक्केवारीमध्ये पादचारी आणि सायकलिंग पायाभूत सुविधा उपलब्ध असलेल्या रस्त्यांची टक्केवारी | | |
| | | कमी अंतराचे मार्ग सुरु करणे व थांब्यांची संख्या कमी करून प्रवासाचा कालावधी कमी करणे | अल्प कालावधी | • | | |
| | | बालकांचे रस्ते वाहतूक दरम्यान होणाऱ्या इजांच्या घटना व जोखीम कमी करणे करिता राज्य परिवहन मार्गदर्शक तत्वे व शालेय सुरक्षा मार्गदर्शक तत्वांची काटेकोरपणे पालन करणे | अल्प कालावधी | • रस्ते वाहतूक दरम्यान इजा झालेल्या मुलांची संख्या (प्राणघातक व गैर-प्राणघातक) | | |

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : ६.८, ८.१२ | | | | | | |
| १०. | बालस्नेही उद्याने, खेळाचे मैदान व मोकळ्या जागा | बालकांकरिता उद्याने, खेळाचे मैदान व मोकळ्या जागांचा विस्तार व देखभाल करणे | | • शहराच्या एकुण क्षेत्रफळाच्या टक्केवारीनुसार उद्याने, खेळाचे मैदान व मोकळ्या जागा अंतर्गत समाविष्ट केलेले क्षेत्र<br>• सुरक्षा रक्षकांसह उपलब्ध उद्यानांची टक्केवारी<br>• खेळाचे साहित्य, झोके इत्यादींसह कार्यरत उद्यानांची संख्या<br>• योग्य विद्युत योजना असलेल्या उद्यानांची संख्या | नगर विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, महानगरपालिका | महिला व बाल विकास विभाग |
| | सर्वसमावेशक अतिपरिचित खेळाची जागा विकसित करणे | नागरी गरीब बालकांना उद्याने व मोकळ्या जागेत प्रवेश करण्यास येणारे सर्व प्रकारचे अडथळे दूर करणे | | • अनौपचारिक वसाहतींचे जवळ असलेली उद्याने व खेळाचे मैदानांची संख्या<br>• सर्व वयोगटाकरिता व | नगर विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम | महिला व बाल विकास विभाग |

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | क्षमताकरिता विकसित केलेल्या क्रीडांगणाची संख्या | विभाग, महानगरपालिका | |
| धोरण प्राधान्य : ६.९, ३.१, ३.२, ३.४ | | | | | | |
| ११. | अनौपचारिक वसाहती व सार्वजनिक ठिकाणी बालकांची सुरक्षा व संरक्षण सुधारणे | नागरी भागातील बालकांवरील गुन्हेगारी कमी करणे करिता योग्य प्रकारे कार्यरत पथ दिवे, रात्री पोलिसांची गस्त इत्यादी पावले उचलणे | अल्प कालावधी | • बालकांचे विरोधात घडलेल्या गुन्हांची संख्या (लिंग, शहर/नगर नुसार वेग-वेगळे)<br>• हरवलेल्या बालकांपैकी सापडलेल्या बालकांची संख्या<br>• योग्य प्रकाश व्यवस्था असलेल्या लेन व बाय-लेन यांची टक्केवारी | महानगरपालिका | गृह विभाग |
| | | हेल्पलाईन क्रमांक (जसे की १०९८ व इतर मानसिक आरोग्य हेल्पलाईन क्रमांक) सर्व सार्वजनिक ठिकाणी ठळकपणे प्रदर्शित करणे | | • उपलब्ध हेल्पलाईन बाबत जागरूकता अभियान<br>• प्राप्त दुरध्वनी संख्या (हेल्पलाईन नुसार वेग-वेगळे ) | महिला व बाल विकास विभाग, गृह विभाग | नगर विकास विभाग, महानगरपालिका |

| ६. कृती आराखडा- नागरी भागातील गरीब समाजातील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | संपूर्ण राज्यात प्रभाग स्तरावर नागरी बाल संरक्षण समिती (**CPCs**) | सर्व गावे व शहरातील सर्व प्रभाग स्तरावर बाल संरक्षण समिती सक्रीय करणे व बाल संरक्षण समितीमध्ये (उपेक्षित गटातील, स्थलांतरित कुटुंबातील, बेघर) बालकांच्या अनिवार्य सहभागाकरिता मार्गदर्शक तत्वे विकसित करणे | मध्यम कालावधी | • सक्रीय बाल संरक्षण समिती यांची संख्या<br>• बालके सदस्य असलेल्या बाल संरक्षण समिती यांची संख्या<br>• प्रशिक्षित बाल संरक्षण समिती यांची संख्या | महिला व बाल विकास विभाग,<br>नगर विकास विभाग | |
| धोरण प्राधान्य : ६.१० | | | | | | |
| १२. | नागरी भागातील गरीब बालकांची माहिती | बाल हक्कांच्या विविध निकषानुसार नियतकालिक माहिती गोळा करणे करिता नियमित सर्वेक्षण करणे | अल्प कालावधी | • लिंग व सामाजिक श्रेणीनुसार सर्व बालकांशी संबंधित विभागलेली माहिती गोळा करणे<br>• अहवाल प्रसिद्धी | अर्थ व सांखिकी संचनालय | नगर विकास विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग,<br>नियोजन विभाग |

## ७. सातत्याने भटकंतीवरील बालके [२], हंगामी स्थलांतरामुळे बाधित बालके आणि रस्त्यावरील परिस्थितीतील बालके

### धोरणात्मक उपाय

७.१ जन्म नोंदणी प्रमाणपत्र, बालके व त्यांच्या कुटुंबियांकरिता रहिवासी पुरावा यासारखी ओळख दस्तऐवज उपलब्ध होणे करिता प्रक्रिया सक्षम आणि सुलभ करणे.

७.२ स्थलांतरित कुटुंबांना निवारा प्रदान करणे. निवारा स्थळांवर पाणी, स्वच्छता, वीज इत्यादी मूलभूत सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करणे तसेच या सेवांचे नियमित निरीक्षण करणे.

७.३ मुलं आणि त्यांच्या कुटुंबीयांकरिता निवारा स्थळांवर सार्वजनिक वितरण प्रणाली सेवा उपलब्ध करून देऊन अन्न सुरक्षा सुनिश्चित करणे. एक राष्ट्र एक शिधापत्रिका (ONORC) च्या आधारे सार्वजनिक वितरण प्रणाली सुवाह्यता सक्षम करणे.

७.४ हंगामी स्थलांतरित बालकांमधील गंभीर आणि मध्यम कुपोषण दूर करणे व अंगणवाडी केंद्रे, बालवाडी, शाळा इत्यादींद्वारे पुरवल्या जाणाऱ्या पोषण सेवांमध्ये त्यांचा प्रवेश सुनिश्चित करणे.

७.५ स्थलांतरित बालिका / महिलांसाठी दर्जेदार प्रजनन आरोग्य सेवा प्रदान करणे ज्यात माता, प्रसूतीपूर्व आणि प्रसवोत्तर आरोग्य सेवा, मासिक पाळी स्वच्छता, संदर्भ सेवा यांचा समावेश आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMVY), जननी सुरक्षा योजना व एकात्मिक बाल विकास योजना यासारख्या विविध योजनांतर्गत लाभ मिळणे करिता व सक्षम करणे करिता माता व बाल संरक्षण कार्ड यांची पोहोच वाढविणे.

७.६ नियमित आरोग्य सेवा जसे की संपूर्ण लसीकरण, वाढीचे निरीक्षण, फिरतीवर असलेल्या मुलांसाठी संदर्भ सेवा प्रदान करणे.

७.७ बांधकाम, औद्योगिक आणि मनरेगा कार्यस्थळांसह इतर कामाच्या ठिकाणी डे-केअर आणि पाळणाघर यासारख्या सुविधा प्रदान करणे.

७.८ सातत्याने भटकंतीवरील बालके, विशेषत: हंगामी स्थलांतरित बालकांना त्यांचे मूळ ठिकाण व स्थलांतरीत ठीकाणी हस्तांतरणाद्वारे त्यांच्या अखंड शिक्षणाच्या अधिकाराचा लाभ घेत असल्याची खात्री करणे. हंगामी स्थलांतरित लोक गटात रहात असल्याने स्थलांतरित ठिकाणी शाळा सुरू करण्याची तरतूद करणे. आंतरराज्यीय स्थलांतराच्या बाबतीत, आंतरराज्य सहकार्य आणि समन्वयाद्वारे स्थलांतरित मुलांच्या मातृभाषेत शिक्षणाची तरतूद करणे.

---

[२] विविध कारणांकरिता स्वेच्छेने अथवा अनैच्छिकपणे, राज्यात किंवा विविध राज्यांमध्ये, त्यांचे पालकांसह किंवा पालकांशिवाय किंवा अन्य जुजबी काळजी घेणारे यांचे सोबत किंवा त्याचे शिवाय, ज्यांच्या हालचालीमुळे त्यांना आर्थिक, लैंगिक शोषण, अत्याचार, दुर्लक्ष व हिंसेचा धोका (किंवा वाढलेला धोका) असू शकतो, अशी बालके.

७.९ ज्या परिस्थितीत कुटुंबे बालकांशिवाय स्थलांतरित होतात, अश्या बालकांकरिता शिक्षणाची आणि निवाऱ्याची सातत्यता सुनिश्चित करण्यासाठी कुटुंब-आधारित नातेसंबंध काळजी / समुदाय-आधारित काळजी पर्याय, हंगामी वसतिगृह कार्यक्रम इत्यादी उपाय योजने आवश्यक आहे. मानसिक-सामाजिक आधारासाठीही तरतूद करावी.

७.१० मुलांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी स्थलांतरित कुटुंबांसाठी सुरक्षा जाळे तयार करणे तसेच स्थलांतरित स्थळांवर भेदभाव आणि दुर्लक्षितपणाचा सामना करणे. बालविवाह, बाल तस्करी आणि इतर प्रकारचे शोषण यासारख्या बालकांवरील हिंसाचारास प्रतिबंध करणे.

७.११ कौटुंबिक व्यवस्थेमध्ये बालकांना (रस्त्यावरील किंवा फिरताना) पुन्हा एकत्र येण्यासाठी सक्षम उपाययोजना करणे.

७.१२ सातत्याने भटकंतीवरील बालकांचे विषय हाताळणे व त्यांच्या गरजांबद्दल विविध स्तरांवरील अधिकारी आणि कार्यकर्त्यांना संवेदनशील केले जाईल. यामध्ये कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था, आरोग्य, पोषण आणि शिक्षण सेवा यांचा समावेश असेल. गाव आणि प्रभाग स्तरावरील विविध समित्या गठीत करण्यात येतील.

| ७. कृती आराखडा- सातत्याने भटकंतीवरील बालके, हंगामी स्थलांतरामुळे बाधित बालके आणि रस्त्यावरील परिस्थितीतील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : ७.१, ६.६ | | | | | | |
| १. | ओळखपत्र दस्तऐवज | स्थलांतरीत कामगार व रस्त्यावरील परिस्थितीत राहणारी कुटुंबे यांना त्यांची आवश्यक ओळखपत्र दस्तऐवज मिळणे करिता / नुतनीकरण करणे करिता वाढीव जागरूकता, मीहिती केंद्रे व फिरती शिबिरे इत्यादींद्वारे उपलब्धता सक्षम करणे करिता सहाय्यता प्रणाली सक्षम करणे | अल्प कालावधी | • बालके, महिला व कुटुंबे (स्थलांतरीत / रस्त्यावरील परिस्थतीतील) यांना प्राप्त झालेली ओळखपत्र दस्तऐवज ( दस्तऐवज प्रकारानुसार वेग-वेगळे) | महिला व बाल विकास विभाग, कामगार विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, पंचायती राज्य विभाग | |
| धोरण प्राधान्य : ७.२, ६.२ | | | | | | |
| २. | मुलभूत सुविधा – पाणी, स्वच्छता व वीज पुरवठा | स्थलांतरित ठिकाणी मुलभूत सुविधा जसे की पाणी, स्वच्छता व वीज पुरवठा इत्यादी उपलब्ध करून देणे | अल्प कालावधी | • सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध असलेल्या कुटुंबांची टक्केवारी<br>• प्रक्रिया केलेल्या स्तोत्राच्या पाईप द्वारे नळाच्या पाण्याने जोडलेल्या कुटुंबांची टक्केवारी<br>• स्थलांतरीत ठिकाणच्या परिसरामध्ये शौचालय | महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नगर विकास विभाग | |

| ७. कृती आराखडा- सातत्याने भटकंतीवरील बालके, हंगामी स्थलांतरामुळे बाधित बालके आणि रस्त्यावरील परिस्थितीतील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | सुविधा उपलब्ध असलेल्या कुटुंबांची टक्केवारी<br>● नियतकालिक पुनरावलोकन अहवाल | | |
| | | रस्त्यावरील परिस्थितीतील बेघर बालके व त्यांचे कुटुंबांना रात्र निवारागृह उपलब्ध करून देणे | अल्प कालावधी | ● बेघर कुटुंबांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या रात्र निवारागृहांची संख्या ( शहरानुसार वेग-वेगळे)<br>● रस्त्यावरील परिस्थितीतील बालकांकरिता असलेल्या निवारागृहांची संख्या | महानगरपालिका | महिला व बाल विकास विभाग |
| धोरण प्राधान्य : ७.३ | | | | | | |
| ३. | स्थलांतरित व बेघर बालके व कुटुंबांना अन्न सुरक्षा प्रदान करणे | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम अंतर्गत सार्वजनिक वितरण प्रणाली लागू नसलेल्या लाभार्थ्यांना एक राष्ट्र एक शिधापत्रिका या योजनेच्या सुरळीत अंमलबजावणी करिता राज्याअंतर्गत व आंतरराज्य सुवाह्यता | अल्प कालावधी | ● अनौपचारिक वसाहतीमध्ये सार्वजनिक वितरण प्रणाली उपलब्ध असलेल्या कुटबांची टक्केवारी | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | |

| ७. कृती आराखडा- सातत्याने भटकंतीवरील बालके, हंगामी स्थलांतरामुळे बाधित बालके आणि रस्त्यावरील परिस्थितीतील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | सक्षम करणे | | | | |
| धोरण प्राधान्य : ७.४ | | | | | | |
| ४. | सातत्याने भटकंतीवरील बालकांची पोषण स्थिती सुधारणे | स्थलांतरित बालके व त्यांचे मतांचा लागू असेल तेथील अस्तित्वात असलेल्या अंगणवाडी मधील प्रक्रिया व कार्यपद्धतीमध्ये समावेश करणे | अल्प कालावधी | • पात्र बालकांचा नियमित पाठपुरावा व अंगणवाडीमध्ये नोंदणी<br>• एकात्मिक बाल विकास योजनांचा लाभ घेणाऱ्या स्थलांतरित लोकसंख्येतील बालकांची व मातांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग | |
| | | अनौपचारिक वसाहती / कामाच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार नविन अंगणवाडी केंद्र सुरु करणे | अल्प कालावधी | • अनौपचारिक वसाहतीमध्ये कार्यरत अंगणवाडी केंद्रांची संख्या | | |
| | | अनौपचारिक वसाहती मधील अति तीव्र कुपोषित व मध्यम तीव्र कुपोषित बालकांचे पालक व काळजी वाहक यांना वैद्यकीय सेवा, संपूर्ण लसीकरण, अतिरिक्त पूरक पोषण व समुपदेशन सेवा प्रदान करणे | अल्प कालावधी | • स्थलांतरित ठिकाणी व अनौपचारिक वसाहतीं मधील ०-६ वायोगातील तीव्र कुपोषित / मध्यम कुपोषित / तीव्र वजन कमी / मध्यम वजन कमी असलेल्या मुलांची | सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग | |

| ७. कृती आराखडा- सातत्याने भटकंतीवरील बालके, हंगामी स्थलांतरामुळे बाधित बालके आणि रस्त्यावरील परिस्थितीतील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | टक्केवारी | | |
| धोरण प्राधान्य : ७.५, ७.६ | | | | | | |
| ५. | अनौपचारिक वसाहतींमध्ये आरोग्य काळजी सेवांची तरतूद | शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व फिरते आरोग्य सेवा यांचे मार्फत संलग्न / समन्वयाने सर्व अनौपचारिक वसाहतींमध्ये मुलभूत अत्यावश्यक आरोग्य सेवा, निदान, औषधे व सल्लामसलत इत्यादी सेवा उपलब्ध करून देणे | अल्प कालावधी | • मुलभूत अत्यावश्यक आरोग्य सेवा प्राप्त करून घेणाऱ्या कुटुंबांची संख्या<br>• प्रती १ लाख लोकसंख्येकरिता उपलब्ध असलेल्या प्राथमिक आरोग्य चिकित्सालय /केंद्रे यांची संख्या<br>• फिरते आरोग्य शिबिरांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>नगर विकास विभाग | महिला व बाल विकास विभाग, महानगरपालिका |
| | | प्रसवपूर्व काळजी(ANC), प्रसवोत्तर काळजी (PNC), लैंगिक व पुनरुत्पादन आरोग्य व संशोधन (SRH), संपूर्ण लसीकरण तसेच रस्त्यावरील परिस्थितीतील बालके व स्थलांतरित कुटुंबातील बालकांना पूरक पोषण यासारख्या वैद्यकीय सेवा | अल्प कालावधो | • आरोग्य सेवा प्राप्त होणाऱ्या प्रसवपूर्व व प्रसवोत्तर महिलांची संख्या<br>• माता-बालक संरक्षण कार्ड प्राप्त असलेल्या प्रसवपूर्व व प्रसवोत्तर महिलांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | |

| ७. कृती आराखडा- सातत्याने भटकंतीवरील बालके, हंगामी स्थलांतरामुळे बाधित बालके आणि रस्त्यावरील परिस्थितीतील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | पुरविणे करिता यंत्रणा सक्षम करणे | | • आरोग्यत्तर विस्तार म्हणून आरोग्य सेवा घेणाऱ्या बालकांची संख्या<br>• प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (**PMMVY**), जननी सुरक्षा योजना (**JSY**) व एकात्मिक बाल संरक्षण योजना (**ICDS**) सेवांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या | | |
| | | सातत्याने भटकंती वरील बालके व त्यांचे कुटुंबाकरिता संदर्भीय आरोग्य वाढविणे | अल्प कालावधी | • | | |
| ६. | किशोरवयीन बालकांकरिता आरोग्य व पोषण | शाळाबाह्य बालिकांसह सर्व किशोरवयीन बालिकांचे आरोग्य निरीक्षण, मासिक पाळी स्वच्छता व पूरक पोषण या घटकांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या “सबला” योजनेचा विस्तार करणे | अल्प कालावधी | • “सबला” योजनेचा लाभ घेतलेल्या अनौपचारिक वसाहतीमधील किशोरवयीन बालिकांची संख्या | | |

| ७. कृती आराखडा- सातत्याने भटकंतीवरील बालके, हंगामी स्थलांतरामुळे बाधित बालके आणि रस्त्यावरील परिस्थितीतील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : ७.७ | | | | | | |
| ७. | अनौपचारिक वसाहती व स्थलांतरित ठिकाणावरील बालकांना पाळणाघर व संपूर्ण दिवस काळजी सेवा | अनौपचारिक वसाहती मधील विशेषत: औद्योगिक व इतर कार्यस्थळावरील स्थलांतरित लोकसंख्येमधील बालकांना समाविष्ट करून त्यांचे करिता दर्जेदार पाळणाघर व संपूर्ण दिवस काळजी सेवा स्थापित करणे | अल्प कालावधी | • स्थापन झालेले पाळणाघर व संपूर्ण दिवस काळजी केंद्रे (डे-केअर) यांची संख्या (अनौपचारिक वसाहती, स्थलांतरित स्थळे, मनरेगा कार्यस्थळे नुसार वेग-वेगळे) | कामगार विभाग, महानगरपालिका | महिला व बाल विकास विभाग |
| धोरण प्राधान्य : ७.८ | | | | | | |
| ८. | सातत्यपूर्ण भटकंतीवरील बालकांकरिता शिक्षण | स्थलांतरित बालकांना त्यांचे स्थानिक भाषेमध्ये शिक्षणाची तरतूद, पुस्तके व शिक्षकांची तरतूद करणे करिता मूळ राज्य व स्थलांतरित राज्य यांचे दरम्यान सामजस्य करार झाल्याचे सुनिश्चित करणे | अल्प कलावधी | • मूळ व स्थलांतरित क्षेत्रामध्ये शिक्षण विभागाची परिपत्रके प्रसिद्ध करणे | शालेय शिक्षण विभाग, कामगार विभाग | |
| | | प्रवेश / नोंदणी अभियानांचा विस्तार वाढवून रस्त्यावरील परिस्थितीत राहणाऱ्या बालकांची नोंदणी सुधारणे | | • शाळेमध्ये प्रवेश घेतलेल्या रस्त्यावरील परिस्थितीतील बालकांची संख्या | | |
| | | सर्व राज्यांतर्गत स्थलांतरित बालकांना | अल्प | • शिक्षण हमी कार्ड | | |

| ७. कृती आराखडा- सातत्याने भटकंतीवरील बालके, हंगामी स्थलांतरामुळे बाधित बालके आणि रस्त्यावरील परिस्थितीतील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | शिक्षण हमी कार्ड (EGC) उपलब्ध करून देणे करिता शालेय व्यवस्थापन समितीस सक्षम करणे व बालकांचा मागोवा घेणे | कालावधी | (EGC) प्राप्त झालेल्या राज्यांतर्गत स्थलांतरित बालकांची संख्या | | |
| | | स्थलांतरित स्थळांवर आवश्यकतेनुसार कार्यस्थळामध्ये शाळा सुरु करणे | | • शाळांची तरतूद असलेल्या कार्यस्थळांची टक्केवारी | शालेय शिक्षण विभाग,<br>कामगार विभाग | |
| | | ऊस तोड कामगारांच्या बालकांकरिता हंगामी वसतिगृह कार्यक्रम हा सर्व आंतरराज्यीय स्थलांतरितांपर्यत विस्तारित करणे व वसतिगृहांमध्ये १८ वर्षापर्यंतच्या बालकांची नोंदणी ( सक्तीचे व मोफत शिक्षण समर्थन) नोंदणी वाढविणे तसेच स्थलांतरित कुटुंबातील बालकांना त्यांचे शिक्षण पूर्ण करणे करिता प्रोत्साहित करणे करिता शिक्षण विभागाच्या परिपत्रकामध्ये सुधारणा करणे | अल्प कालावधी | • हंगामी वसतिगृह कार्यक्रम सुव्यवस्थित राबविणे<br>• हंगामी वसतिगृह कार्यक्रमाचा लाभ घेणाऱ्या बालकांची संख्या | | |
| | | कुटुंबांना सोडून मूळ स्थळी मागे राहणाऱ्या बालकांकरिता कुटुंब- | अल्प कालावधी | • कुटुंब-आधारित नातेवाईक काळजी पर्यायांचा लाभ | महिला व बाल विकास विभाग | विधी व न्याय विभाग |

| ७. कृती आराखडा- सातत्याने भटकंतीवरील बालके, हंगामी स्थलांतरामुळे बाधित बालके आणि रस्त्यावरील परिस्थितीतील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | आधारित नातेसंबंध काळजी / समुदाय आधारित काळजी पर्यायांना प्रोत्साहन देणे. कुटुंबांना सोडून मूळ स्थळी मागे राहणाऱ्या बालकांना बालसंगोपन योजनेसारख्या योजनांशी जोडणे व मानसिक-सामाजिक समर्थन सुनिश्चित करणे | | घेणाऱ्या बालकांची संख्या<br>• मानसिक-सामाजिक सहाय्य (PSS) आणि बालसंगोपन योजनेशी जोडलेल्या बालकांची संख्या | | |
| धोरण प्राधान्य : ७.१०, ७.११ | | | | | | |
| ९. | बालकांचे संरक्षणाकरिता सुरक्षा जाळे विकसित करणे | बाल मजुरी, बाल तस्करी, बाल विवाह इत्यादी पासून असुक्षित असलेल्या बालकांना रोखणे करिता स्थलांतरीत कुटुंबांचा मागोवा घेणे करिता गाव व प्रभाग स्तरावर बाल संरक्षण समित्या सक्रीय करणे | अल्प कालावधी | • असुरक्षित बालके व त्यांचे कुटुंबांची ओळख व मागोवा घेणे करिता प्रशिक्षित करण्यात आलेल्या बाल संरक्षण समित्यांची संख्या<br>• बाल संरक्षण समित्यामार्फत मागोवा घेण्यात आलेल्या असुरक्षित बालके व त्यांचे कुटुंबांची संख्या | महिला व बाल विकास विभाग | |
| | | असुरक्षित बालकांना त्वरित व | अल्प | • १०९८ द्वारे प्राप्त | महिला व बाल | विधी व न्याय |

| ७. कृती आराखडा- सातत्याने भटकंतीवरील बालके, हंगामी स्थलांतरामुळे बाधित बालके आणि रस्त्यावरील परिस्थितीतील बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | पुनर्वसन सहाय्य मिळणे करिता १०९८ चाइल्ड हेल्पलाईन सेवांची जागरूकता व पोहोच वाढविणे | कालावधी | दूरध्वनींची संख्या<br>• सहाय्य उपलब्ध करून देण्यात आलेल्या बालकांची संख्या | विकास विभाग | विभाग |
| धोरण प्राधान्य : ७.१२ | | | | | | |
| १०. | शाशकीय अधिकाऱ्यांची संवेदनशीलता व क्षमता वाढविणे | सातत्याने फिरतीवर असणाऱ्या बालकांचे संदर्भाने कार्यवाही करणे करिता शासकीय अधिकाऱ्यांना संवेदानशील व सक्षम करणे | मध्यम कालवधी | • आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या | सर्व संबंधित विभाग | |
| | तंत्रज्ञानावर आधारित उपायांचा वापर व यंत्रणांचे प्रशिक्षण | बालकांचा मागोवा, असुरक्षित बालके व त्यांचे कुटुंबांपर्यंत त्यांचे हक्क व तरतुदी पोहोचल्याची खात्री करणे करिता संगणकीय ॲप आधारित पर्यायांचा वापर करणे | मध्यम कालावधी | • | सर्व संबंधित विभाग | |

## ८. दिव्यांग बालके

**धोरण प्राधान्य:**

८.१ दिव्यांग व्यक्तींचे हक्क, अधिनियम (पीडब्ल्यूडी ॲक्ट, २०१६) अंतर्गत परिभाषित दिव्यांग बालकांना **समान हक्क** आहेत याची शासन खात्री करेल आणि सर्व दिव्यांग बालकांना त्यांचे क्षमतांची जाणीव करून देऊन त्यांनी सहभागी व्हावे याकरिता सर्वसमावेशक सामाजिक-पर्यावरणीय वातावरणाची निर्मिती करून **लज्जास्पद बाबी आणि भेदभाव** सक्रियपणे दूर करेल. यामध्ये शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक जागा, मनोरंजन, खेळ, क्रीडा प्रशिक्षण आणि इतर सेवांमध्ये समान प्रवेश समाविष्ट आहेत.

८.२ बालकांमधील विविध प्रकारच्या अपंगत्वाबद्दल **जागरूकता निर्माण** करण्यासाठी राज्य शासन आवश्यक निधीची तरतूद करेल. या मुलांच्या शारीरिक, भावनिक, सामाजिक आणि इतर गरजांबद्दल समुदाय, कर्तव्य धारक आणि काळजीवाहक यांना संवेदनशील करून दिव्यांग बालकांचे **आत्म-मूल्य आणि प्रतिष्ठा** वाढवण्यासाठी उपाययोजना करणे.

८.३ जन्म प्रमाणपत्र, आधार कार्ड, शिधापत्रिका व इतर आवश्यक कागदपत्रांसह दिव्यांग **प्रमाणपत्र** मिळविण्याची प्रक्रिया सुलभ आणि सुलभ करणे.

८.४ **दिव्यांगत्वाची लवकर ओळख**, मुल्यांकन, संदर्भ आणि दिव्यांग बालकांच्या उपचारासाठी उपाययोजना सक्षम करणे. **रुग्णालये, आरोग्य सेवा सुविधा** (तपासणी केंद्रे, प्रयोगशाळा, पुनर्वसन केंद्र इ.) आणि प्रशिक्षित आरोग्य सेवा व्यावसायिकांची उपलब्धता सुनिश्चित करणे.

८.५ दिव्यांग बालकांच्या गरजेनुसार **सहाय्यक उपकरणे**, उपकरणांचे वितरण व **सहाय्य** यांची उपलब्धता सुनिश्चित करणे. राज्य शासन अनुदानित/विनामूल्य वैद्यकीय मदत आणि उपकरणे उपलब्ध करून देणे करिता उपाययोजना करेल व उपकरणांची देखभाल आणि दुरुस्तीसाठीही तरतूद करेल.

८.६ **दुर्मिळ आजारांवर उपचार करण्यासाठी जीवनरक्षक औषधे** प्रायोजित व प्रदान करणे तसेच प्रौढ वयापर्यंत पुनर्वसनासाठी सहाय्य देणे.

८.७ दिव्यांग बालकांना **अन्न सुरक्षा** आणि **विशेष पौष्टिक गरजा** पूर्ण करण्याची सुनिश्चितता करणे. सध्यस्थितीत लागू असलेल्या अन्न सुरक्षा आणि पोषण कार्यक्रमांची व्याप्ती वाढविणे जेणेकरून बालकांना पुरेसे आणि दर्जेदार अन्न मिळू शकेल. दिव्यांग बालकांच्या कुपोषण (विशेषतः लठ्ठपणा) च्या समस्येवर लक्ष देणे.

८.८ मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनियम अंतर्गत दिव्यांग बालकांना शाळांमध्ये प्रवेश देण्यास तयार करून नियमित शाळांमध्ये **सर्वसमावेशक शिक्षण** वाढविणे. शालेय प्रक्रिया (अभ्यासक्रम, प्रवेश, मूल्यांकन इ.), उपक्रम (वर्गातील संवाद, शैक्षणिक साहित्य, खेळ, मनोरंजन इ.) आणि पायाभूत सुविधा (निवास, वाहतूक, इमारत, परिसर, खेळाचे क्षेत्र, शौचालये इ.) दिव्यांग बालकांकरिता अनुकूल असल्याची खात्री करणे आणि त्यांच्या सहभागास प्रोत्साहन देणे.

८.९ मुलांमधील **विशिष्ट शिकण्याची अक्षमता** लवकरात लवकर **शोधण्यासाठी** पावले उचलणे आणि आवश्यक वैयक्तिक आधाराद्वारे अक्षमतेवर मात करण्यासाठी सुयोग्य अध्यापनशास्त्र व इतर उपाययोजना करणे. दृष्टीदोष किंवा श्रवणदोष किंवा दोन्ही दोष असलेल्या दिव्यांग बालकांसाठी योग्य भाषा, पद्धती आणि संवादाच्या माध्यमांद्वारे शिक्षण दिले जावे. आवश्यकता व गरजेनुसार उपचारात्मक शिक्षण आणि विशेष शिक्षकांच्या उपलब्धतेची तरतूद करणे. गंभीर किंवा एकापेक्षा अधिक दिव्यांग बालकांकरिता विशेष शिक्षणाची उपलब्धता आणि प्रवेश सुधारणे.

७.१० **क्रौर्य, अमानवी कृत्य व विविध स्तरावरील** (घर, अतिपरिचित क्षेत्र, बालकांच्या काळजी घेणाऱ्या संस्था, शाळा, सार्वजनिक जागांसह) **सर्व प्रकारच्या हिंसाचारापासून दिव्यांग बालकांचे संरक्षण** व प्रतिबंध करण्यासाठी पुरेशी यंत्रणा सुनिश्चित करणे. हिंसाचाराच्या सर्व घटना नोंदवल्या गेल्याची खात्री करणे आणि पीडितांना वाचवण्यासाठी, संरक्षण व पुनर्वसन करण्यासाठी आणि त्यांना कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्यासाठी पावले उचलणे.

८.११ **बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थांमध्ये** दिव्यांग बालकांकरिता त्यांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन **काळजी घेण्याचे मानक** राखणे. वर्तनात्मक, भावनिक, संवेदनक्षम विकार असलेल्या बालकांना व हिंसा/शिक्षा/शामक औषधाचा अवलंब न करता हिंसक प्रवृत्ती दर्शवतात अश्या बालकांना अतिरिक्त काळजी व समर्थन प्रदान केले जावे.

८.१२ **सार्वजनिक जागा** जसे की रेल्वे/बस स्थानके, विमानतळ, रस्ते, उद्याने, मॉल, सिनेमा हॉल, हॉटेल्स, मनोरंजन केंद्रे इ. दिव्यांग व्यक्तींना प्रवेशयोग्य बनविणे. दिव्यांग बालकांकरिता **प्रवेशयोग्य, सुरक्षित आणि अडथळा मुक्त** वाहतुकीची (सर्व पद्धती) तरतूद करणे. झोपडपट्ट्यांसह सर्व सार्वजनिक ठिकाणी दिव्यांगाकरिता अनुकूल शौचालयांची तरतूद सुनिश्चित करणे.

८.१३ दिव्यांग बालकांचे त्यांचे कुटुंबांनी त्याग करण्यापासून संरक्षण करणे करिता राज्य शासन विशेष उपाययोजना करेल. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना त्यांच्या विशेष गरजा पूर्ण करण्यास सक्षम करण्यासाठी त्यांना संवेदनशील बनविणे व **सहाय्य** (आर्थिक, समुपदेशन, वैद्यकीय, डे केअर सुविधा इ.) **प्रदान करणे**.

८.१४ दिव्यागांच्या भिन्न गरजांबद्दल शासकीय आणि निम-शासकीय यंत्रांना संवेदनशील करणे आणि **प्रशिक्षण** आयोजित करणे. सार्वजनिक सुविधांमध्ये विशेष परिचर, विशेष शिक्षक आणि समुपदेशक यासारख्या अतिरिक्त मानव संसाधनासाठी तरतूद करणे.

८.१५ **दिव्यांग पालकांच्या मुलांसाठी** आर्थिक आणि इतर सहाय्य प्रदान करणे.

८.१६ **सांख्यिकीय माहिती व दिव्यांग बालकांच्या माहितीचे** नियमित संकलन करण्यासाठी पावले उचलावीत.

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : ८.१, ८.२, ८.१४, ४.१, ४.२ | | | | | | |
| १. | जागरूकता व संवेदनशीलता निर्माण करणे | सार्वजनिक, खाजगी क्षेत्रांमध्ये व समुदाय स्तरावर दिव्यांग व्यक्तींचे हक्क, अधिनियम २०१६ मधील तरतुदींबाबत जागरूकता अभियान राबविणे व सर्वसमावेशक वृत्ती स्वीकारणे. | अल्प कालावधी | • सार्वजनिक क्षेत्रात आयोजित केलेल्या अभियानांची संख्या<br>• खाजगी क्षेत्रात आयोजित केलेल्या अभियानांची संख्या<br>• समुदाय स्तरावर आयोजित केलेल्या अभियानांची संख्या | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग,<br>उद्योग व उर्जा विभाग | महिला व बाल विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | शासकीय अधिकारी (पोलीस अधिकारी, न्यायाधीश व अभियोक्ता, ग्राम परिषदेचे प्रतिनिधी व अधिकारी, अंगणवाडी सेविका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आरोग्य कर्मचारी इत्यादी) यांना दिव्यांग बालकांसोबत गुंतविण्याकरिता व त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये सर्वसमावेशक जागा निर्माण करणे करिता संवेदनशील | अल्प कालावधी | • शासकीय अधिकारी यांचे प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये दिव्यांग बालकांकरिता आवश्यक असलेल्या गरजा व तरतुदीनुसार सामुग्रीचा समावेश करणे | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग,<br>महसूल विभाग,<br>नगर विकास विभाग,<br>ग्राम विकास विभाग,<br>स्थानिक स्वराज्य संस्था, | |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | करण्यासाठी शासकीय प्रशिक्षण सक्षम करणे | | | गृह विभाग,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग,<br>विधी व न्याय विभाग,<br>शालेय शिक्षण विभाग,<br>सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | समुपदेशन सेवा | सार्वजनिक व खाजगी रुग्णालये व इतर आरोग्य केंद्रांमध्ये पालक, काळजीवाहक व दिव्यांग बालकांकरिता समुपदेशन सेवा सक्षम करणे. समुपदेशनामुळे दिव्यांग व्यक्तींचे सामाजिक स्वीकृती व सार्वजनिक जीवनाविषयीचे गैरसमज स्पष्ट होऊ शकतात. | अल्प कालावधी | • दिव्यांग बालकांना समुपदेशन सेवा उपलब्ध करून देणाऱ्या रुग्णालयांची संख्या (शासकीय व खाजगी रुग्णालयामनुसार वेग-वेगळे) | वैद्यकीय शिक्षण विभाग,<br>सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | दिव्यांग बालकांचा सहभाग | समुदाय, शाळा व सार्वजनिक ठिकाणी दिव्यांग बालकांचा अर्थपूर्ण सहभाग व | अल्प कालावधी | • | | |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | एकात्मता सुनिश्चित करण्यासाठी पावले उचलणे. | | | | |
| | | दिव्यांग बालकांना प्रोत्साहन देणे करिता आदर्श व्यक्ती ( शिक्षणतज्ञ, उद्योजक, क्रीडा क्षेत्रातील व्यक्ती इत्यादी) सोबत त्यांचा संवाद / उपक्रम आयोजित करणे | मध्यम कालावधी | • | शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग | |
| धोरण प्राधान्य : ८.३ | | | | | | |
| २. | दिव्यांग प्रमाणपत्र | दिव्यांग प्रमाणपत्राचे महत्व व त्याचा लाभ घेण्याची कार्यपद्धती याविषयी जागरूकता निर्माण करणे | | • आयोजित केलेल्या जनजागृती अभियानांची संख्या | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग | |
| | | एक खिडकी योजना स्थापित करून व समुदायापर्यंत पोहोचण्याचे अभियान हाती घेऊन सुलभ उपलब्धता सुनिश्चित करणे करिता प्रक्रिया सुलभ करणे | अल्प कालावधी | • दिव्यांग प्रमाणपत्र उपलब्ध असलेल्या दिव्यांग बालकांची टक्केवारी | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग | स्वयंसेवी संस्था, सामुदायिक संघटना, शालेय शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : ८.४, ८.६ | | | | | | |
| ३. | तपासणी व दिव्यंगत्व लक्षणांची लवकर ओळख | दिव्यांग लक्षणांची लवकर ओळख पटणे करिता सहाय्यक परिचारिका प्रसाविका (**ANMs**) अंगणवाडी सेविका (**AWWs**), बालरोगतज्ञ, आरोग्य व्यवसायिक, समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते व इतर वैद्यकीय व निम-वैद्यकीय यंत्रणाचे प्रशिक्षण सक्षम करणे. | अल्प कालावधी | • आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या | वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | | शारीरीक व बौद्धिक दिव्यांग लक्षणे (ऐकणे, दृष्टी, विकासातील विलंब, स्पेक्ट्रम विकार इत्यादी) लवकर ओळखणे करिता सर्व बालकांची तपासणी बाबतची अंमलबजावणी सक्षम करणे | अल्प कालावधी | • राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत पथकाने दिलेल्या भेटींची संख्या<br>• तपासणी झालेल्या बालकांची संख्या<br>• दिव्यांगत्वाची ओळख पटलेल्या बालकांची टक्केवारी | वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | संदर्भीय सेवा सक्षम करणे | दिव्यांग बालकांना वेळेत पुनर्वसन व उपचार मिळणे करिता विशेषतः | | • | वैद्यकीय शिक्षण विभाग, | |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | ग्रामीण भागात संदर्भीय सेवा सक्षम करणे | | | सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | माहिती व मागदर्शन | पालक व काळजीवाहक यांना सहाय्य व उपकरणे, उपचारांचे पर्याय, समुपदेशन व पुनर्वसन सेवा या विषयी मार्गदर्शन करणे करिता माहिती- सह – मार्गदर्शन केंद्रे व ऑनलाईन मंच स्थापित करणे | अल्प कालावधी | • ऑनलाईन मंच विकसित केले<br>• माहिती- सह – मार्गदर्शन केंद्रे स्थापित केले | वैद्यकीय शिक्षण विभाग,<br>सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | दिव्यांग बालकांचे आरोग्य व कल्याण | दिव्यांग बालकांच्या गरजेनुसार तज्ञ, चिकित्सक व सार्वजनिक तसेच खाजगी आरोग्य सुविधांमध्ये मोफत व अनुदानित औषधांसह परवडणाऱ्या विशेष आरोग्य सेवा उपलब्ध असल्याची खात्री करणे | अल्प कालावधी | • बालरोगतज्ञ यांची संख्या (सार्वजनिक व खाजगी आरोग्य सुविधानुसार वेग-वेगळे) | वैद्यकीय शिक्षण विभाग,<br>सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | पुनर्वसन सहाय्य | विशेषतः ग्रामीण भागातील पुनर्वसन केंद्रांच्या सेवा सक्षम करणे | अल्प कालावधी | • पुनर्वसन केंद्रांची संख्या<br>• व्यवसायिक चिकित्सकांची संख्या | वैद्यकीय शिक्षण विभाग,<br>सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | | दिव्यांग बालकांकरिता मानसिक आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी पावले उचलणे | अल्प कालावधी | • दिव्यांग बालकांना समुपदेशन सेवा उपलब्ध | वैद्यकीय शिक्षण विभाग, | |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | करून देणाऱ्या रुग्णालयांची टक्केवारी (सार्वजनिक व खाजगी रूग्णालयानुसार वेग-वेगळे) | सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| धोरण प्राधान्य : ८.५, ८.६ | | | | | | |
| ४. | सहाय्यक उपकरणे व सहाय्य | दिव्यांग बालकांकरिता दर्जेदार वैद्यकीय सहाय्य / उपकरणे व जीवन रक्षक औषधे परवडणाऱ्या / अनुदानित किमतीत उपलब्ध करण्याची तरतूद करणे. तसेच त्यांची देखभाल व दुरुस्ती करिता तरतूद करणे | अल्प कालावधी | • | वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग | उद्योग व उर्जा विभाग |
| | | पडवरणारी वैद्यकीय उपकरणे व जीवन रक्षक औषधे विकसित करण्यास नवकल्पनानां प्राधान्य व प्रोत्साहित करणे | | • संशोधन व नवकल्पना वरील अहवाल | वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग | उद्योग व उर्जा विभाग |
| धोरण प्राधान्य : ८.७ | | | | | | |
| ५. | दिव्यांग बालकांच्या पोषण स्थितीमध्ये सुधारणा करणे | कुपोषणाचा तिहेरी भार रोखण्याकरिता योग्य आहार, स्वच्छता व निरोगी खाण्याच्या सवयी करिता पालक व | | • २ शाश्वत विकास (SD) पेक्षा कमी व २ शाश्वत विकास (SD) वरील | सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल | |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | काळजीवाहक यांना पोषण विषयक समुपदेशन करणे | | दिव्यांग बालकांची संख्या (उंची करिता वजन) | विकास विभाग | |
| | सार्वजनिक वितरण प्रणाली | दिव्यांग बालकांच्या कुटुंबांकरिता सार्वजनिक वितरण प्रणालीची व्याप्ती वाढविणे | अल्प कालावधी | • सार्वजनिक वितरण प्रणालीची उपलब्धता असलेल्या दिव्यांग कुटुंबांची संख्या | नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग |
| धोरण प्राधान्य : ८.८, ८.१, ८.९, २.१, २.२, २.१५ | | | | | | |
| ६. | दिव्यांग बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार | शाळेमधील सर्व पायाभूत सुविधा ( निवासी इमारत, परिसर, खेळाचे क्षेत्र, शौचालय व वाहतूक) या दिव्यांग बालकांकरिता अनुकूल असतील याची खात्री करणे | अल्प कालावधी | • दिव्यांग बालकांकरिता बाल स्नेही सुविधा उपलब्ध असलेल्या शाळांची टक्केवारी | शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग | आदिवासी विकास विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग |
| | | शालेय प्रक्रिया (अभ्यासक्रम, प्रवेश व मुल्यांकन), उपक्रम ( वर्गातील परस्पर संवाद, शैक्षणिक साहित्य, क्रीडा व | | • | शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय व | आदिवासी विकास विभाग, नगर विकास |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | मनोरंजन ) या दिव्यांग बालकांकरिता सर्वसमावेशक व सहभागी करून घेणे | | | विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग | विभाग, ग्राम विकास विभाग |
| | | संवेदनक्षम बालकांना त्यांची भाषा, पद्धती व संवाद साधनांच्या अनुरूप गरजेनुसार सहाय्य, उपकरणे व शिक्षण सामुग्री प्रदान करणे | मध्यम कालावधी | • दिव्यांग बालकांकारिता सहाय्य, उपकरणे व शिक्षण सामुग्री उपलब्ध असलेल्या शाळांची टक्केवारी | शालेय शिक्षण विभाग | |
| | | आवश्यकतेनुसार शाळा विशेष शिक्षक नियुक्त करतील.<br>उपचारात्मक शिक्षणामध्ये सर्व दिव्यांग बालके ज्यामध्ये संस्थेमध्ये दाखल बालके, बौद्धिक दिव्यांग बालके व उच्च समर्थनाची गरज असलेली बालके यांचा समावेश सुनिश्चित करणे | | • विशेष शिक्षक उपलब्ध असलेल्या शाळांची संख्या | शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग | आदिवासी विकास विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग |
| | | दिव्यांग बालकांचा शिक्षणातील नाव नोंदणी दर सुधारणे | अल्प कालावधी | • शिक्षणामध्ये नाव नोंदणी झालेल्या दिव्यांग बालकांचा दर ( लिंग, सामाजिक श्रेणी व धर्म नुसार वेग-वेगळे) | शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण | आदिवासी विकास विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | | विभाग | विभाग |
| | दिव्यांग बालकांकरिता विशेष शाळा व शिक्षण केंद्रे | दिव्यांग बालकांसाठी विशेष शाळा, शिक्षण केंद्रे व विशेष शिक्षक यांची उपलब्धता सक्षम करणे | मध्यम कालावधी | • विशेष शाळांची संख्या<br>• नियुक्त करण्यात आलेल्या विशेष शिक्षकांची संख्या | शालेय शिक्षण विभाग | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग |
| धोरण प्राधान्य : ८.१०, ८.११ | | | | | | |
| ७. | दिव्यांग बालकांचे सर्व प्रकारच्या हिंसाचारापासून संरक्षण व प्रतिबंध | दिव्यांग बालकांच्या कुटुंबांना सुधारात्मक हिंसा, कौटुंबिक हिंसाचार व बालकांना सोडून देण्याची प्रवृत्ती टाळणे करिता समुपदेशन व सहाय्य प्रदान करणे | | • सहाय्य प्रदान केलेल्या प्रकरणांची संख्या | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| | | प्राप्त तक्रारींचे विहित वेळेत व समाधानकारक निवारण करणे तसेच आवश्यकतेनुसार कायदे विषयक मदत व इतर आवश्यक सहाय्य करणे | अल्प कालावधी | • प्राप्त तक्रारींची संख्या<br>• संबोधित केलेल्या तक्रारींची संख्या<br>• दिव्यांग बाल्कांविरुद्ध घडलेल्या गुन्हांच्या घटना | गृह विभाग,<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग,<br>विधी व न्याय विभाग | नगर विकास विभाग,<br>ग्राम विकास विभाग,<br>शालेय शिक्षण विभाग |
| | बालकांच्या काळजी | बालकांच्या काळजी घेणाऱ्या | अल्प | • हिंसाचार, गैरवर्तन व | सामाजिक न्याय व | |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | घेणाऱ्या संस्थामध्ये दिव्यांग बालकांची काळजी घ्यावयाची मानके | संस्थामध्ये दिव्यांग बालकांची काळजी, सुरक्षा व संरक्षणाच्या नामाकांची व्यापक अंमलबजावणी व देखरेख करणे | कालावधी | दुर्लक्ष या बाबींचे अनुषंगाने नोंदविलेल्या प्रकरणांची संख्या<br>• केलेल्या लेखापरीक्षणांची संख्या<br>• निवारण झालेल्या प्रकरणांची संख्या | विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग,<br>विधी व न्याय विभाग | |
| धोरण प्राधान्य : ८.१२ | | | | | | |
| | अभित्याग व बालकास सोडून देण्यास प्रतिबंध | अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांना त्यांच्या विशेष गरजा पूर्ण करण्यास सक्षम करणे करिता आर्थिक, समुपदेशन, वैद्यकीय व संपूर्ण दिवस काळजी इत्यादी सेवा उपलब्ध करून देणे | अल्प कालावधी | • मासिक आर्थिक सहाय्य प्राप्त होणाऱ्या दिव्यांग बालके व कुटुंबांची संख्या<br>• समुपदेशन व इतर सेवा प्राप्त होणाऱ्या दिव्यांग बालक व कुटुंबांची संख्या<br>• संपूर्ण दिवस काळजी सेवा वापरणाऱ्या दिव्यांग बालकांची संख्या | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| | | त्याग व सोडून दिलेल्या दिव्यांग बालकांचा मागोवा व शोध घेणे | | • सोडून दिलेल्या दिव्यांग बालकांची नोंदविलेली | गृह विभाग,<br>महिला व बाल | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | संख्या<br>• सापडलेल्या व पुनर्वसित झालेल्या बालकांची संख्या | विकास विभाग | कल्याण विभाग |
| धोरण प्राधान्य : ८.१३, ६.२, ६.८ | | | | | | |
| ८. | सर्वसमावेशक सार्वजनिक स्थळे, अतिपरिचित खेळाची क्षेत्रे व उद्याने विकसित करणे | सर्व दिव्यांग बालकांना सार्वजनिक स्थळांसह खेळाचे क्षेत्र व उद्यानांमध्ये अडथळा मुक्त प्रवेश सुनिश्चित करणे | | • सार्वजनिक स्थळांच्या संरचनेचे लेखापरीक्षण | नगर विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगरपालिका, परिवहन विभाग, नगर नियोजन व विकास प्राधिकरण | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग |
| | | सर्व सामुदायिक व सार्वजनिक स्थळांमध्ये दिव्यांग करिता शौचालय उपलब्ध करून देणे | | • दिव्यांगांकरिता शौचालय असलेल्या सार्वजनिक शौचालयांची टक्केवारी | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | महानगरपालिका |
| धोरण प्राधान्य : ८.१५ | | | | | | |
| ९. | दिव्यांगत्व असलेल्या पालकांना सहाय्य | एक किंवा दोन्ही पालक दिव्यांग असलेल्या कुटुंबांसाठी आर्थिक | | • बाल संगोपन योजनेचा | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | |

| ८. कृती आराखडा- दिव्यांग बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | करणे | सहाय्य योजनांची अंमलबजावणी सक्षम करणे | | लाभ घेणाऱ्या दिव्यांग बालकांची संख्या<br>• राष्ट्रीय विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गत दिव्यांग निवृत्ती निर्वाह वेतन प्राप्त करणाऱ्या दिव्यांग पालकांची संख्या | / दिव्यांग कल्याण विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | |
| धोरण प्राधान्य : ८.१६ | | | | | | |
| १०. | माहिती संकलन व देखरेख | दिव्यांग बालकांची वाढ व विकासाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे करिता गतिशील डेटाबेस विकसित करणे | अल्प कालावधी | • वार्षिक अहवाल | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / दिव्यांग कल्याण विभाग,<br>अर्थ व सांख्यकी विभाग | |

## ९. त्रितीयपंथी व अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालके

**धोरणात्मक उपाय**

त्रितीयपंथी आणि अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) हा शब्द अशा व्यक्तींना सूचित करतो की ज्यांचे लिंग त्यांचे जन्माच्या वेळी नेमून दिलेल्या लिंगाशी जुळत नाही. यात त्रितीय पुरुष, त्रितीय महिला, दोन्ही लैंगिक अवयव एकाच व्यक्तीत, बायनरी नसलेल्या व्यक्ती ((ज्या व्यक्तींची लिंग ओळख स्त्री किंवा पुरुषाच्या द्वी-अंगी चौकटीत बसत नाही), लिंगभेदी आणि किन्नर, हिजडा, अरवणी आणि जोगता अशी सामाजिक-सांस्कृतिक ओळख असलेल्यांचा समावेश आहे.

**धोरणात्मक उपाय**

९.१ अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालकांवरील सर्व प्रकारच्या लज्जास्पद बाबी आणि भेदभाव संपवण्यासाठी, त्यांना सन्मानाचे आणि स्वातंत्र्याचे जीवन जगण्यास सक्षम करण्यासाठी, त्यांच्या अधिकारांचे आणि हक्कांचे रक्षण करण्यासाठी ठोस कारवाई केली जाईल. स्वत:ची ओळख आणि मुक्तपणे त्यांची ओळख व्यक्त करण्याचा आणि सर्व सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या त्यांच्या घटनात्मक अधिकारांचे समर्थन करण्यासाठी सकारात्मक कारवाई केली जाईल.

९.२ गैरसमज नष्ट व दूर करण्यासाठी राज्य संवेदनशील आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी उपाययोजना करेल. आरोग्य सेवा, शाळा, कायदा आणि न्यायव्यवस्था आणि बाल संरक्षण सेवा यामधील सार्वजनिक कार्यकर्ते आणि सेवा प्रदाते यांना माहितीच्या नियमित प्रसाराद्वारे आणि प्रशिक्षणाद्वारे सामाजिक स्वीकृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

९.३ अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालकांचे आरोग्य आणि कल्याण सुधारण्यासाठी दर्जेदार शारीरिक आणि मानसिक आरोग्य सेवा (समुपदेशनासह) प्रदान करण्यासाठी उपाययोजना करणे.

९.४ अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालकांना गुंडगिरी, पूर्वग्रह आणि सर्व प्रकारच्या हिंसाचारापासून मुक्त असलेल्या सर्वसमावेशक शिक्षणाचा अधिकारांची पूर्तता करण्यासाठी सुरक्षित आणि सक्षम वातावरण प्रदान करणे. खेळ, विरंगुळा आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी समान संधी प्रदान केल्या जातील.

९.५ अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालकांविरुद्ध खाजगी, सार्वजनिक आणि ऑनलाइन सर्व प्रकारच्या हिंसाचारास प्रतिबंध करणे. हिंसाचार व अत्याचारामध्ये बळी पडलेल्या बालाकांकरिता पुरेसा प्रतिसाद आणि निवारण यंत्रणा कार्यरत असेल.

९.६ कुटुंबे, अतिपरिचित क्षेत्र आणि समुदाय संवेदनशील करण्यासाठी प्रयत्न केले जातील जेणेकरुन त्याग, सोडून देण्यात आलेल्या अनुरूप लिंग नसलेल्या (टी.जी.एन.सी) बालकांविरुद्ध सुधारात्मक हिंसाचार टाळता येईल.

९.७ राज्यातील विद्यमान संस्थात्मक यंत्रणा (उदाहरणार्थ त्रितीयपंथी कल्याण मंडळ) आणि जिल्हा स्तरावर (तक्रार निवारण समित्या) यांना बाल संरक्षणाशी संबंधित धोरणे आणि कार्यक्रम तयार करण्यासाठी सक्षम बनवणे.

| ९. कृती आराखडा- त्रितीयपंथी व अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : ९.१, ९.२ | | | | | | |
| १. | जनजागृती व संवेदशिलता निर्माण करणे | पंचायत, जिल्हा व राज्य स्तरावर लैंगिक मुद्दे तसेच लैगिक आपल्संख्यांक बालके व तरुण प्रौढ व्यक्तींचे समस्यांबाबत जनजागृती करणे करिता माध्यम अभियान राबविणे. | अल्प कालावधी | • जनजागृती अभियानांची संख्या | माहिती व जनसंपर्क महासंचनालय, त्रितीयपंथी कल्याण मंडळ. | |
| धोरण प्राधान्य : ९.३, ९.२ | | | | | | |
| २. | शारीरक व मानसिक आरोग्य | राज्य स्तरावर औषध पदवी व शास्त्रक्रिया पदवी (एम.बी.बी.एस), सामाजिक कार्य, मानसशास्त्र, मानसोपचार, बालरोग या विषयांचे अभ्यासक्रम व शिक्षक प्रशिक्षणामध्ये त्रितीयपंथी यांचे संदर्भाने सामुग्रीचा समावेश करणे | अल्प कालावधी | • अभासक्रम व प्रशिक्षण साहित्यामध्ये त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) संदर्भाने समस्यांचे एकत्रीकरण करणे | सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचनालय | महिला व बाल विकास विभाग, त्रितीयपंथी कल्याण मंडळ |
| | | डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ, समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते व सर्व वैद्यकीय / निम-वैद्यकीय यंत्रांना त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांचे आरोग्य व मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत | अल्प कालावधी | • आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | |

| ९. कृती आराखडा- त्रितीयपंथी व अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | संवेदनशिलता निर्माण करणे करिता नियमित प्रशिक्षण व उजळणी प्रशिक्षण प्रदान करणे | | | | |
| | | त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांचे कल्याण व आरोग्य सुधारणे करिता आरोग्य व मानसिक आरोग्य काळजी सेवा सक्षम करणे करिता पावले उचलणे. तसेच त्यांचे कुटुंबांना स्वीकृती सहाय्य करणे करिता समुपदेशन सेवा प्रदान करणे | | • | | |
| | | अंत:स्त्राव उपचार तज्ञ (**endocrinologist**), लैगिक उपचार तज्ञ व मानसोपचारतज्ञ या सारख्या तज्ञांची उपलब्धता सक्षम करणे | अल्प कालावधी | • अंत:स्त्राव उपचार तज्ञ (**endocrinologist**), लैगिक उपचार तज्ञ व मानसोपचारतज्ञ यांची संख्या ( सार्वजनिक व खाजगी सुविधानुसार वेग-वेगळे) | | |
| | | त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांचे आरोग्य व मानसिक आरोग्याच्या गरजांवर संशोधनास चालना देणे | | • प्रकाशित झालेले शोध निबंध / अहवालांची संख्या | | |

| ९. कृती आराखडा- त्रितीयपंथी व अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांना त्यांच्या विशिष्ट गरजा भागविणे करिता आवश्यक असलेल्या गरजांबद्दल सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या हेल्पलाईन यंत्रणांना संवेदशील करणे करिता प्रशिक्षित करणे. | | • हेल्पलाईनद्वारे हाताळलेल्या त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांच्या प्रकरणांची संख्या<br>• त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांशी संबंधित समस्यांवर हेल्पलाईन कर्मचारी यांना प्रशिक्षण | त्रितीयपंथी कल्याण मंडळ,<br>महिला व बाल विकास विभाग, | विधी व न्याय विभाग,<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| धोरण प्राधान्य : ९.४ सक्तीचे व मोफत शिक्षण, संरक्षण विभागाशी संलग्न – गुंडगिरी | | | | | | |
| ३. | सर्वसमावेश शिक्षणाचा अधिकार | डी.एड व बी.एड व इतर संबंधित अभ्यासक्रमामध्ये त्रितीयपंथी यांचे करिता असलेली सामुग्री जसे की राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांची शिक्षक प्रशिक्षण साहित्य – शालेय शिक्षणात त्रितीयपंथी बालकांचा समावेश हि बाब समाविष्ट करणे | अल्प कालावधी | • अभासक्रम व प्रशिक्षण साहित्यामध्ये त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) संदर्भाने समस्यांचे एकत्रीकरण करणे | | |
| | | शाळा व महाविद्यालांमध्ये त्रितीयपंथी | अल्प | • शाळा व महाविद्यालांमध्ये | शालेय शिक्षण | सामाजिक न्याय |

| ९. कृती आराखडा- त्रितीयपंथी व अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | (टी.जी.एन.सी) बालकांवरील गुंडगिरी व लैंगिक अत्याचार रोखणे करिता व संबोधित करण्यासाठी जागरूकता कार्यक्रम, समुपदेशन सेवा देऊ करणे व समवस्काच्या सहाय्यास प्रोत्साहन देणे | कालावधी | विद्यार्थ्यांकरिता लैगिक जनजागृती / संवेदनशीलता निर्माण करणे करिता आयोजित केलेल्या कार्यक्रमांची संख्या<br>• शाळा व महाविद्यालांमध्ये शिक्षकांकरिता लैगिक जनजागृती / संवेदनशीलता निर्माण करणे करिता आयोजित केलेल्या कार्यक्रमांची संख्या<br>• शालेय संरक्षण मार्गदर्शक तत्वे व सुरक्षा हस्तपुस्तिकांमध्ये त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांच्या समस्यांचा समावेश | विभाग,<br>उच्च व तांत्रिकी शिक्षण विभाग | व विशेष सहाय्य विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग,<br>त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) कल्याण मंडळ,<br>परिवहन विभाग |

| ९. कृती आराखडा- त्रितीयपंथी व अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | • समुपदेशक उपलब्ध असलेल्या शाळा/महाविद्यालांची टक्केवारी (त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांची सकारात्मक काळजीमध्ये प्रशिक्षित ) | | |
| | | त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांना खेळ, विरंगुळा व मनोरांजनात्मक उपक्रमांमध्ये सहभागी होणे करिता समान संधी प्रदान करणे करिता सक्षम वातावरण तयार करणे | मध्यम कालावधी | • | | |
| धोरण प्राधान्य : ९.५ | | | | | | |
| ४. | त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांविरोधातील हिंसाचारास प्रतिबंध | परीविक्षा अधिकारी, बाल कल्याण समिती सदस्य, बाल न्याय मंडळ सदस्य, पोलीस, विधी व न्यायपालिका अधिकारी यासारख्या यंत्रणांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांवरील सामुग्री समाविष्ट करणे | अल्प कालावधी | • शासकीय अधिकारी यांचे करिता अभ्यासक्रम व प्रशिक्षण हस्तपुस्तिकांमध्ये त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) संबंधित समस्यांचे एकत्रीकरण | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, गृह विभाग, विधी व न्याय विभाग | त्रितीयपंथी कल्याण मंडळ |

| ९. कृती आराखडा- त्रितीयपंथी व अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | बालकांच्या काळजी घेणाऱ्या संस्था, निवासीगृह व वसतिगृहांमध्ये त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांचा समावेश करण्यासाठी राजशिष्टाचार विकसित करणे ज्यामध्ये अनुरूप लिंग नसलेली मुले व मुलींचे लिंग वेग-वेगळे असणे. | अल्प कालावधी | • राजशिष्टाचार विकसित केलेल्या बालकांच्या काळजी घेणाऱ्या संस्था, निवासीगृह व वसतिगृहांची संख्या | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, गृह विभाग, विधी व न्याय विभाग | त्रितीयपंथी कल्याण मंडळ |
| | | सार्वजनिक शौचालये, सार्वजनिक उद्याने, वाहतूक व इतर सर्व सार्वजनिक क्षेत्रांमध्ये दक्षता व सुरक्षा राजशिष्टाचार | अल्प कालावधी | • | | |
| | | लिंग व लैंगिक प्रवृत्ती आणि/किंवा कोणत्याही प्रकारच्या दिव्यांगत्वाकडे दुर्लक्ष करून सर्व बालकांच्या स्वच्छतेकरिता समान उपलब्धतेच्या गरजेबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे | अल्प कालावधी | • | | |
| धोरण प्राधान्य : ९.६ | | | | | | |
| ५. | बालकांचा त्याग प्रतिबंधित करणे | त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांच्या कुटुंबांना सुधारात्मक व कौटुंबिक हिंसाचार किंवा त्याग टाळण्यासाठी संवेदनशील बनवून | | • सहाय्य उपलब्ध करून दिलेल्या प्रकरणांची संख्या | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व | त्रितीयपंथी कल्याण मंडळ |

| ९. कृती आराखडा- त्रितीयपंथी व अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | त्यांना पाठींबा देणे | | | विशेष सहाय्य विभाग | |
| | | त्याग किंवा सोडून दिलेल्या त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांचा शोध व मागोवा घेणे | | • सोडून दिलेल्या त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांची प्रकरणांची नोंदविलेली संख्या<br>• शोध व पुनर्वसन झालेल्या बालकांची संख्या | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | त्रितीयपंथी कल्याण मंडळ |
| | | स्थानिक समुदायास संवेदनशील करण्यासाठी व त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांवरील हिंसाचार रोखणे करिता समलैंगिक, उभयपंथी, तृतीयपंथी व अलैंगिक **(LGBTQIA+)** यांचेशी संबंधित समस्यांवर काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे सहाय्य एकत्रित करणे | | • त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) बालकांच्या समस्यांचे निवारण करणे करिता कार्यरत सहाय्य व संकट केंद्रांची संख्या | नागरी संस्था संघटना त्रितीयपंथी कल्याण मंडळ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| धोरण प्राधान्य : ९.७ | | | | | | |
| ६. | संस्थात्मक यंत्रणा सक्षम करणे | विद्यमान त्रितीयपंथी कल्याण मंडळ सक्षम करणे | | • विहित वेळेत सदस्यांची नियुक्ती | त्रितीयपंथी कल्याण मंडळ | |
| | | त्रितीयपंथी (टी.जी.एन.सी) | | • तक्रार निवारण समित्या | | |

| ९. कृती आराखडा- त्रितीयपंथी व अनुरूप लिंग नसलेले (टी.जी.एन.सी) बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | बालकांच्या समस्यांचे निराकरण करणे करिता जिल्हा स्तरावर तक्रार निवारण समितीत्यांची व्याप्ती वाढविणे | | असलेल्या जिल्ह्यांची संख्या | | |

# १०. आपत्ती आणि हवामान बदलामुळे प्रभावित बालके

## धोरणात्मक उपाय

१०.१ आपत्ती व्यवस्थापन आणि हवामान बदल समायोजना करिता एकात्मिक, बहु-क्षेत्रीय, समुदाय-केंद्रित आणि बाल-केंद्रित दृष्टिकोन स्वीकारणे.

१०.२ बालकांकरिता शाळा, अंगणवाडी केंद्रे, पाळणाघर, संस्था आणि इतर उपलब्ध सर्व जागांमध्ये सुरक्षित वातावरण विकसित करणे. भूकंपाचे परिस्थितीमध्ये झाडे पडणे, विजेचे खांब, उघडे मॅनहोल्स इत्यादींमुळे होणारे अपघात रोखून बालकांना संवरक्षित व सुरक्षित इमारती परिसर (भूकंप विरहित बांधकाम, अग्निसुरक्षा इ.) प्रदान करून बालकांची जोखीम कमी करणे. बालकांकरिता सुरक्षित आणि सुलभ पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक सुविधा सुनिश्चित करण्यासाठी स्थानिक स्तरावर संस्थात्मक सुरक्षा लेखापरीक्षण करणे.

१०.३ राज्यातील सर्व मुलांना निरोगी आणि रोगमुक्त वातावरण देणे करिता सर्व प्रकारचे प्रदूषण कमी करण्यासाठी सक्रिय उपाययोजना करणे.

१०.४ आपत्ती व्यवस्थापन अधिनियम (DMA) आपत्ती आणि आणीबाणीच्या परिस्थितीतील (नैसर्गिक आणि मानवनिर्मित दोन्ही आपत्ती) प्रतिसादामध्ये बालकांचे संरक्षण करण्यासाठी स्पष्टपणे परिभाषित राजशिष्टाचार व त्यामध्ये दिव्यांग बालकांचा समावेश करण्यासाठी विशेष काळजी घेणे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि गाव/वॉर्ड स्तरीय समित्यांना आपत्तीच्या काळात मुलांचे संरक्षण करण्यासाठी सहाय्य प्रदान करून क्षमता निर्माण करणे.

१०.५ विविध आपत्तींकरिता आपत्ती सज्जता, प्रतिसाद आणि शमन यावर आधारित स्वीकृत कार्यप्रणाली (SOPs) ची योग्य प्रकारे अंमलबजावणी सुनिश्चित करणे. समुदाय, काळजीवाहू, अग्रभागी कामगार, शाळा कर्मचारी, स्थानिक सामाजिक संघटना, ग्रामपंचायती आणि आपत्ती प्रतिसादावरील बालकांची क्षमता निर्माण करणे. तसेच गाव/शहर स्तरावर नियमितपणे आपत्ती शमन कवायती आयोजित करणे.

१०.६ आपत्तीनंतर नियमित अत्यावश्यक सेवा (अन्न सुरक्षा, सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता, आरोग्य, पोषण सेवा, निवारा इ.) च्या सातत्यपूर्ण पुनर्प्राप्ती योजनेवर लक्ष केंद्रित करणे. शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पुस्तके आणि इतर आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे बाबत उपाययोजना करणे आणि लवकरात लवकर शाळा पुन्हा सुरू करणे. आपत्तीनंतरच्या परिस्थितीतून सावरणे करिता बालकांना व समुदायांना मनोसामाजिक आधार, मनोरंजन सुविधा प्रदान करणे.

१०.७ अनाथ किंवा कुटुंबापासून विभक्त झालेल्या बालकांना, विशेषतः मुलींना, शोषण, तस्करी आणि इतर प्रतिकूल घटनांपासून रोखण्यासाठी विशेष उपाययोजना करणे.

१०.८ जलद हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या जोखमींबद्दल आणि बालकांवर त्याचे होणारे परिणाम याविषयी धोरण तयार करणारे, कर्तव्य धारक आणि इतर भागधारकांना संवेदनशील करणे. शाळा/महाविद्यालयीन स्तरावर हवामान बदलाच्या शिक्षणाला बळकटी देणे.

| १०. कृती आराखडा- आपत्ती आणि हवामान बदलामुळे प्रभावित बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| धोरण प्राधान्य : १०.१, ४.६, ४.७ | | | | | | |
| १. | बाल-केंद्रित धोरणे व कार्यक्रमांचे आयोजन व अंमलबजावणी | आपत्ती व्यवस्थापन धोरणे व कार्यक्रमामध्ये बाल-केंद्रित दृष्टीकोन समाविष्ट करणे करिता बालकांना प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेणे | अल्प कालावधी | • बालकांचे दृष्टीकोनातून आपत्ती व्यवस्थापन व हवामान बदलाचे समायोजन | आपत्ती व्यवस्थापन विभाग | महिला व बाल विकास विभाग |
| धोरण प्राधान्य : १०.१, १०.२, १०.४, १०.८ | | | | | | |
| २. | जोखीम कमी करणे – बालकांकरिता सुरक्षित वातावरण | शाळा, अंगणवाडी केंद्रे, पाळणाघर व आरोग्य केंद्रे इत्यादीं करिता बहु-धोका-प्रतिरोधक इमारती बांधणे. यामध्ये पूरग्रस्त भागातील इमारतींची उंच संरचना, उष्ण लाट प्रभावित भागातील इमारतींकरिता थंड छप्पर इत्यादी बाबींचा समावेश असू शकतो. | अल्प कालावधी | • बहु-धोका-प्रतिरोधक इमारतींची टक्केवारी (संस्थांच्या प्रकारानुसार वेग-वेगळे) | सार्वजनिक बांधकाम विभाग | आपत्ती व्यवस्थापन विभाग, महसूल विभाग, महिला व बाल विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग |
| | | शाळा, अंगणवाडी केंद्रे, पाळणाघर व इतर संस्थांमध्ये अग्निशमन उपकरणे, सुटका करणे करिता शाश्वत कार्यप्रणाली, उपकरणे वापरण्याचे | मध्यम कालावधी | • सुरक्षितता धोरण असलेल्या संस्थांची टक्केवारी | शालेय शिक्षण विभाग, महिला व बाल | आपत्ती व्यवस्थापन विभाग, |

| १०. कृती आराखडा- आपत्ती आणि हवामान बदलामुळे प्रभावित बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | प्रशिक्षण इत्यादी | | • सुरक्षितता धोरणाचा अंमल करणाऱ्या संस्थांची टक्केवारी | विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग | महसूल विभाग |
| | | झाड व विजेचे खांब पडणे, उघडे मल वहिनी नलिका इत्यादींमुळे होणाऱ्या दुखापती व अपघात टाळणे करिता नियमित सुरक्षा लेखापरीक्षण (पायाभूत सुविधा, प्रकिया व प्रणाली इत्यादी ) करणे | मध्यम कालावधी | • विकसित केलेली सुरक्षा लेखापरीक्षण मार्गदर्शिका<br>• वार्षिक लेखापरीक्षण अहवाल | शालेय शिक्षण विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग,<br>सार्वजनिक आरोग्य विभाग | आपत्ती व्यवस्थापन विभाग,<br>महसूल विभाग |
| | जागरूकता निर्माण करणे | आपत्ती व हवामान बदलामुळे निर्माण होणारे धोके टाळणे करिता व कमी करणे करिता (समुदाय , शाळा इतर संस्था स्तरावर) नियमित जागरूकता अभियान राबविणे | | • आयोजित केलेल्या जनजागृती अभियानांची संख्या<br>• विकसित केलेले माहिती, शिक्षण व संवाद (IEC) साहित्य | शालेय शिक्षण विभाग,<br>आपत्ती व्यवस्थापन विभाग,<br>महसूल विभाग | महानगरपालिका |
| | आघाडीवरील कार्यकर्ते व शासकिय यंत्रणा यांची क्षमता बांधणी करणे | शासकीय अधिकारी, पंचायत राज संस्था, शालेय व्यवस्थापन समिती, बाल संरक्षण समिती, गाव स्तरावर आरोग्य व पोषण दिवस, सहाय्यक परिचारिका, आशा अंगणवाडी | मध्यम कालावधी | • प्रशिक्षित यंत्रणांची संख्या<br>• गठीत करण्यात आलेली स्थानिक आपत्ती व्यवस्थापन समिती | ग्राम विकास विभाग,<br>आपत्ती व्यवस्थापन विभाग,<br>महसूल विभाग | महिला व बाल विकास विभाग |

| १०. कृती आराखडा- आपत्ती आणि हवामान बदलामुळे प्रभावित बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | कार्यकर्त्या व आघाडीवरील कार्यकर्ते यांना त्यांच्या सभोवतालचे मुलभूत जोखीम मुल्यांकन व आपत्तीचे काळात शमन करण्याचे प्रशिक्षण देणे | | • आयोजित केलेल्या लेखापरीक्षणांची संख्या<br>• संस्था स्तरावर प्रति वर्षी आयोजित करण्यात आपत्ती काळातील कवयातींची संख्या | | |
| | बाल सभांची क्षमता निर्माण करणे | बाल सभा व बाल पंचायतीच्या सदस्यांना आपत्ती व्यवस्थापन, हवामान बदल व त्यामध्ये त्यांची भूमिका याविषयीचे प्रशिक्षण देणे | मध्यम कालावधी | • प्रशिक्षित बाल सभांची टक्केवारी<br>• आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या<br>• ग्राम पंचायतीमध्ये चर्चेस घेतलेल्या मुद्द्यांची संख्या | ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग | आपत्ती व्यवस्थापन विभाग, महसुल विभाग, शालेय शिक्षण विभाग |
| धोरण प्राधान्य : १०.३, १०.८ | | | | | | |
| ३. | प्रदूषण पातळी कमी करणे | प्रदूषण पातळी ( वायू, ध्वनी, जल व माती) कमी करणे करिता पावले उचलणे | मध्यम कालावधी | • शहर निहाय वायू प्रदूषणाची पातळी परवानगी नियमांपेक्षा जास्त<br>• शहर निहाय जल प्रदूषणाची पातळी | पर्यावरण व हवामान बदल विभाग | नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, परिवहन विभाग |

| १०. कृती आराखडा- आपत्ती आणि हवामान बदलामुळे प्रभावित बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | परवानगी नियमांपेक्षा जास्त<br>• शहर निहाय ध्वनी प्रदूषणाची पातळी परवानगी नियमांपेक्षा जास्त<br>• शहर निहाय माती प्रदूषणाची पातळी परवानगी नियमांपेक्षा जास्त | | |
| | पर्यावरणीय धोक्यांपासून संरक्षण | कचरा डेपो जवळ, प्रदूषित उद्योग/कारखाने, खाणी, भूस्खलनाची शक्यता असलेली क्षेत्रे, पुर क्षेत्रे इत्यादी अशा पर्यावरणास धोकादायक भागात राहणाऱ्या बालकांचे व कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक पावले उचलणे | मध्यम कालावधी | • चिन्हांकित केलेली असुरक्षित क्षेत्रांची संख्या (जिल्ह्यानुसार वेग-वेगळे)<br>• धोकादायक क्षेत्रामध्ये बालकांसह राहणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी<br>• आपत्तीचे वेळी सुटका व पुनर्वसित केलेल्या कुटुंबांची संख्या | महसूल विभाग | नगर विकास विभाग , ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |

| १०. कृती आराखडा- आपत्ती आणि हवामान बदलामुळे प्रभावित बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | हवामान बदलाबद्दल जागरूकता निर्माण करणे | प्रदूषण व हवामान बदलाविषयी बालक व नागरिकांकरिता जागरूकता व संवेदनशील अभियान चालविणे | मध्यम कालावधी | • नागरिकांकरिता आयोजित केलेल्या अभियानांची संख्या<br>• समाविष्ट झालेल्या शाळांची संख्या | पर्यावरण व हवामान बदल विभाग | शालेय शिक्षण विभाग,<br>माहिती व जनसंपर्क महासंचनालय,<br>नगर विकास विभाग,<br>ग्राम विकास विभाग,<br>आदिवासी विकास विभाग |
| | | धोरण निश्चिती करणारे, कर्तव्य धारक व इतर भागधारकांमध्ये हवामान बदल व त्यांचे बालकांवर होणारे परिणाम याबाबत जागरूकता निर्माण करणे | | • निवडून आलेले प्रतिनिधी व धोरण निश्चिती करणारे यांचे करिता आयोजित केलेल्या कार्यशाळांची संख्या<br>• राज्य व जिल्हा स्तरीय अधिकारी यांचे करिता आयोजित केलेल्या कार्यशाळांची संख्या | पर्यावरण व हवामान बदल विभाग | महिला व बाल विकास विभाग |

| १०. कृती आराखडा- आपत्ती आणि हवामान बदलामुळे प्रभावित बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | माझी वसुंधरा मिशन अंतर्गत विकसित केलेले हॅंड्स-ऑन-लर्निंग नियामक मुख्य प्रवाहात आणणे | मध्यम कालावधी | • आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या<br>• शिकण्याचे नियामकांची अंमलबजावणी करणाऱ्या शाळांची संख्या | पर्यावरण व हवामान बदल विभाग | शालेय शिक्षण विभाग |
| धोरण प्राधान्य : १०.४, १०.५ | | | | | | |
| ४. | आपत्तीस शीघ्र प्रतिसाद | आपत्तीच्या वेळी बालकांची सुटका व संरक्षण (मनुष्यनिर्मित / नैसर्गिक ) | अल्प कालावधी | • आपत्तीमुळे एकुण मृत झालेल्या टक्केवारी पैकी मृत झालेल्या बालकांची संख्या<br>• मानवनिर्मित अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे विस्थापित झालेल्या बालकांची संख्या | आपत्ती व्यवस्थापन विभाग,<br>महसूल विभाग | ग्राम विकास विभाग,<br>नगर विकास विभाग |
| | | राज्य शासनामार्फत आपत्तीपूर्व तयारी, शीघ्र प्रतिसाद व विविध आपत्तींचे निवारण याकरिता शाश्वत प्रणाली लागू करणे | | • आपत्ती परिस्थिती / घटनेस प्राप्त प्रतिसादाचे मूल्यमापन अहवाल | आपत्ती व्यवस्थापन विभाग,<br>महसूल विभाग | ग्राम विकास विभाग,<br>नगर विकास विभाग |
| | | बालकांच्या तात्काळ गरजा (वैद्यकीय | | • आपत्तीमुळे विस्थापित | आपत्ती व्यवस्थापन | महिला व बाल |

| १०. कृती आराखडा- आपत्ती आणि हवामान बदलामुळे प्रभावित बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | सुविधा, निवारा, अन्न, सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता इत्यादी ) संबोधित करणे | | झालेल्या बालकांकरिता ड्रॉप-इन केंद्रे व आश्रयस्थाणांची संख्या | विभाग,<br>महसूल विभाग | विकास विभाग |
| धोरण प्राधान्य : १०.६ | | | | | | |
| ५. | आपत्तीनंतर – नियमित आवश्यक सेवा | सर्व अत्यावश्यक सेवा ( अन्न सुरक्षा, सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता, आरोग्य. पोषण सेवा, निवारा इत्यादी ) त्वरित पुनर्संचयीत करणे व शाश्वत प्रणालीची अंमलबजावणी करणे | | • आपत्ती नंतरची परिस्थिती व आपत्तीमध्ये वाचलेल्या बालकांकरिता सामाजिक सुरक्षितता व सुरक्षा जाळे संदर्भाने मूल्यमापन अहवाल | महसूल विभाग,<br>सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,<br>महिला व बाल विकास विभाग | ग्राम विकास विभाग,<br>नगर विकास विभाग |
| | | लवकर शाळा सुरु करणे<br>आपत्ती नंतर बालकांना पुस्तके, इतर आवश्यक खेळ व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे | | • आपत्तीग्रस्त भागात आठवडा/ महिन्याचे कालावधीमध्ये उघडलेल्या शाळांची संख्या<br>• कार्यरत असलेल्या शिक्षण केंद्रांची संख्या<br>• पुस्तके व शैक्षणिक | महसूल विभाग,<br>शालेय शिक्षण विभाग | |

| १०. कृती आराखडा- आपत्ती आणि हवामान बदलामुळे प्रभावित बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | साहित्य उपलब्ध करून देण्यात आलेल्या बालकांची संख्या | | |
| | आपत्ती नंतर- मानसिक सहाय्य | बाधित कुटुंबांना मनो-सामाजिक सहाय्य प्रदान करणे | | • स्थापित केलेल्या हेल्पलाईनची संख्या<br>• मनो-सामाजिक सहाय्य करणे करिता उपलब्ध करून देण्यात आलेल्या समुपदेशकांची संख्या | महसूल विभाग, राज्य मानसिक आरोग्य प्राधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| | | आपत्तीग्रस्त बालकांसाठी दीर्घकालीन पुनर्वसन योजना | | • जिल्हा आधारित पुनर्वसन योजना अस्तित्वात आहे | महसूल विभाग | नगर विकास विभाग, ग्राम विकास योजना |
| | | आपत्ती प्रतिसादावर शिकणे व वापराच्या उत्तम पद्धतींचा समावेश करणे | | • आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन योजनेमध्ये सर्वोत्तम पद्धती / आराखडा समाविष्ट करणे | महसूल विभाग | |
| धोरण प्राधान्य : १०.७, ३.१० | | | | | | |
| ६. | बालकांचे संरक्षण | बालकांना त्यांचे कुटुंबाशी पुन्हा जोडणे करिता पावले उचलणे | | • स्थापित केलेल्या | महिला व बाल विकास विभाग | |

| १०. कृती आराखडा- आपत्ती आणि हवामान बदलामुळे प्रभावित बालके | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु .क्र | केंद्रित केलेली क्षेत्रे व उप क्षेत्रे | कार्यवाही | कालमर्यादा (अल्प/मध्यम/ दीर्घ) | निरीक्षण निर्देशक (जिथे लागू असेल तेथे जिल्हानिहाय ) | कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले विभाग | सहयोगी विभाग |
| | | | | हेल्पलाईनची संख्या<br>• उपलब्ध तात्पुरता निवारा गृहांची संख्या<br>• कुटुंबाशी पुन्हा जोडले गेलेल्या बालकांच्या प्रकरणांची संख्या | | |
| | | अनाथ बालकांना पर्यायी कौटुंबिक - आधारित काळजी व्यवस्था प्रदान करण्यासाठी कार्यवाही करणे<br>ज्या बालकांना पर्यायी कौटुंबिक - आधारित काळजी सेवांमध्ये समाविष्ट करणे शक्य नसल्यास त्यांना संस्थात्मक काळजी सेवा उपलब्ध करून देणे | | • अनाथ बालकांची संख्या<br>• पुनर्वसन सहाय्य प्रदान करण्यात आलेल्या अनाथ / एक पालक असलेल्या बालकांची संख्या<br>• संस्थात्मक दाखल बालकांची संख्या<br>• पर्यायी काळजी व्यवस्थांमध्ये दाखल केलेल्या बालकांची संख्या (काळजीनुसार वेग-वेगळे) | महिला व बाल विकास विभाग | |

## ५. संस्थात्मक यंत्रणा

१. राज्य शासन हे सुशासन, पारदर्शकता, उत्तरदायित्व तसेच आंतरक्षेत्रीय आणि विकेंद्रित दृष्टिकोनाचा अवलंब करून बालहक्कांच्या प्राप्तीसाठी संस्थात्मक यंत्रणा सक्षम करेल. यामध्ये संबंधित समित्या आणि आयोगांमध्ये सदस्यांची विहित वेळेत नियुक्ती, पुरेश्या प्रशासकीय, मानवी आणि आर्थिक संसाधनांची तरतूद, शाश्वत कार्यप्रणाली आणि क्षमता वाढ या बाबींचा समावेश आहे.

२. बालकांकरिता महाराष्ट्र राज्य धोरण आणि कृती आराखडा (MSP&APC) राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती (HPC) स्थापन केली जाईल.

अ) राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती (HPC) चे मा. मुख्यमंत्री हे अध्यक्ष असतील.

ब) मा. मंत्री, महिला आणि बाल विकास, संबंधित विभागांचे मंत्री आणि मुख्य सचिव हे राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती (HPC) चे सदस्य असतील. महिला आणि बाल विकास विभागाचे प्रधान सचिव या समितीचे सदस्य सचिव असतील आणि राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती (HPC) चे सचिवालय मा. मुख्यमंत्री कार्यालय येथे असेल.

क) धोरण आणि कृती आराखड्याच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती (HPC) सहा महिन्यांतून किमान एकदा भेटेल.

३. धोरणावरील प्रगतीचे पुनरावलोकन आणि निरीक्षण करण्यासाठी आणि भविष्यातील कृती आराखड्यावर निर्णय घेण्यासाठी राज्यस्तरीय संनियंत्रण समिती (SMC) स्थापन केली जाईल.

अ) राज्यस्तरीय संनियंत्रण समिती (SMC) चे अध्यक्ष महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव असतील.

ब) अतिरिक्त सचिव / प्रधान सचिव / संबंधित विभागांचे सचिव, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे प्रतिनिधी, युनिसेफ, नागरी समाजाचे प्रतिनिधी, शैक्षणिक संस्था आणि बाल हक्क तज्ञ हे राज्यस्तरीय संनियंत्रण समिती (SMC) चे सदस्य असतील. महिला व बाल विकास विभागाचे प्रधान सचिव हे राज्यस्तरीय संनियंत्रण समिती (SMC) चे सदस्य सचिव म्हणून काम पहातील.

क) संनियंत्रण समितीची बैठक दर तीन महिन्यातून एकदा घेतली जाईल. बैठकीदरम्यान संबंधित विभागांनी त्रैमासिक प्रगती अहवाल सादर करावा.

४. महाराष्ट्र राज्य धोरण आणि कृती आराखडा (MSP&APC) च्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हा नियोजन समिती (DPC) च्या भूमिकेचा विस्तार केला जाईल. जिल्हा नियोजन समिती (DPC) त्रैमासिक प्रगती अहवाल राज्यस्तरीय संनियंत्रण समितीस (SMC) सादर करेल.

५. प्रभाग आणि गाव पातळीवरील संस्थांना बाल हक्कांच्या विविध मुद्द्यांवर संवेदनशील केले जाईल व बालकांशी संबंधित हस्तक्षेप/योजनांच्या अंमलबजावणी आणि निरीक्षणास समर्थन देतील. ग्राम आरोग्य आणि

स्वच्छता समिती (VHSC), शाळा व्यवस्थापन समिती (SMC), बाल संरक्षण समित्या (CPC) या समित्या संसाधनांच्या पुरेशा तरतुदीद्वारे आणि नियमित क्षमता निर्माण करून सक्षम केल्या जातील.

६. बाल पंचायती, बालसभा आणि इतर व्यासपीठांद्वारे मुलांचा सहभाग प्रत्यक्षात आणला जाईल. बाल पंचायत प्रतिनिधींना गाव, ब्लॉक आणि जिल्हा अंमलबजावणी समित्यांवर बदलीने सदस्य म्हणून आणले जाऊ शकते.

७. माहितीचे संकलन आणि प्रसार, संशोधन कार्य आणि योग्य पद्धतींचे दस्तऐवजीकरण, सर्वेक्षण आयोजित करणे, सामाजिक लेखापरीक्षण करणे, सामाजिक संघटना यांचे सोबत जाळे तयार करणे, प्रशिक्षण आणि जागरूकता निर्माण कार्यक्रम राबवणे इत्यादीसाठी बाल संसाधन केंद्राची स्थापना केली जाईल.

८. महाराष्ट्र राज्य धोरण आणि कृती आराखडा (MSP&APC) च्या अंमलबजावणीसाठी विविध राज्यांचे विभाग, शासनाच्या सर्व स्तरांवर आणि शासन तसेच नागरी समाज यांच्यात समन्वय आणि अभिसरण सक्षम करण्यासाठी एकत्रित प्रयत्न केले जातील.

९. सेवा वितरण प्रणाली सुधारण्यासाठी शासन सद्यस्थितीत सर्व रिक्त पदे तातडीने भरेल. तसेच बालकांच्या संदर्भाने चांगले परिणाम साध्य करण्यासाठी कर्मचाऱ्यांना सतत प्रेरित करण्यासाठी पावले उचलली जातील.

## ६. संसाधन व्यवस्थापन

१. महाराष्ट्र राज्य धोरण आणि कृती आराखडा (MSP&APC) लागू करण्यासाठी राज्य पुरेशा आर्थिक, मानवी आणि तांत्रिक संसाधनांची उपलब्धता सुनिश्चित करेल.

२. राज्य शासन बालकांकरिता आपली गुंतवणूक वाढवेल आणि 2030 पर्यंत बालकांसाठी सकल राज्य देशांतर्गत उत्पादन (GSDP) च्या किमान 12% साध्य करण्याचे लक्ष्य ठेवेल.

३. वय- आणि लिंग-विभेदित लाभार्थी माहिती आणि संबंधित अर्थसंकल्पाचे सुधारित संकलन आणि अहवालाद्वारे राज्यातील बाल अर्थसंकल्पाच्या कृती सक्षम करणे. वित्त विभागाद्वारे प्रकाशित वार्षिक बाल अर्थसंकल्प विवरण (CBS) चे नियमित लेखापरीक्षण करा.

४. सर्वेक्षण, पुराव्यावर आधारित संशोधन कार्य व प्रभावित मूल्यांकन आयोजित करणे तसेच बालकांच्या गरजा विविध कार्यक्रमांमध्ये आत्मसात कराव्यात जेणेकरून त्यांना राज्य शासनाच्या पुढाकारांचा पूर्ण लाभ मिळेल.

५. बालकांसाठी नियोजन आणि अर्थसंकल्प या बाबींच्या अनुषंगाने शासकीय कर्मचाऱ्यांची नियमित क्षमता वाढवण्याचे कार्य हाती घेतले जाईल.

६. बाल न्याय निधी अंतर्गत बाल निधी सारख्या विशेष निधीमध्ये पुरेशा तरतुदी करून बालकांकरिता संसाधन उपलब्ध करून देणे.

७. जेव्हा आवश्यक असेल, तेव्हा अतिरिक्त संसाधने जसे की आंतरराष्ट्रीय संस्था, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी आणि इतर निम-शासकीय माध्यमांद्वारे एकत्रित केली जातील, ज्यात सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) आणि मिश्रित वित्त आराखडा या सारख्या नाविन्यपूर्ण वित्तपुरवठा साधनांचा समावेश आहे.

# समाप्त